युरोपीय मराठी संमेलन
लेस्टर
पुनरागमन
२०२५
४ - ६ जुलै २०२५

युरोपीय मराठी संमेलनविशेष

# शब्द रुची

जुलै–सप्टेंबर २०२५ । मूल्य ५० रु. । पृष्ठे ५६

इथे
पुस्तकं
नांदतात



ग्रंथाली वाचक चळवळीची त्रैमासिक पुस्तिका

शब्द रुची

जुलै-सप्टेंबर २०२५
त्रैमासिक पुस्तिका, मूल्य ५० रु.

संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **हेमंत जोशी**

---

कार्यालयीन संपर्क
**ग्रंथाली संगणक विभाग**
**shabdruchee24@gmail.com**
**जाहिरात प्रसिद्धी - धनश्री धारप**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग - समीर कदम**

---

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

---

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.
shabdruchee24@gmail.com

---

ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

---

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**ऊर्मिला गानू / ५**
कुटुंबवत्सल जयंतराव...

**प्रल्हाद जाधव / ८**
चितमपल्ली यांचे बोट धरून

**सुधा हुजूरबाजार-तुंबे / ११**
जयंतदादा

**डॉ. अस्मिता व डॉ. नितीन पटवर्धन / १४**
युरोपीय मराठी संमेलन २०२५

**रामदास भटकळ / १६**
पुस्तकांची घरे

**मेधा आलकरी / १९**
पुस्तक हाती धरा!

**वैभव मांगले / २२**
वाचनसंस्कार महत्त्वाचा

**सॅबी परेरा / २५**
पुस्तकांनी उभं केलेलं घर!

**नंदन जोशी / २८**
पुस्तकांची सफर

**राजीव श्रीखंडे / ३२**
घराची अक्षरसमृद्धी!

**मेधा आलकरी / ३५**
पुस्तकांची वंडरलँड!

**डॉ. सिसिलिया कार्व्हालो / ४०**
पानफुटीचं झाड

**सुधा हुजूरबाजार-तुंबे / ४३**
घराला घरपण देणारी - पुस्तकं!

**वृत्तांत / ४६ ते ५०**

**राधिका कुंटे, चांगदेव काळे / ५१ ते ५४**
ग्रंथपरिचय, ग्रंथपाने

शुभांशू शुक्ला यांनी अवकाशभरारी घेतली आणि राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळप्रवास करणारे ते दुसरे आणि अंतराळस्थानकावर पोचणारे पहिले भारतीय ठरले. त्यांच्या या अंतरराळवारीला शुभेच्छा देताना अभिमान आणि आनंद वाटतो. भारतही मानवासह यान पाठवण्याच्या तयारीत आहे. भारतीय शास्त्रज्ञ ते लवकरच घडवतील, याचा विश्वास आहे.

इंग्लंडमध्ये मराठीचा उत्सव होतोय. अमेरिकेतील बीएमएमनंतर युरोपात १९९८ मध्ये नेदरलँड्स येथे पहिले युरोपीय मराठी संमेलन झाले. यावेळी ते ब्रिटनमध्ये लेस्टर इथे ४ ते ६ जुलै २०२५ दरम्यान होत आहे. जिथे मराठी साहित्यसंस्कृतीविषयक काही विधायक घडत असेल त्यात ग्रंथाली सहभागी होत आली आहे. बीएमएम, अमेरिका, कॅनडा, अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन या ठिकाणी ग्रंथाली पुस्तके घेऊन सहभागी झाली. या संमेलनात मात्र काही कारणास्तव प्रत्यक्ष सहभाग घेता येत नाही. या संमेलनाला हार्दिक शुभेच्छा.

एनसीपीएमध्ये नुकतीच डॉ. आशुतोष कोतवाल यांची मुलाखत झाली. जागतिक स्तरावर मूलकण वैज्ञानिक म्हणून त्यांनी मिळवलेले यश मोठे आहे. त्यांचे संशोधन अमेरिकेत प्रसिद्ध पावले आहे. या कार्यक्रमात कोतवाल यांनी त्यांच्या संशोधनाबद्दल सादरीकरण केले. त्यानंतर त्यांच्याशी 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ, अमोल दिघे, पिंटो, सुहास नाईक-साटम यांनी संवाद साधला. ज्येष्ठ पत्रकार-संपादक कुमार केतकर चर्चेच्या मुख्यस्थानी होते. विश्वाची निर्मिती हा कायमच कुतूहलाचा विषय आहे. त्यावर वेगवेगळ्या काळात शास्त्रज्ञांनी सिद्धांत मांडले आहेत. डॉ. कोतवाल यांच्या संशोधनाची घेतली गेलेली दखल भारतीयांना अभिमानास्पद आहे. श्रीहर्ष फेणे यांच्या पुढाकाराने एनसीपीए आयोजित या कार्यक्रमात ग्रंथालीचा सक्रिय सहभाग होता.

या क्षेत्रातले आधुनिक भारतातील आदरणीय नाव म्हणजे डॉ. जयंत नारळीकर. त्यांचे निधन होऊन दोन महिने होतील. डॉ. नारळीकरांनी विश्वनिर्मितीच्या सिद्धांताने जागतिक पटलावर आपली मोहोर उमटवली. त्यांचे संशोधन, त्यांचे लेखन यावर गेल्या महिनाभरात आपण वाचले आहे. या अंकात एक व्यक्ती म्हणून त्यांच्या आठवणी जागवल्या आहेत त्यांची मेहुणी ऊर्मिला गानू आणि त्यांची मामेबहीण सुधा हुजूरबाजार-तुंबे यांनी.

प्राणीपक्षी, वनचरे सोयरे असलेले ख्यातनाम वनअभ्यासक, पक्षिप्राणीनिरीक्षक प्रा. मारुती चितमपल्ली यांचेही नुकतेच निधन झाले. निसर्गात रमणारे, तो टिपून साहित्यात मांडणारे प्रल्हाद जाधव यांचा त्यांच्याशी असलेला स्नेह त्यांनी लिहिलेल्या मारुतरावांच्या आठवणी सांगतो.

'घराला घरपण देतात पुस्तके' असे वासुदेव तुंबे म्हणतात, तर वाचनाच्या गोडीतून, व्यासंगातून 'घरात पुस्तकसंग्रह होतो पानफुटीसारखा', असे सिसिलिया कार्व्हालो म्हणतात. अशा पुस्तकांच्या घरांच्या कथा या अंकात घेतल्या आहेत. डॉ. लतिका भानुशाली, मेधा आलकरी, अश्विनी भोईर, अस्मिता पांडे, डॉ. मृण्मयी भजक, राधिका कुंटे, यांच्या सहकार्यातून रामदास भटकळ, शारदा साठे, वैभव मांगले, नंदन जोशी, सिसिलिया कार्व्हालो, सॅबी परेरा, राजीव श्रीखंडे, गणेश मतकरी यांनी पुस्तक आणि वाचन याबद्दल बोलून त्यांची घरे पुस्तकांची घरे कशी झाली, त्यांना पुस्तकांची ओढ कशी लागली, पुस्तकांनी काय दिले, वाचन किती महत्त्वाचे आहे याबद्दल आपल्याशी संवाद केला आहे. त्यांचे लेख आपल्याला वाचनासाठी चालना देतील.

मराठी वाचून, बोलून, लिहून, पाहून तिला बळकट करण्याचे काम आपणच करू शकतो. कालौघात भाषा रूप बदलते. तिच्यात अन्य भाषांतील शब्द रुजतात. अन्यथा काही भाषा अस्तंगत झालेल्या आपण पाहतो. गणेश देवी म्हणतात, 'जे उच्चारायला सोपे असते ते समाज स्वीकारतो.' आज अनेक अमराठी शब्द आपण सहज वापरतो. तरीदेखील शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेची सक्ती अचानक आणि विद्यार्थ्यांच्या अयोग्य वयात करणे अन्याय्य आहे. ते प्रतिष्ठेचे न करता सरकार यावर विचार करेल अशी आशा आहे.

**- अरुण जोशी**



# कुटुंबवत्सल जयंतराव...

**ऊर्मिला गानू**

२१ जून १९६६ हा दिवस राजवाडे कुटुंबीयांसाठी महत्त्वाचा, आनंदाचा, संस्मरणीय असा होता. त्या दिवशी मंगला राजवाडे हिचा विवाह पद्मभूषण जगविख्यात शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्याशी संपन्न झाला. मंगल ही माझी मोठी बहीण. या नात्यानं मी जयंतरावांची मेहुणी झाले. त्यावेळच्या माझ्या भावना संमिश्र होत्या. माझी मोठी बहीण सासरी जाणार आणि तीसुद्धा एकदम लंडनला, या कल्पनेने मी थोडीशी अस्वस्थही झाले, पण मंगलला तिच्या हुशारीला, उत्तम करिअरला साजेसा असाच जोडीदार मिळाला याचं विलक्षण समाधानही होतं.

मुंबई विद्यापीठात गणित विषय घेऊन बी.ए. आणि एम.ए.ला पहिल्या आलेल्या मंगलनं तोपर्यंतचे गणित विषयातले उच्चांक मोडले होते. चॅन्सलर्स सुवर्ण पदक पटकावलं होतं. रुईया महाविद्यालयाची ती बेस्ट स्टुडंट होती.

याच सुमारास, १९६५ मध्ये डॉ. जयंत नारळीकर यांनी विज्ञानसंशोधन क्षेत्रात आपलं कर्तृत्व प्रस्थापित केलं. त्यांच्या संशोधनाला विज्ञानविश्वात जगन्मान्यता मिळाली. भारत सरकारनं पद्मभूषण देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला.

त्यावेळी आमचे हितचिंतक, नातलग, मित्रपरिवार या सर्वांना जयंत-मंगलचं सुमंगल व्हावं असं साहजिकच वाटू लागलं. अर्थातच, माझ्या बाबांनी त्या दिशेनं प्रयत्न सुरू केले.

श्री. जयंतरावांचे वडील डॉ. तात्यासाहेब नारळीकर आणि आई सौ. सुमतीबाई नारळीकर यांच्याशी पत्रव्यवहार करून मंगलची व कुटुंबाची माहिती त्यांना कळवली आणि मंगलला घेऊन श्री. जयंतरावांना भेटण्याची आपली इच्छाही व्यक्त केली.

श्री. जयंतराव त्यावेळी भारतात आले होते आणि अजमेरला आपल्या आई-वडिलांबरोबर राहात होते. पत्रव्यवहारातून अजमेरला मंगलला घेऊन जाण्याची तारीख ठरली आणि बाबा तिला ट्रेननं अजमेरला घेऊन गेले.

त्यांना स्टेशनवर उतरवून घ्यायला जयंतरावच गेले होते. नंतर अजमेरला त्यांच्या घरी थांबून दिवसभरात जयंत व मंगल एकमेकांना परिचित झाले. परस्परसंवाद साधता आला. संध्याकाळी स्टेशनवर परतीच्या प्रवासाला बाबा आणि मंगल निघाल्यावर जयंतरावांनी मंगलच्या हातात एक पाकीट सरकावलं. त्यात त्यांनी स्वत:ची तिच्याबद्दलची पसंती कळवली होती.

त्यानंतर पुढचे चार-पाच महिने आमचं घर लग्नघर म्हणून उत्साहात कार्यरत झालं. जयंतराव साखरपुडा करून केंब्रिजला परत गेले आणि मग लग्नासाठी जूनमध्ये आले. तेव्हापासून जवळजवळ ५९ वर्षं मी त्यांना माझे आदरणीय प्रतिभावंत, कुटुंबवत्सल, विनम्र, संवेदनाशील अशा व्यक्तिमत्त्वाचे मेहुणे म्हणून ओळखते आहे.

विश्वविख्यात शास्त्रज्ञ, उत्तम विज्ञानकथा लेखक, विद्यार्थिप्रिय विद्वान प्राध्यापक, विज्ञानातले संशोधक आणि तरुणांना एक आदर्श मार्गदर्शक ठरलेले डॉ. जयंत नारळीकर अत्यंत साधे होते. आम्हा नातलगांच्यात वावरताना, कार्यक्रमामध्ये सहभागी होताना त्यांच्याभोवती असलेल्या अनेक वलयांपैकी कोणतंही वलय स्पर्श करत नसे. खऱ्या अर्थानं अंर्तबाह्य साधे होते.

मंगलच्याबरोबरचं त्यांचं सहजीवन हाही एक आदर्श होता.

मला आठवतयं लग्नाच्या आधी १५ दिवस ते इथे आले. लग्न पुण्यात होतं. तिथेच मंगलला घेऊन साडीखरेदीला गेले. त्यांनी तिला निळसर रंगाची भारी साडी घेतली. हा रंग त्यांच्या आवडीचा, असं मंगल म्हणाली. त्या रंगाचं नाव होतं केंब्रिज ब्ल्यू. जयंतराव केंब्रिजचे प्राध्यापक होते त्यामुळे हे समीकरण गमतीदार वाटलं.

त्यांची आई संस्कृतमधली एम.ए. आणि सुवर्णपदक मिळवलेली होती. त्यामुळे संस्कृत भाषेचे संस्कारही



**गिरिजा, जयंतराव, मंगल, गीता, सुमती आजी, तात्यासाहेब नारळीकर**

जयंतरावांवर होतेच. लग्नामध्ये चक्क संस्कृतमध्ये उखाणा घेऊन जयंतरावांनी आम्हाला आनंदाश्चर्याचा धक्का दिला.

पुढे दोघंही केंब्रिजला गेले आणि पाच-सहा वर्षांनी आपल्या गीता-गिरिजा या गोड मुलींना घेऊन भारतातच स्थायिक होण्यासाठी मुंबईला T.I.F.R.मध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

तोपर्यंत मीही अनिलशी लग्न करून संसारात विलेपार्ल्यात रमले होते. त्यानंतर वेळप्रसंगी किंवा मुद्दाम ठरवून कधी मुलांचे वाढदिवस, नात्यामधले मुंज, लग्न समारंभ आणि मुख्य म्हणजे दादरला आईकडे माहेरपण अशा निमित्तानं आम्ही बहिणी तर भेटत असूच, जयंतरावही या कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी होत.

लहान मुलांशी ते गप्पा मारत असत. छान-छान विनोद सांगून आणि छोटी कोडी घालून मुलांना हसवत असत. एकदा माझ्या लहान भाच्याला सूर्यमालिकेतल्या ग्रहांबद्दल अभ्यासात प्रश्न होता. माझ्या वहिनीच्या सांगण्यावरून त्यानं तो प्रश्न जयंतरावांना विचारला. जयंतरावांनी उत्तर सांगितल्यावर तो म्हणाला, ‘मी आईला विचारतो की हे बरोबर आहे का?’ ह्यावर जयंतरावांची प्रतिक्रिया म्हणजे एक निरागस हास्य.

असंच एकदा आम्ही सगळे दादरला आईकडे राहिलो होतो. जयंतरावही होते. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून ते बसनं कुलाब्याला गेले. तिथे त्यांची मीटिंग होती. ते गेल्यावर घरात पेपर आला. त्यात जयंतरावांना भारत सरकारचं सन्मानाचं बक्षीस जाहीर झाल्याची बातमी होती. नंतर मंगलकडून असं कळलं की बसमध्ये दोन-तीन जणांची आज पेपरला बातमी आली आहे तेच तुम्ही नारळीकर ना? असं विचारलं.

साधेपणा मग तो पोषाखातला असो, वागण्यातला असो, संभाषणातला असो, त्यांचा स्थायीभावच होता. अत्यंत विज्ञाननिष्ठ असलेले जयंतराव पारंपरिक पद्धतीनं देव, मूर्तिपूजा मंदिरात जाणं, उपवास, व्रतवैकल्य हे मानणारे नव्हते. खऱ्या अर्थानं विज्ञानच त्यांच्यासाठी पूजनीय होतं, पण आम्हाला त्यांची एक विलक्षण वृत्ती त्यातून जाणवत असे. कोणाच्याही घरी सत्यनारायण, गणपतीपूजन किंवा अन्य पूजेला गेले तरी ते आणि मंगल रीतीनुसार नमस्कार, आरती करून प्रसाद घेत असत. दुसऱ्यांच्या श्रद्धेला किंवा धार्मिक उपचारांना कमी लेखून, उपहास करून स्वत:च्या बुद्धिवादाचं वर्चस्व त्यांनी कदापिही दाखवलं नाही.

त्यानंतर १९९१मध्ये जयंतराव पुण्याला आयुकाचे डायरेक्टर म्हणून नियुक्त झाले. या संस्थेच्या उभारणीत सुरुवातीपासूनच त्यांचं बहुमोल मार्गदर्शन होतंच. डायरेक्टर या नात्यानं ते आयुकाच्या परिसरातच एका मोठ्या बंगल्यात सहकुटुंब राहायला गेले. सर्व कुटुंबच कुलाब्याहून पुण्याला स्थलांतरित झालं. या बंगल्यात राहायला आल्यावर मंगलचा माझ्या आईला फोन आला आणि गृहप्रवेश केल्याचं तिनं कळवलं. आईने विचारलं, कोणता मुहूर्त बघितलास? तेव्हा उत्तर आलं मुहूर्त जयंतनंच पाहिला. आईला आनंद झाला.

तिनं विचारलं, कोणता मुहूर्त? तेव्हा मंगल हसून म्हणाली, हा अंकांचा मुहूर्त आहे ९-१-१९९१.

पुण्याला मी गेले की मी तिच्याकडे नेहमीच जात असे. प्रचंड मोठं आवार, प्रशस्त बंगला, मात्र या सर्वांच्या राहणीमानात जराही बदल झाला नाही. तोपर्यंत तिच्या दोन्ही मुली लग्न होऊन अमेरिकेला गेल्या होत्या. धाकटी मुलगी लीलावती हिचं शिक्षण चालू होतं.

जयंतरावांनी मुलींच्या शिक्षणासंदर्भात एक विलक्षण धोरण ठेवलं होतं. ते म्हणजे मुलींना कोणत्याही कोचिंग क्लासला किंवा ट्युशनला न पाठवणं. अर्थातच, तिन्ही मुली खूपच हुशार, बुद्धिमान असल्यामुळे उत्तम यश मिळवू शकल्या आणि त्यांनीही या धोरणाला कधी विरोध केला नाही.

२००१मध्ये जयंतराव आयुकाच्या डायरेक्टरपदावरून निवृत्त झाले आणि पुण्यातच शास्त्रज्ञांसाठी बांधलेल्या 'खगोल' नावाच्या सोसायटीत राहायला आले. तोपर्यंत त्यांच्या आई-वडिलांचं निधन झालं होतं.

आपल्या आई-वडिलांबरोबर अनेक वर्षं एकत्र कुटुंबात राहिलेल्या जयंतरावांनी दोघांनाही भरपूर प्रेम दिलं. कायमच त्यांचा आदर केला. एक मुलगा या नात्यानं त्या दोघांचंही आरोग्य, सुव्यवस्था याला ते प्राधान्य देत असत. अर्थातच, मंगलचीही साथ त्यांना होतीच.

पुढे २००५मध्ये मला पुणे विद्यापीठात रिफ्रेशर कोर्स करायला पुण्याला जावं लागलं. हा कोर्स विद्यापीठातच होता तीन आठवड्यांसाठी.

मी अर्थातच मंगल-जयंतरावांकडे मुक्कामाला गेले. त्या तीन आठवड्यांत या दांपत्याचं सहजीवन मला जवळून बघता आले. दोघांच्यातला समजूतदारपणा, सात्त्विक वृत्ती, एकमेकांना मदत करण्याची सहजवृत्ती आणि अत्यंत समाधानी अशी वागणूक हे मी प्रत्यक्ष पाहिलं. एकमेकांशी वाद नाही, आवाज चढवणं नाही, समोरच्यांचं मन समजून घेणं, त्याचा आदर करणं, काही विसंगत वाटल्यास मार्दवतेनं जाणवून देणं असा त्यांच्यातला सरळ व्यवहार होता.

घरात आम्ही तिघेच होतो. तिच्याकडे पहिल्यापासूनच मदतीला, साफसफाईला, स्वयंपाकाला बाहेरच्या कोणाचीही मदत नव्हती. तिला भाजी निवडायला मदत करणं, वॉशिंग मशीन लावणं, जेवण झाल्यावर भांडी घासणं हे जयंतराव अगदी सहजपणे करत असत. त्यांचा जेवणाचा मेन्यू पण एकमतानं ठरत असे. त्यांना येणारी असंख्य चाहत्यांची पत्रं, फोन, वार्ताहरांच्या खेपा हे सगळं मंगल व्यवस्थित सांभाळत असे. जयंतरावांना गूळ-पोळी, आइसक्रीम, लाडू असे शाकाहारी पदार्थ तर मांसाहारी चमचमीत पदार्थही मनापासून आवडत. त्यांच्यासाठी हे उत्साहानं बनवत असताना मंगलला मनापासून आनंद होई.

पुढे जयंतरावांना पार्किन्सन झाल्यावरही तिनं आईच्या मायेनं त्यांची काळजी घेतली. जयंतरावांनी तिला विनातक्रार सहकार्य केले.

दोन वर्षांपूर्वीच मंगलचे निधन झालं. पण त्या नंतरची दोन वर्षं 'खगोल'मधल्या घरीच जयंतरावांनी आपल्या मुली आणि नातींबरोबर छान सहकार्य घेऊन, स्वत:ची तब्येत सांभाळून समाधानात घालवली.

आज या जगप्रसिद्ध, लोकप्रिय शास्त्रज्ञाबद्दल अनेक ठिकाणी लिहून येतं. सभांमध्ये आदरांजली वाहिली जाते आहे. भरभरून त्यांच्याबद्दल बोललं जातंय. प्रतिसाद येत आहेत. हे सगळं आम्हा कुटुंबीयांनाही आनंद देणारंच आहे.

त्यांच्याबद्दल सांगण्यासारखं भरपूर आहे, पण एवढं नक्की म्हणता येईल, की जी वलयं प्रसिद्धीची, सन्मानाची, लोकप्रियतेची, गौरवाची त्यांच्याभोवती सतत होती त्यांचं जराही लेपन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला झालं नाही. खरं सांगायचं तर 'कमलपत्रा'प्रमाणे हे व्यक्तिमत्त्व होतं. कमलपत्रावर पडलेले, चिकटलेले पाण्याचे थेंब मोत्यासारखे चमकून शोभा वाढवतात, पण ते कमलपत्र मात्र ओलं होत नाही.

**- ऊर्मिला गानू**
anilganu@gmail.com

ग्रंथाली

**बालशिक्षण एक अद्भुत सफर**

**रती भोसेकर**





**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



# चितमपल्ली यांचे बोट धरून

**प्रल्हाद जाधव**



मारुती चितमपल्ली

मारुती चितमपल्ली यांची पहिली भेट झाली ती नागपूर येथे त्यांच्या घरी. तेव्हा मी माहितीखात्याचा उपसंचालक म्हणून नागपूरला काम करत होतो. मुंबईतील अनेक पत्रकार हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने नागपुरात येत असत. शनिवार-रविवार किंवा अन्य सुट्ट्यांच्या दिवशी काय असा प्रश्न अनेकांसमोर असे. मग समान छंद असणारे काही पत्रकार आणि आम्ही विदर्भातील विविध ठिकाणी फिरायला जायचे किंवा नामवंत व्यक्तींना भेटायचे ठरवत असू. विदर्भात अशी ठिकाणे आणि दिग्गज माणसे खूप वावरत होती. बाबा आमटे ते डॉ. अभय बंग आणि मोहन हिराबाई हिरालाल ते विनू काळे अशी मांदियाळी होती.

एकदा अधिवेशनकाळात पत्रकार सुभाष शिर्के, आमचे नागपूर येथील उत्साही अधिकारी अनिल गडेकर आणि मी चितमपल्ली यांना भेटायला गेलो. त्यांचे नाव अनेक वर्षांपासून ऐकून होतो, साहित्य वाचून होतो. पण त्यांना प्रत्यक्ष भेटायच्या कल्पनेने मी चांगला प्रोत्साहित झालो. सुभाष हा हाडाचा पत्रकार. चौकस बुद्धी, चौफेर वाचन आणि साहसीवृत्ती यामुळे मला त्याचे कौतुक असे. भ्रमंती आणि पक्षिनिरीक्षणाची त्याला आवड होती.

आम्ही सकाळी सकाळी त्यांच्या घरी जाऊन धडकलो. भीत भीत मी त्यांना माझा परिचय करून दिला तेव्हा ते म्हणाले, अहो तुमचे 'पाण्यातील दिवस' हे पुस्तक मी वाचले आहे आणि ते माझ्या संग्रही आहे. एक मोठा लेखक माझ्यासारख्या नवशिक्या लेखकाचे कौतुक करत आहे ही माझ्यासाठी एक मोठी गोष्ट होती. 'पाण्यातले दिवस' या पुस्तकाला तेव्हा शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार मिळाला होता. त्या पुस्तकाचे वेगळेपण, त्यातील सावित्री नदी, मासे, ग्रामीण वातावरण याचे चितमपल्लींना आकर्षण असणार. संकल्पित मत्स्यकोषाच्या अनुषंगाने काही संदर्भ सापडतील का हे पाहण्याचाही त्यांचा प्रयत्न असावा. काहीही असले तरी त्यांनी केलेले कौतुक खूप मोलाचे आणि ऊर्जा देऊन जाणारे होते. तेव्हापासून त्यांच्या आणि माझ्या दोस्तीचा सिलसिला सुरू झाला.

त्यावेळी चितमपल्ली यांच्या पक्षिकोशाचे काम सुरू होते. दिवाणावर पुस्तकांचा, फायलींचा ढिगारा आणि मधोमध उतरते मेज समोर घेऊन बसलेले चितमपल्ली; असे चित्र होते. मग स्वाभाविकच पक्षिकोशाच्या कामाविषयी गप्पा सुरू झाल्या. त्या गप्पांतून जो ऐवज हाती आला त्यातून त्यांच्या प्रगतीची माहिती देणारा एक लेख मी 'महाराष्ट्र टाइम्स'साठी लिहिला.

हळूहळू त्यांच्याशी जवळीक वाढत गेली. जंगल, पाणी, झाडे, पाने, फुले-फळे, पशुपक्षी हा तसा रोमांटिक विषय. परंतु

या विषयाने माझ्या जीवनात प्रवेश केला तो कायमचा!

एकदा ते भूत मानेवर बसले की उतरतच नाही! आई-वडील पक्षीनिरीक्षक असले की मुलांनाही तो छंद लागावा हे ठरलेलेच!

मग दरवर्षी त्यांच्याबरोबर कधी ताडोबा, कधी नागझिरा, कधी मेळघाट असे फिरणे सुरू झाले. नवेगाव बांध हे चितमपल्ली यांचे सर्वात आवडते ठिकाण. तेथील मालगुजार भूपुत्र माधवराव पाटील-डोंगरवार हे त्यांचे मित्र (आणि गुरू). नागझिऱ्यावर चितमपल्लींनी बरेच लेखन केले आहे. ते वाचून माझ्या मनात नागझिराभेटीचे आकर्षण निर्माण झाले होते. मग एकदा त्यांच्याबरोबर नागझिरा गाठले. तेथे मनसोक्त फिरलो. अनेक प्रकारची झाडे, वनस्पती, प्राणी, पक्षी पाहिले. माधवराव आणि त्यांच्या मुला-नातवाकडून जंगलातील अनेक विलक्षण गोष्टी ऐकल्या. याच भ्रमंतीत गावोगावी फिरताना त्या गावाशी संबंधित असणाऱ्या विलक्षण लोककथांचे भांडार त्यांच्याकडून खुले व्हायचे.

जंगलात फिरायला सुरुवात केली की दिसेल ते झाड, पान, फूल, गवत, दगड-माती याविषयी त्यांचे माहिती देणे सुरू व्हायचे. त्यात वेळ कसा जायचा ते कळायचेच नाही. चितमपल्ली एकदा म्हणाले होते, की एक चौरस किलोमीटर जंगलाचा अभ्यास करायचा म्हटले तरी त्यासाठी एक आयुष्य पुरायचे नाही!

त्यांच्यासोबत मुक्त आणि बेबंद स्वरूपाची भ्रमंती सुरू असायची. फावल्या वेळात गप्पांची मैफल रंगाची! त्यातून चितमपल्ली कसे घडत गेले, ते कसे लिहितात, विचार कसा करतात हे कळायला मदत व्हायची. 'केशराचा पाऊस' ही त्यांची गाजलेली कथा. ती त्याच नावाच्या कथासंग्रहात समाविष्ट आहे. ती कथा त्यांना कशी सुचली असे मी एकदा त्यांना विचारले. मेळघाटातील कोकटूचे घनदाट जंगल फुलोऱ्यावर आले की त्या वृक्षवेलींवरील फुलातील केसर हवेसोबत आकाशात उडत जाते. वर तरंगत जणू त्यांचे ढग तयार होतात. रात्री थंडी पडल्यावर ते केसर वरून खाली येते. अशावेळी प्रियतमेला सोबत घेऊन, अंगावर एखादी पांढरी शाल घेऊन आपण त्या भागातून फिरत असू; तर फिरून परत येईपर्यंत ती शाल केशरी झालेली असते. अतिशय रोमँटिक आणि एखाद्या महाकाव्यात शोभून दिसेल अशी ही गोष्ट! पुढे कधीतरी आम्ही काही जण समक्ष कोकटू येथे जाऊन त्या परिसरातही फिरून आलो.

जंगलातून चालताना होणाऱ्या प्राण्यांच्या पावलांच्या आवाजाचे (सगरी) त्यांनी केलेले वर्णन मराठीत अश्रुतपूर्व आणि अभूतपूर्व अशा स्वरूपाचे आहे. पावसात भिजल्यानंतर निर्माण होणाऱ्या मातीच्या गंधापासून विविध गंध, रंग आणि जाणिवांचे ते जे वर्णन करतात ते अलौकिक असेच म्हणावे लागेल. रंग, रूप, स्पर्श, गंध, नाद, अशा साऱ्या संवेदना हळुवारपणे जागवत वाचकाला आपल्या अधीन करून घेण्याचे त्यांचे सामर्थ्य आश्चर्यकारक होते. जंगलात फिरायचे तर कान आणि डोळे यांबरोबरच मनही तितकेच तल्लख ठेवावे लागते; हे त्यांच्यासोबत फिरताना आम्ही शिकलो. एक उदाहरण द्यायचे तर श्रीवर्धन-हरिहरेश्वर-बागमंडला परिसरात चांदण्या रात्री नारळीपोफळीच्या बागांतून फिरतानाचा त्यांचा जो अनुभव 'चकवा चांदण' या ग्रंथात आला आहे तो त्यांच्या लेखन-प्रतिभेचा परमोत्कर्ष म्हणावा लागेल. तो आनंद मिळवायचा असेल तर त्यासाठी रसिकांनी त्या पुस्तकाकडे वळायला हवे.

चितमपल्ली यांचा स्वभाव मितभाषी पण त्यांचे मित्रवर्तुळ फार मोठे. त्यात जीए कुलकर्णी, दुर्गा भागवत, नरहर कुरुंदकर, व्यंकटेश माडगूळकर, गोनी दांडेकर, राम पटवर्धन अशी मंडळी! जे. कृष्णमूर्तीसुद्धा त्यांच्या आवडीचे लेखक, त्यांचे बरेच लेखन त्यांनी वाचले होते.

चितमपल्लींची लेखनशैली अल्पाक्षरी. इतकी की अनेकदा त्यांचे वाक्य एकाच शब्दात संपलेले आढळते. याबाबतीत चक्रधरस्वामींचा त्यांच्यावर प्रभाव होता. एकदा ते बोलता बोलता म्हणाले की मुद्रितशोधकाला वाटायचे की मी चुकत आहे म्हणून ते माझ्या एका शब्दाच्या पूर्णविरामानंतर तो काढून तेथे स्वतःहून स्वल्पविराम टाकायचे!

'साहित्यप्रसार केंद्रा'पासून 'मौजे'पर्यंत सारी प्रकाशनगृहे त्यांचे लेखन झेलून घेण्यासाठी तयार असत. पक्षिनिरीक्षणाच्या पार्श्वभूमीवर ॲरिस्टॉटलपासून सलीम अलींपर्यंत सगळ्यांविषयी त्यांचा दांडगा अभ्यास. वेदउपनिषदांपासून पशुपक्षी, जंगलांची शास्त्रीय माहिती देणाऱ्या कोषांपर्यंत सारे संदर्भ तोंडपाठ! सलीम अली तर त्यांचे गुरूच! पक्षिनिरीक्षणाचे एक छोटे सूत्र सलीम अली यांनी त्यांना दिले होते आणि त्याचे पालन चितमपल्ली यांनी कायम केले.

त्यांच्यासमोर आम्ही हौशे, नवशिके; पण तसे आम्हाला ते कधी जाणवू द्यायचे नाहीत. आम्ही काही आगळीक केली तर एक प्रेमळ दृष्टिक्षेप टाकून ते गप्प बसत. काहीही तक्रार न करता अतिशय उत्साहाने आमच्यासोबत रानावनात ते तासन् तास फिरायचे. जंगलात फिरायचे तर पहाट आणि संध्याकाळ या महत्त्वाच्या वेळा. पहाटे चार वाजता निघायचे तर साडेतीन वाजता ते तयार असत. निवास-भोजनाच्या त्यांच्या काही तक्रारी नसत. ते आयुष्यभर शाकाहारी होते. भूकलाडू म्हणून काही फळे पिशवीत टाकून घेतली की त्यांचे काम भागायचे!

भल्या पहाटे फिरण्याचा सिलसिला सुरू होई आणि साडेदहा-अकरा वाजेपर्यंत तो चाले. पाणी, फुले, दगड, माती, पशुपक्षी जे काही वाटेत येईल त्याविषयी ते बोलत. आम्ही ते काना मनात साठवून घेत असू. त्यातूनच 'अंधारबनातील प्रकाशयात्रा' हा माझा लेख जन्माला आला. आधी तो 'महाराष्ट्र

टाइम्स' आणि पुढे 'ग्रंथाली'च्या 'रानभूल' या पुस्तकात समाविष्ट झाला.

सलीम अली पक्षिनिरीक्षणाबाबतची आपली प्रत्येक नोंद शास्त्रीय कसोटीवर तपासून नंतरच करतात तर चितमपल्ली आपल्या या नोंदीबरोबर संबंधित पक्ष्याबाबत अवांतर माहितीही देतात. त्यांचे ललित लेखन तर अनेक चित्तचक्षूचमत्कारिक कथा-कहाण्यांनी भरलेले आहे. ते असे का करत असतील असा प्रश्न पडायचा. कधी रागही यायचा. लांडोर मोराचे अश्रू पिते आणि तिला गर्भधारणा होते हे कसे काय शक्य होईल? चकोराची पिल्ले चांदणे कसे काय टिपत असतील? यासारखे प्रश्न पडायचे. उजाड गावातील भुते-खेते, रानात फिरताना पडणारा 'चकवा', माकडांची शेकोटी, त्यांचे डोळ्यांनी क्रिकेट खेळणे अशा गोष्टी पटायच्या नाहीत. परंतु ते दामटून अशा गोष्टी सांगत. पुढे जसजसा अभ्यास करत गेलो तसतसे लक्षात आले की पुराणकथा आणि तत्सम किस्से-कहाण्यांनी जगभर सर्वत्र माणसाच्या जगण्याला एक मोठा आधार दिलेला आहे. या कथांचा अभ्यासपूर्ण अन्वय लावता आला तर जीवनातील गुंतागुंत आणि किचकट समस्यांना सामोरे जाण्याची शक्ती मिळू शकते. लहानमोठे विद्यार्थी, सर्व स्तरांतील वाचक तसेच सर्वसामान्य गृहिणींना जंगलभ्रमण, जंगलवाचनाची गोडी लागावी त्यामागे हे कारण आहे हे लक्षात आले. मग त्यांच्या अशा प्रकारच्या ललित लेखनाकडे बघण्याची एक निर्मळ दृष्टी आपोआप विकसित होत गेली.

मारुतरावांच्या पत्नी सरस्वतीबाई आणि मुलगी छाया यांना आम्ही जवळून पाहिले आहे. त्या दोघी त्यांच्या विश्वात तर मारुतराव आपल्या विश्वात मग्न असत. जुजबी ओळखीच्या पलीकडे त्यांच्याशी जवळीक निर्माण झाली नाही. अशी आवश्यकताही वाटली नाही. उलट त्या कुटुंबाची ती जगण्याची नैसर्गिक लय खंडित होऊ नये याची आम्हीही काळजी घ्यायचो. मारुतरावांनी ३६ वर्षे सरकारी नोकरी केली पण सरकारी यंत्रणेविषयी त्यांच्या मनात कटुता नव्हती. आपला पगार, बढती-बदली, साहेबलोक, सहकारी-कर्मचारी यांच्या विषयी ते कधी बोलायचे नाहीत. 'मला सरकारी कर्मचाऱ्यांइतके कोणी छळले नाही' असा एक उल्लेख थोरो यांच्या लेखनात आला आहे. तसाच एक मार्मिक शेरा मारुतरावांच्या लेखनातही कुठेतरी आल्याचे मात्र आठवते!

मारुतराव भारतातील जवळपास सगळ्या जंगलांत फिरले. ते जिथे जिथे जात तिथे तिथे पशुपक्ष्यांबरोबर झाडे हा त्यांच्या निरीक्षणाचा आणि कुतूहलाचा विषय असायचा. 'बुद्धाज् कोकोनट' नावाचा एका वृक्षावरचा त्यांचा लेख 'शब्दांचे धन' या पुस्तकात समाविष्ट आहे. जिज्ञासूंनी तो जरूर पाहावा. एका भ्रमंतीत त्यांना एक दुर्मिळ पुस्तक आढळले. पेच असा होता की पत्नीला साडी घ्यायची की पुस्तक विकत घ्यायचे! तेव्हा पत्नी म्हणाली, साडी राहू द्या, पुस्तक घ्या! ही आठवणही याच पुस्तकात नमूद आहे.

'पुष्पासंगे मातीस वास लागे' असे म्हणतात. मारुतरावांच्या सहवासाने हाच अनुभव दिला. विशेषतः पक्षिनिरीक्षणाची गोडी लागली त्यातूनच तांबट पक्षाच्या निरीक्षणावर माझे 'तांबट' हे पुस्तक जन्माला आले. दिव्याने दिवा लागतो तो हा असा!

– प्रल्हाद जाधव
pralhadjadhav.two@gmail.com

ग्रंथाली

२०२४
भाजपा जिंकली
कशी?




तुळशीदास भोईटे

मूल्य ३५० रुपये
सवलतीत २०० रुपये



# जयंतदादा

## सुधा हुजूरबाजार-तुंबे

जयंत नारळीकर हा आमच्यासाठी अभिमानाचा अष्टाक्षरी मंत्र आहे. तो माझा सख्खा आतेभाऊ. हा अंक तुमच्या हाती पोचेपर्यंत त्याला जाऊन दोन महिने होतील. काळ किती झपाट्याने जातो, हेच खरे.

त्याचे मोरुमामा म्हणजेच माझ्या बाबांपेक्षा तो फक्त आठ वर्षांनी लहान होता. बाबा शिकायला वाराणसीला त्यांच्या घरी होते तेव्हा ते रोज रात्री घरच्या फळ्यावर गणितातला एक कूट प्रश्न आव्हान म्हणून लिहीत. सकाळी त्यांना जयंतदादाचं अचूक उत्तर मिळालं की समाधान वाटतं असे.

'गणिताबरोबर मला संस्कृत, काव्य, साहित्याची गोडीही मोरुमामांमुळे लागली. एवढंच नाही, माझं लग्नही त्यांच्याच आवडत्या गणिताची विद्यार्थिनी मंगला राजवाडेशी लावून दिलं, असं त्यानं आपल्या लेखांत, भाषणांत, पुस्तकांत सांगितलंच आहे.

मामा असला तरी मोठ्या भावासारखे त्याचे पाठीराखा होते मोरुमामा! माझ्यात आणि जयंतदादामध्ये जवळपास एका पिढीचं अंतर होतं, पण कधी जाणवलं नाही तसं. लहानपणापासून तो आमच्या घरचाच होता.

मी त्याच्या लग्नात खूप लहान होते आणि मंगलावहिनी-कडून खूप लाड करून घेतले होते. तिच्या लाडक्या हुजूरबाजार-सरांची मुलगी होते मी! 'माझी छोटी नणंद' असं मला ती कौतुकानं कायम म्हणत असे...

त्यांच्या कुलाब्याच्या घरातली भाऊबीज म्हणजे आनंदसोहळा असे. बाबांना ताईआत्या ओवाळायची. मग मी जयंतदादाला. बाबा नेहमी त्याच्या आईला म्हणजे ताईआत्याला ओवाळणीत पुस्तकं देत असत, आणि मला वयोपरत्वे दादानं आणलेल्या परदेशी आणि जास्त करून इंग्लंडवारीतल्या छान छान वस्तू मिळत असत. रंगीत पेन्सिली, पेनं, कंपासपेटी, गळ्यातलं चेनमधलं घड्याळ, न चुरगळणारे कपडे वगैरे...

मी मोठी होत गेले तशी वाचनीय पुस्तकं भेट म्हणून



वासुदेव तुंबे, डॉ. जयंत नारळीकर व सुधा हुजूरबाजार-तुंबे

मिळत गेली.

ह्या भाऊबीजांचं सर्वोच्च बक्षीस म्हणजे महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त त्याला राज्यपालांकडून मिळणारा 'महाराष्ट्र गौरव' पुरस्कार घेण्यासाठी 'माझ्यावतीनं माझी बहीण घेईल' असं सांगून दादानं माझा सन्मानच केला होता.

त्या समारंभात प्रतिष्ठित मान्यवरांत मी बसले होते. नाव पुकारलं आणि प्रचंड टाळ्यांचा गजरात मी स्टेजवर जाऊन राज्यपालांकडून तो पुरस्कार स्वीकारला. त्यावेळी त्यांनी दादाचं आणि मी बहीण म्हणून माझंही कौतुक केलं होतं.

औटघटकेचं राज्य काय असतं ते त्याक्षणी राज्यपालांबरोबर हातात मानचिन्ह घेऊन फोटो काढताना जाणवलं. हा बहिणीचा सन्मान दादानं मला दिला हे मी कधीच विसरणार नाही.

तसंच माझे दैवत असलेल्या कुसुमाग्रजांची नाशिकमधली घरगुती भेट हा माझ्यासाठी अविस्मरणीय अनुभव आहे. त्या भेटीत, कुसुमाग्रजांना पडलेल्या प्रश्नाचं 'अणुबॉम्ब आणि

अणुऊर्जा म्हणजे काय असतं' या कुतूहलात्मक उत्तर दादानं शुद्ध मराठी भाषेत उलगडून सांगताना पाहून मी थक्क झाले होते. मराठी भाषेतल्या दोन दिग्गज व्यक्ती त्यादिवशी माझं आयुष्य बदलवून गेल्या. मला माझ्या मातृभाषेची मराठीची ओळख नव्यानं झाली होती.

पाच वर्षांपूर्वी मी कोरियातील अनुभवांवर 'सप्तरंगी कोरिया-एक अनुभव' हे पुस्तक लिहिलं आणि कोव्हिडच्या अतिदक्षता विभागातून, आजारी असतानादेखील, दादा-मंगलावहिनी उभयतांनी कौतुकानं ह्या माझ्या पहिल्या पुस्तकाची प्रस्तावना लिहून दिली हेही मी विसरू शकत नाही.

सगळ्यांचं मनापासून मोकळेपणानं कौतुक करायचं हा नारळीकर कुटुंबीयांचा गुण आचरणात आणण्यासारखा आहे. माझ्या लहानपणापासून मी अनुभवलं आहे आणि तसंच आमच्या चिन्मयच्या शालेय तसंच पुढील आयुष्यातल्या यशाचं कौतुक मंगलामामी आणि जयंतमामा कायम करत असत. तो लेखक असल्यानं त्यांना बोलायला सामायिक विषय होते. काही महिन्यांपूर्वी पुण्यात कामासाठी गेला असताना चिन्मय आवर्जून जयंतमामाला भेटायला गेला होता. तेव्हा 'काव्य शास्त्र विनोदेन' अशी संध्याकाळ होती असं चिन्मयकडून आम्हाला समजलं. दोन महिन्यांपूर्वी आम्ही भेटलो तेव्हा चिन्मयच्या नवीन लेखनाविषयी चर्चा झाली.

तेव्हा इतरही घरगुती गप्पा मारताना दादाकडून कितीतरी नवीन गोष्टी मला कळल्या होत्या.

त्याला जेव्हा जेव्हा जागतिक पातळीवर तसंच भारतात पुरस्कार मिळाले तेव्हा मोरूमामांनी (माझ्या बाबांनी) त्याला दोन्ही हातांनी दिलेली शाबासकी त्याला आठवत होती.

माझ्या वडिलांनी केलेल्या पन्नास-साठच्या दशकातल्या परीस्थितीजन्य संस्कृत श्लोकांची विडंबनं त्याला पाठ होती.

'पुढच्या वेळी ती नीट वहीत लिहून घेईन' असं तेव्हा मी त्याला सांगितलं होतं. माझे वडील तेव्हाचे सुप्रसिद्ध क्रिकेट कॉमेंटरी करणारे 'व्हीजी' ह्या सुप्रसिद्ध व्यक्तीची नक्कल तंतोतंत करायचे. ती इतकी की जेव्हा नारळीकर कुटुंबीय प्रत्यक्ष व्हीजींना भेटले तेव्हा मोरूमामाच बोलताहेत असा भास होत होता, असं त्यादिवशी जयंतदादानं मिश्किलपणे सांगताना आम्हाला हसू आवरलं नाही.

गप्पा मारतामारता चहापान करताना एकदा मी माझे पती वासुदेवांची प्रश्नार्थक मुद्रा बघून मोठ्या आवाजात काहीतरी बोलले. तेव्हा जयंत दादा नेहमीच्या विनोदी स्वरांत म्हणाला, 'तू हळू आवाजात बोललीस तर ऐकू येईल आम्हाला. मोठा आवाज ऐकू येत नाही..''

मला न राहवून हसू आलं...

नंतर त्यानं त्याचं चालू लिखाण दाखवलं. माझ्या बाबांवरचं प्रेम 'मोरु परतून आला' या त्यानं नुकत्याच लिहिलेल्या लेखातून वाचलं. त्याचं प्रिंटाऊट तपासत होता. मी म्हटलं, अरे, तू संगणकातच बघून का तपासत नाहीस? तेव्हा तो हसत हसत म्हणाला, की मला हातात कागद घेऊन तपासलं की समाधान मिळतं...

खरा हाडाचा शिक्षक आहेस तू असं मी म्हणता म्हणता थांबले.

ती भेट शेवटची आहे असं तेव्हा जाणवलंही नाही.

जयंतदादाचा सरकारी इतमामात अंत्यविधी झाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलिस दलातील आणि इतर मान्यवर वैज्ञानिक, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळी उपस्थित होती. त्याच्यावर भारतीय तिरंगी ध्वजाचं पांघरूण घातलं होतं...

बंदुकांची सलामी देत राष्ट्रीय मानवंदना दिली गेली. आजवर केवळ सिनेमात किंवा टीव्हीवर हे बघितलं होतं, आज प्रत्यक्ष समोर घडतं होतं. दादा नेहमीसारखा प्रसिद्धीपराङ्मुख प्रसन्न, शांत चेहऱ्यानं डोळे मिटून झोपला आहे असंच वाटत होतं. त्याला हे कितपत आवडलं असतं, हाही एक मुद्दा आहेच...

त्यादिवशी त्याच्या शोकग्रस्त चाहत्यांच्या जनसागराकडे बघताना मला माझ्या भावाची महती जाणवली.

'चला ताई, तुमच्या भावाचं शेवटचं दर्शन घ्या' असं म्हणत एका पोलिसानं मला भानावर आणलं आणि शेवटी दादानं आमच्या सगळ्यांच्या डोळ्यांत पाणी आणलंच...

दादा अनंतात विलीन झाला... तो सगळ्या भारतीयांच्या मनात कायम घर करून राहिला आहे याची सर्व राज्यांत, सर्व भाषिक वृत्तपत्र, वाहिन्या, सोशल मीडियावरील भरभरून कौतुक करणाऱ्या बातम्या ऐकून, वाचून प्रचीती आली.

त्यानं अनेक भावी वैज्ञानिक तयार करण्यात मोठा सहयोग दिला आहेच. मराठीतून मनोरंजक विज्ञानकथासंग्रह प्रसिद्ध केले. सर्वसामान्यांनाही आकाशाचं निरीक्षण करण्यासाठी प्रवृत्त केलं.

दादाचं क्रिकेटवरचं अपार प्रेम बघून आम्हाला मजा वाटत असे. जुन्या जुन्या सामन्यातले किस्से सहजपणे आठवून मग माझे पती वासुदेवांबरोबर चर्चा होत असे. अगदी सध्याच्या तरुण खेळाडूंचीही त्याला माहिती होती.

लहानपणी वाराणसीच्या त्यांच्या बंगल्याच्या आवारात टेनिसचं कोर्ट होतं आणि सगळे आवडीनं टेनिस खेळायचे हे मी माझ्या वडिलांकडून एकेलेलं होतं. पुढे जयंतदादानं 'आयुका'त क्रोकेट ह्या खेळासाठी सोय केली होती. अभ्यासाव्यतिरिक्त दादाची खेळांची ही आवड आज सांगावीशी वाटते.

गेल्या आठवड्यात आमच्या काचेच्या भांड्यावरचं प्लास्टिकचं झाकण वाफेनं घट्ट बसलं होतं. निघतच नव्हतं. मग काय! टाचणीनं सूक्ष्म भोक पाडून वाफ घालवली आणि आरामात उघडलं. दादाच्या विज्ञानाच्या गमतीजमतींचा असा वापर आम्ही नेहमी करायचो तेव्हा त्याची आठवण यायची

आणि पुढेही येत राहील.

जेवणाच्या टेबलावर हात वाळून गेले तरी चालणाऱ्या मंगलावहिनी आणि दादा यांच्याबरोबरच्या न संपणाऱ्या गप्पा कायम लक्षात राहतील.

दोन वर्षांपूर्वी असंच जेवताना गणित आणि विज्ञान आणखी कसं सोपं करता येईल, असा विषय निघाला होता. आणि मग 'रोजच्या जीवनातले ह्या विषयाशी निगडित प्रसंग लहानपणापासून शिक्षकांनी गोष्टी स्वरूपात सांगावेत किंवा प्रत्यक्ष अनुभव देऊन शिकवावेत. मजेदार गोष्टी-गाणी वापरली तर आणखी मुलांना शिकावंसं वाटेल', असा काहीसा तोडगा मी आणि मंगलावहिनींनं काढला होता.

दादा शांतपणे ऐकत होता. त्यानं मराठी भाषा सोपी करून विज्ञानकथा लिहिल्या आहेत हे आम्ही विसरलो होतो. मग आठवून सगळे हसलो. असे कित्येक प्रसंग डोळ्यांसमोर येताहेत.

दादाच्या गीता, गिरिजा आणि लीलावती ह्या तिन्ही कन्या आय.आय.टी.त शिकून अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन शैक्षणिक तसंच आय.टी. क्षेत्रात नारळीकर आडनाव सार्थ करत आहेत. अत्युच्च शिक्षित असले तरी साधी वागणूक असलेले जावई आणि कुशाग्र बुद्धी असलेली नातवंडं अभ्यासेतर क्षेत्रात चमकताना पाहून वाटतं की ताईआत्या आणि तात्यासाहेब असते तर कृतकृत्य झाले असते.

जयंतदादाला भारतात परत बोलावून घेतलं तेव्हा तो केंब्रिजचा एक उगवता तारा होता, मात्र तिथले पाश तोडून तो आणि मंगलावहिनी सहजपणे भारतात परत आले. टी.आय.एफ.आर.मध्ये आपलं आयुष्य सुरू केलं. उगाचच परत आलो असं त्या उभयतांकडून कधीही कुणीही ऐकलं नाही. टी.आय.एफ.आर.नंतर पुण्यात 'आयुका'च्या पायाभरणीपासून आजच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या संस्थेचा जनक असं दादाला ओळखलं जातंय.

सातत्यानं वाचन, लेखन, मार्गदर्शन करत आपलं निवृत्तीनंतरचं जीवन मंगलावहिनींसह समाधानात व्यतीत करत होता. अचानक मंगलावहिनीचा कर्करोग पुन्हा बळावला आणि मुली, आम्ही नातेवाईक असूनही दादा एकटा पडला.

तरीही स्वतःला सावरून घेत लेखन जोमात सुरू केलं. आम्हाला चांगले लेख वाचायला मिळत होते, पण नियतीचा संकेत वेगळा होता.

झोपेतच जयंतदादानं अखेरचा श्वास घेतला. आमचा निरोप न घेताच गेला हे शल्य मनात आहे.

'जाताना तुम्ही मागे काय सोडून जाता?' तर ह्यापुढं जयंतदादाचं उदाहरणं आमच्यासमोर असेल.

दादा गेल्यापासून सर्वत्र त्याच्याबद्दल, त्याच्या विविध आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या संशोधनांबद्दल, त्याच्या साहित्य सफरीबद्दल आणि एक चांगला माणूस म्हणून त्याच्या जीवनात आलेल्या व्यक्तींनी लिहिलेल्या आठवणी असं सर्व प्रकारचं लिहून आलंय. येत राहिलंही..


आणि माझ्या आठवणीत नेहमी असेल-

जगप्रसिद्ध वैज्ञानिक, खगोलशास्त्रज्ञ, लेखक डॉ. जयंत नारळीकर - भारताचं आणि आपल्या महाराष्ट्राचं भूषण असलेला प्रेमळ, निगर्वी, दुसऱ्यांचं मनापासून कौतुक करणारा, मितभाषी आणि ठाम, तितकाच मिश्किल आणि प्रेमळ, वैज्ञानिक दृष्टिकोन अढळ ठेवून जीवन जगत समाजातील न पटणाऱ्या रूढी दूर करून आमच्यासमोरचा आदर्श असलेला, माझा जयंतदादा!

**- सुधा हुजूरबाजार-तुंबे**
sudha.tumbe@gmail.com

॥ग्रंथाली॥

**चिंतन**
**भाग ६**




**शरद काळे**

**मूल्य ६५० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये**

# युरोपीय मराठी संमेलन २०२५

## डॉ. अस्मिता व डॉ. नितीन पटवर्धन

आपल्याला जर कोणी विचारले, की ''मराठी माणूस युरोपात मराठी कशी जपतो?'' तर त्याचे खरेखुरे उत्तर म्हणजे – युरोपीय मराठी संमेलन!

२०२५ साली, हाच संस्कृतीचा महोत्सव नव्या जोमानं, नव्या कल्पनांच्या संगतीनं आणि देखण्या सांस्कृतिक क्षणांच्या साक्षीने, युनायटेड किंग्डममधील लेस्टर या शहरात ४ ते ६ जुलै या दिवशी पार पडणार आहे. हे केवळ एक संमेलन नाही – ही एक चळवळ आहे. परंपरेला कवेत घेणारी आणि आधुनिकतेशी आपुलकीने संवाद साधणारी, ही मराठी वृत्तीची सजीव साक्ष आहे.

*इतिहासाच्या पाऊलखुणा – अमेरिकेपासून युरोपपर्यंत*

मराठी संस्कृतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावर जतन आणि संवर्धन व्हावे, या ऊर्मीने १९९०च्या दशकात अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) अस्तित्वात आले. त्याच प्रेरणेतून, १९९८ मध्ये नेदरलँड्समध्ये पहिल्या युरोपीय मराठी संमेलनाची पहाट झाली. २०००पासून ही परंपरा दर दोन वर्षांनी युरोप किंवा यूकेमध्ये नवनवीन रंग घेऊन साजरी होत आली आहे. ह्यामधून शेकडो मराठी कुटुंबांनी एकमेकांशी नाते जोडले, आपली ओळख जपली आणि नव्या पिढीला आपल्या मातृभाषेचा, आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटावा, अशी शिदोरी दिली.

*युरोपीय मराठी संमेलन (इएमएस) २०२५ – सात वर्षांनंतर पुनरागमन होत आहे*

मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन, युरोपभर विखुरलेल्या मराठी भाषकांना एकत्र आणणे, आणि आपल्या पुढच्या पिढीत या परंपरेविषयी आत्मीयता, आपुलकी आणि अभिमान जागवणे – हे या पर्वाचे खरे ध्येय आहे.

हे व्यासपीठ शिक्षण, साहित्य आणि कला यांचे संमेलन आहे. इथे फक्त रंगमंच सजत नाही, तर विचार फुलतात, संवाद घडतात, आणि मराठी अस्मितेला नवसंजीवनी मिळते. नव्या पिढ्यांना जोडणारा हा एक सांस्कृतिक सेतू आहे – मनाशी आणि मातीशी. यासोबतच समाजाप्रती आपली बांधिलकी जपत हे व्यासपीठ विविध सामाजिक उपक्रमांना व धर्मादाय संस्थांना मदत करण्यासाठीही पुढे येते.

*स्त्री सक्षमीकरण हे या इएमएसचे ब्रीद आहे.*

या वर्षीच्या इएमएस २०२५ मध्ये, लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर आणि प्रा. डॉ. विद्या येरवडेकर ह्या प्रमुख पाहुण्या आहेत

माधुरीताईंचे सैनिकी वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च योगदान आणि विद्याताईंचे शिक्षणक्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण कार्य, या दोघींमुळे संमेलनाची शान आणखी वाढणार आहे.

विशेष म्हणजे, 'गौरवी' या स्त्रीशक्तीवर आधारित पॅनेल डिस्कशनमध्ये या दोन मान्यवरांचा सक्रिय सहभाग असेल. हा परिसंवाद केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता, नव्या विचारांना प्रेरणा देणारा आणि युवा पिढीसाठी दिशा दर्शवणारा ठरेल.

*उत्साहाचे आणि सर्जनशीलतेचे पर्व*

लेस्टरच्या ऐतिहासिक अथेनामध्ये, ४ जुलैच्या दुपारी नोंदणीसह सुरू होणारा हा प्रवास गणेशपूजन आणि एक स्वागतसोहळा याने सजेल. त्यानंतर युरोप आणि यूकेमधील हौशी कलाकारांचा मुक्त रंगमंच खुला होईल, तर भारतातून आलेले नामवंत कलाकार आपल्या सादरीकरणांनी रसिकांच्या मनात घर करतील.

सत्यजित पाध्ये यांच्या बाहुल्यांमधून गप्पा, आणि 'सूर लय भारी' ही संगीतसंध्या – रोहित राऊत, जुईली जोगळेकर, मेघना एरंडे आणि वैशाली सामंत यांच्या स्वरांत साकार होईल.

शनिवारी, ५ जुलैपासून सांस्कृतिक सत्रांचा ओघ सुरू

होईल. पारंपरिक लोककलांची बहार, नाट्यप्रयोग, लोकसंगीत, कविता आणि चर्चासत्रांच्या रूपात मराठी अभिव्यक्तीची विविध रूपं आपल्यासमोर प्रकट होतील. संध्याकाळच्या सत्रात हास्य आणि आनंदाने सजलेली मैफल हास्यरसिकांच्या मनात हलकेच हास्याची कारंजी निर्माण करतील.

रविवारी, ६ जुलैला, हा सोहळा एका भक्तिरसपूर्ण नादात संपेल - आषाढी एकादशीच्या निमित्ताने अभंगवारी साजरी होईल.

भक्तिरसात न्हालेले नृत्यगायन आणि सर्व सहभागींसाठी खास महाराष्ट्रीय उपवास / भोजन - हे सगळे काही अविस्मरणीय असेल.

*इएमएस २०२५ : एक संवाद, एक प्रेरणा*

इएमएस २०२५ ही केवळ सादरीकरणांची मैफल नाही - ती एक संवादाची जागा आहे. ती मुलांसाठी प्रेरणास्थान आहे, आणि युरोपभर विखुरलेल्या मराठी कुटुंबांसाठी आपुलकीचा, स्नेहाचा, आणि आपल्या मातीच्या ओलाव्याचे एकत्रित स्पंदन आहे.

'जिथे जाल, तिथे मराठी सांभाळा' ही एक भावना आहे- जिच्यात मराठीपणाचा अभिमान आहे, सांस्कृतिक एकोप्याचे बळ आहे, आणि आपण कोठेही असलो तरी आपल्या मुळाशी असलेली घट्ट नाळ आहे.


जग बदलते, ठिकाणे बदलतात - पण आपली भाषा, आपली ओळख आणि आपल्या मातीचा सुवास कायमच हृदयात दडलेला राहतो.

इएमएस २०२५ हे त्या नात्याची गोड आठवण करून देणारे एक भावस्पर्शी पर्व आहे.

चला तर मग, आपण सगळेच लेस्टरमध्ये भेटूया - मराठी संस्कृतीचा हा लोभस सोहळा एकत्र अनुभवायला!

●


## एनसीपीए व ग्रंथाली आयोजित डॉ. आशुतोष कोतवाल यांची मुलाखत



एनसीपीएमध्ये नुकतीच डॉ. आशुतोष कोतवाल यांची मुलाखत झाली. जागतिक स्तरावर मूलकण वैज्ञानिक म्हणून त्यांनी मिळवलेले यश मोठे आहे. या कार्यक्रमात कोतवाल यांनी त्यांच्या संशोधनाबद्दल सादरीकरण केले. त्यानंतर त्यांच्याशी 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ, अमोल दिघे, जेरी पिंटो, सुहास नाईक-साटम यांनी संवाद साधला. ज्येष्ठ पत्रकार-संपादक कुमार केतकर चर्चेच्या मुख्य स्थानी होते. विश्वाची निर्मिती हा कायमच कुतूहलाचा विषय आहे. त्यावर वेगवेगळ्या काळात शास्त्रज्ञांनी सिद्धांत मांडले आहेत. डॉ. कोतवाल यांच्या संशोधनाची घेतली गेलेली दखल भारतीयांना अभिमानास्पद आहे. श्रीहर्ष फेणे यांच्या पुढाकाराने एनसीपीए आयोजित या कार्यक्रमात ग्रंथालीचा सक्रिय सहभाग होता. त्याला डॉ. सुजाता जाधव, नयन काळे, सिद्धार्थ देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

एनसीपीएच्या 'पेज टू स्टेज'अंतर्गत 'पुत्र व्हावा ऐसा' या आशुतोष कोतवाल यांच्या आई माणिक कोतवाल यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे जेरी पिंटो यांनी केलेले इंग्रजी रूपांतर प्रकाशित केले. त्याचवेळी ग्रंथालीने तयार केलेली आशुतोष कोतवाल यांचे 'व्यक्तित्व आणि कार्य' सांगणारी पुस्तिकाही प्रकाशित झाली.

●



# पुस्तकांची घरे

**रामदास भटकळ**

माझा जन्मच मुळी पुस्तकविक्रेत्याच्या घरात झाला. मी गमतीने म्हणतोदेखील की जर बाळाचा जन्म आईऐवजी बाबांच्या पोटी होत असता तर मी पॉप्युलर बुक डेपोतच जन्मलो असतो; निदान माझे बाळकडू पुस्तके हेच होते. दुकान वडिलांच्या मालकीचेच असल्याने कोणतेही पुस्तक सहज घरात आणता येत असे. पॉप्युलर संस्थेची सुरुवात जरी १९२४ मध्ये मेडिकल पुस्तकांच्या विक्रीने झाली तरी मला समजू लागेपर्यंत ते दुकान लॅमिंग्टन रोडवर 'नेशन्स कंप्लिट बुकशॉप' म्हणून मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित झाले होते शालेय पुस्तकांपासून संदर्भग्रंथांपर्यंत सर्व पुस्तके या दुकानात प्रत्यक्ष मिळतात तरी किंवा ती निदान मिळवून दिली जातात अशी या दुकानाची ख्याती होती. पॉप्युलरमध्ये इंग्रजी पुस्तकांची रेलचेल होती, तर १९४८ मध्ये गिरगावातील बॉम्बे बुक डेपो वडिलांनी विकत घेतल्यावर पुढील दोन वर्षांत ते 'मराठी पुस्तकांचे माहेरघर' ठरले, ही माझ्यातल्या वाचकाची चंगळ!

पुस्तके वाचून पुन्हा विक्रीला ठेवता येतात याची जाणीव असल्याने पुस्तके जपून वाचण्याची सवय लागली. हलवाई स्वतःच्या दुकानातली मिठाई खात नाही असा प्रवाद आहे, पण मी दुकानदार नसून मालकाचा मुलगा होतो. आमच्या घराजवळच्या रॉबर्ट मनी हायस्कूल या मिशनरी शाळेत वर्ग लहान म्हणजे पस्तीस विद्यार्थ्यांचे असायचे. सुळे, मुर्डेश्वर, पदमजी, पनिक्कर, फाटक, फडकर असे शिक्षक अजून आठवतात. ते अभ्यासू आणि आनंदी असायचे. फक्त पाट्या टाकायच्या अशी त्यांची वृत्ती नसायची. ते मन लावून शिकवायचे आणि अवांतर वाचनालाही प्रवृत्त करायचे. प्रत्येक वर्गाचा असा छोटासा निवडक पुस्तकांचा ग्रंथसंग्रह असायचा आणि वर्गाचा मॉनिटर ती पुस्तके विद्यार्थ्यांना आलटूनपालटून वाचायला द्यायचा. काही उत्तम पुस्तकांचा परिचय या संग्रहातून झाला.

घरातले वातावरणही पारंपरिक शिक्षण आणि अवांतर वाचन यांना पोषक होते. माझे आई-वडील कॉलेजात जाऊन शिकले नव्हते, पण शिक्षणाचे महत्त्व जाणत होते. मोठा भाऊ माझ्यापेक्षा तेरा वर्षांनी मोठा. तो एमए.एलएलबीपर्यंत शिकला. तो कवी होता आणि लेखन-संपादन करायचा. त्याने इंग्रजीतून लिहिलेली किंवा संपादित केलेली पुस्तके मी शाळेत असतानाच प्रसिद्ध झाली होती. आमच्या इंग्रजी प्रकाशनाचा व्याप त्याने वाढवला होता. माझी बहीण रोहिणी समाजशास्त्र घेऊन एमए झालेली होती. सगळ्यात म्हणजे आमच्या वर्गात बरीच हुशार मुले होती. त्यांच्याशी पुस्तक वाचण्याची चढाओढ, चर्चा यामुळे वाचनाला गती मिळायची. माझा मित्र चंदू वागळे आणि मी वाचलेल्या पुस्तकांची यादी लिहून ठेवत असू. वर्षातून अलेक्झांडर ड्युमा, वॉल्टर स्कॉट अशांच्या निदान पन्नास मोठ्या इंग्रजी कादंबऱ्या वाचल्याची नोंद आठवते. बहुतेक मित्रमंडळी शाळेच्या आसपास राहत, त्यामुळे आमचा प्रवासात निष्कारण वेळ जात नसे.

आमचा जन्म स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा; त्या पिढीची जडणघडण फार वेगळ्या वातावरणात झाली. ग्रँट रोडच्या आनंदाश्रम वाडीत कधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तर कधी राष्ट्र सेवा दल आणि अखेरीस राजकारणात न गुंतलेली सारस्वत ॲथलेटिक लीगच्या व्यायामशाळेची शाखा यांमुळे बौद्धिके आणि सांस्कृतिक कार्यक्रम, नाटुकली इत्यादी सातत्याने होत असत. इतर राजकीय आणि सामाजिक चळवळी चालूच असायच्या. त्यात आम्ही मुलेही सामील होत असू. सेवादलाच्या वाचनालयातून एकदा विनोबा भावे यांचे 'मधुकर' पुस्तक वाचायला घेतले. त्या वयात फार समजले नाही; पण पुस्तक परतायला गेलो तेव्हा साथी राजाध्यक्ष काय वाचले आणि काय समजले ते सांगितल्याशिवाय सोडेनात.

या सवयीमुळे वाचनाची गोडीच नव्हे तर तळमळ वाढली. आतादेखील कुठेही पुस्तके दिसली की ती निदान चाळल्याशिवाय चैन पडत नाही. कॉलेजात गेलो तेव्हा मित्र

शोधले तेही वाचनप्रेमी निघाले. त्यांपैकी कोणाला इतर व्यसने असलीनसली तरी मी फक्त साहित्य आणि रंगभूमी या दोन व्यसनांचा संसर्ग होऊ देत असे.

कॉलेजात मी हुशार विद्यार्थी समजला जात असे, तरी माझ्या अवांतर वाचनाच्या आणि व्यासंगाच्या मुळेच मला परीक्षेत गटांगळ्या खाव्या लागल्या होत्या! तरी त्या चौफेर वाचनाचा आयुष्यात आणि नंतर माझ्या प्रकाशकीय कामात बराच उपयोग झाला. शिवाय माझी ज्ञानाची भूक वाढता वाढता मी एमए, एलएलबी तर झालोच; शिवाय कामातून बाजूला झाल्यावर 'गांधी आणि त्यांचे विरोधक' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरकीचे शेपूट मिळवले.

फक्त एकदा गांधीविचारांच्या मागे लागलो आणि त्यात रमलो की इतर वाचन कमी झाले. गेल्या पंधरा वर्षांत माझा अवांतर वाचनाचा आणि मराठी साहित्याचा व्यासंग नगण्य झाला आहे.

त्याच काळात मी संगीतात गुंतत गेलो. माझ्या सहज प्रवृत्तीनुसार फक्त गाण्याची तालीम न घेता त्या विषयावरील बरीच पुस्तके वाचली, प्रकाशितही केली, 'विष्णू नारायण भातखंडे – व्यक्ती आणि कार्य' नावाचे एक मराठीतून स्वतंत्र पुस्तकही लिहिले.

लेखन, वाचन, प्रकाशन, अनुवाद, संपादन या सर्वांमुळे माझ्या जीवनाला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. माझे घर पुस्तकांनी भरले आहे. त्यातील बहुतेक मी पूर्णतः किंवा अंशतः वाचली आहेत. नाइलाजाने आता पुस्तके निरनिराळ्या वाचनालयांना देत असतो. खरे तर ती अधिक लोक वाचतील याचा आनंद मला व्हायला हवा, पण माझी पुस्तकांची हाव काही सुटत नाही. पुस्तके घरातून निघाली की क्लेश होतात.


पॉप्युलर आणि बॉम्बे या आमच्या दुकानांत सेकंड हँड पुस्तके ठेवत नसत. त्यामुळे क्वचित दुर्मिळ पुस्तकांसाठी शोधाशोध करावी लागत असे. वाचण्याआधी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, एशियाटिक सोसायटी, मणिभवन गांधी संग्रहालय, नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स आणि अनेक मित्रमंडळी यांचे साहाय्य असायचेच.

शालेय आणि कॉलेजातल्या दिवसांत जी पुस्तके वाचली त्यांनी मी घडत गेलो, असा माझा विश्वास आहे. कोणत्या टप्प्यावर तुम्ही काय वाचता यावर तुमची जडणघडण अवलंबून असते. इंग्रजीतून जी क्लासिक म्हणजे अभिजात समजली जातात अशी बरीच पुस्तके तेव्हा वाचली म्हणून रॉबिन्सन क्रूसो, गलिवर, सिंदबाद ही मंडळी माझ्या अस्तित्वाचा भाग बनली. नंतरच्या काळात जेन ऑस्टिन, शार्लट ब्रोंटे, चार्ल्स डिकन्स यांची पुस्तके मी वाचली म्हणून श्रीमंत झालो. नंतर ती माझ्याकडून वाचली गेली असती की नाही माहीत नाही. काळानुसार ही यादी बदलेल. यांत युरोपीयन, जपानी, भारतीय अशा पुस्तकांची भर पडेल. तरुण वयातच शक्यतो ही अभिजात पुस्तके वाचावीत असे मला तीव्रतेने वाटते.


मोबाइलच्या युगात पुस्तकांचा परिचय वेगळ्या माध्यमातून होऊ लागला. 'पुस्तकप्रेमी' या समूहातून निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकांशी परिचय होऊ लागला. अभिजात साहित्याने लालचावलेला मी वाचकांना तात्कालिक महत्त्वाची पुस्तके मोठ्या प्रमाणावर आवडतात हे वाचून चक्रावून जात असे. हळूहळू पुस्तकाच्या विविधतेचे कौतुक करायला शिकलो.





लिहिता लिहिता काही नंतर वाचलेल्या पुस्तकांची आठवण आली. प्रेमाचे शारीर रूप माहीत नव्हते, संस्कारांमुळे पटतही नव्हते तेव्हा. 'Lady Chatterly's Lover' (D. H. Lawrence), 'God's Little Acre' (Erskine Caldwell), Madame Bovary' (Gustav Flaubert), 'The Genius and the Goddess' (ldous Huxley) अशा काही पुस्तकांच्या वाचनाने मला दिशा मिळाली. 'Old man and the Sea' हे तर सर्वांच्याच आवडीचे पुस्तक.





मराठीतून मी शेकडो पुस्तकांचे हौसेने प्रकाशन केले. प्रकाशनासाठी लेखन निवडताना अभिजातता हा महत्त्वाचा निकष मानल्याने त्यातील अनेक पुस्तके ही साहित्याच्या इतिहासात दीपस्तंभासारखी शोभतात. मीच प्रकाशित केलेल्या पुस्तकांबद्दल मी किती बोलावे?







'लोकमत'मधून 'पुस्तकाच्या जन्माची गोष्ट' अशी लेखमाला मी लिहीत आहे. त्यानिमित्त १९५२ पासूनच्या अनुभवांना उजाळा देत असतो.

लाखो पुस्तकांशी विक्रेता म्हणून, हजारोंशी वाचक या नात्याने आणि शेकडो मराठी आणि इंग्रजी श्रेष्ठ पुस्तके प्रसिद्ध केल्यावर काही किमान पुस्तकांची शिफारस करणे कठीण खरे तरी थोडासा प्रयत्न करतोच.




पुस्तकांच्या जगत मला भेटलेले लोक यासंबंधी लिहायचे तर हजारो पानांचे आत्मचरित्र लिहावे लागेल. भारताचे राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, विरोधक यांच्यापासून इंग्लंडच्या पंतप्रधान ॲटलीपर्यंत अनेकांना भेटण्याची संधी मिळाली. जयप्रकाश नारायण, रफिक झकेरिया, मुल्कराज आनंद, दामोदर कोसंबी, प्रा. गोविंद सदाशिव घुर्ये, प्रा. अक्षयकुमार देसाई, अशा अनेकांशी दीर्घकाळ संबंध आला. प्रा. सातोसकर हे फार्माकॉलॉजीवरील क्रमिक पुस्तकाचे लेखक; गेली पन्नास वर्षे त्यांच्या क्रमिक पुस्तकावर पॉप्युलरचा डोलारा उभा राहिला. आता शहाण्णवाव्या वर्षीही ते नवीन आवृत्तीवर काम करताहेत.




अरुण शौरी, ख्वाजा अहमद अब्बास, ए.जी. नुरानी अशा अनेक इंग्रजीतून लिहिणाऱ्यांचे किस्से आहेत. ज्यांची पुस्तके प्रसिद्ध करण्याची संधी मला मिळाली नाही अशा लीला चिटणीस, श्री.ना. पेंडसे, व.पु. काळे, पु.ल. देशपांडे आशांशीही परिचय होता. कोणत्याही गावी गेलो की तेथील लेखक कलावंतांना भेटणे हा माझा छंदच होता. मी पुस्तके प्रसिद्ध करताना माझ्या लेखकांना गुरू आणि सहकारी मानले. त्यांतील अनेकांसंबधीचे माझे नाते यांची नातेचित्रे मी 'जिगसॉ', 'जिव्हाळा' आणि 'जिज्ञासा' या माझ्या पुस्तकांतून लिहिली आहेत.

पुस्तकांत अशा प्रकारे डुंबलेला मी, काय वाचावे ते कसे सांगणार? तरी धाडस करून काही मोजक्या पुस्तकांबद्दल बोलतोच.

सध्या मी गांधीमय असल्याने सुरुवातीलाच त्यांच्या एका पुस्तकाचा उल्लेख करतो. 'हिंद स्वराज्य' हे त्यांनी मूळ गुजरातीत लिहिले तरी त्यांनीच केलेला इंग्रजी अनुवाद 'Indian Home Rule' प्रत्येकाने वाचलाच पाहिजे. जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नव्हे तर एक इतिहासाचे अभ्यासक म्हणून त्यांनी तुरुंगात लिहिलेले 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे मूळ इंग्रजीतच वाचले पाहिजे.

मराठी पुस्तकांतील माझ्या आवडत्या पुस्तकांची यादी फार मोठी आहे. त्यांपैकी लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे'सारख्या पुस्तकांची श्रेयस आवृत्ती आम्ही काढताना अशी अगणित अभिजात पुस्तके उपलब्ध करून घ्यायची असे ठरवले. तेव्हा संपूर्ण श्रेयस मालिका तर वाचायलाच हवी. त्याशिवाय दुर्गा भागवत यांची 'ऋतुचक्र' व 'व्यासपर्व', विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' कादंबरी आणि 'एक झाड आणि दोन पक्षी' हे आत्मचरित्र, जी.ए.कुलकर्णी यांचे कथासंग्रह. (निदान निवडक कथांचे 'रक्तमुद्रा') अशा किती पुस्तकांचा उल्लेख करावा? नाट्यसंहितांबद्दल मला विशेष प्रेम. निदान भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांची 'जिवाशिवाची भेट' व 'भूमिकन्या सीता' आणि वि.वा. शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' ही तरी वाचा की!

**– रामदास भटकळ**

ramdasbhatkal@gmail.com

## पुढील अंक दिवाळी विशेषांक

लिहीत आहेत – डॉ. उज्ज्वला दळवी, दिवाकर देशपांडे, समीर कर्वे, विजयराज बोधनकर, प्रशांत कुलकर्णी, अपर्णा पाटील, अमोल साळे, अश्विनी भोईर, सुवर्णा साधू, विजयालक्ष्मी मणेकरीकर यांच्यासह आणखी काही लेखक... विविध विषय...

शिवाय

माणिक वर्मा आणि श्रीनिवास खळे यांच्या जन्म शताब्दीवर्षानिमित्त विशेष लेख....

कथा आहेतच..



# पुस्तक हाती धरा!


मेधा आलकरी

घरातील प्रत्येक खोलीत पुस्तकांचं मोठं कपाट असावं, तिथे विषयवार लावलेली सगळी पुस्तकं नांदावीत आणि तरीही जागा पुरत नाही म्हणून फक्त पुस्तकं ठेवण्यासाठी खालच्या मजल्यावरील घर भाड्याने घ्यावं अशा एका पुस्तकप्रेमी कुटुंबाच्या घरी मुलाखतीच्या निमित्तानं जायचा योग आला. हे घर आहे स्त्रीमुक्ती संघटनेच्या संस्थापक-सदस्य शारदा साठे यांचं.

ही पुस्तकसंपदा त्यांची आणि त्यांचे पती, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांची. लहानपणापासून वाचनाचा खोल संस्कार शारदाताईंवर झाला. विशेषतः त्यांच्या आजोळी. त्यांचे आजोबा वाचनवेडे आणि इतरांनाही पुस्तक वाचण्यास उद्युक्त करणारे. मुख्य म्हणजे काय वाचावं आणि काय वाचू नये असा कुठलाच निर्बंध या घरी नव्हता. शारदाताई म्हणतात, आमचं पूर्ण घर बाबूराव अर्नाळकर यांची पुस्तकं वाचत असे. 'झुंजार', 'धनंजय' ही पुस्तकमाला चार आण्यात मिळत असे. त्यात मनोरंजनाबरोबर नैतिकता होती असं त्या म्हणतात. त्याच काळात म्हणजे साधारण एकोणीससे पन्नास सालानंतर त्यांनी 'टारझन' पुस्तकाची मराठी भाषांतरं वाचून काढली. हा कॉमिक्स किंवा चित्रमय पुस्तकं यायच्या आधीचा काळ. या गोष्टींच्या पुस्तकाचे दहा मोठे भाग होते. त्याची पारायणं केल्याची आठवण शारदाताई अगदी अभिमानानं सांगतात.

संस्कारक्षम वयात वाचनाचा संस्कार मुख्यत्वेकरून शाळांमधून होतो. चौथीपर्यंत महानगरपालिकेच्या शाळेत झालेल्या शिक्षणातही तेथील टिळक वाचनालयानं हा संस्कार केला. मात्र चेंबूर विद्यालयातील त्यांचे शिक्षक आणि तेथील लायब्ररी यांना त्या वाचनाच्या संस्काराचं पूर्ण श्रेय देतात. तिथलं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक वर्गासाठी पुस्तकांची एक पेटी होती. ती वर्गभर फिरायची आणि त्यातली सगळी पुस्तकं मुलं वाचत असत. शाळेची अतिशय सुसज्ज लायब्ररी होती. ती लावण्याचं काम शारदाताई आपणहून करत असत. पुस्तकांना कव्हर घालणं, क्रमांक देणं, ती ओळीने लावणं हे सारं करताना त्यांनी बरीचशी पुस्तकं वाचून होत असत. नेहरूंच्या आत्मचरित्राचं भाषांतर, सानेगुरुजींची सगळी पुस्तकं, त्यांनी अनुवाद केलेल्या 'यती की पती' यांसारख्या दुर्मिळ कादंबऱ्या, शरदचंद्र चॅटर्जींच्या भाषांतरित कादंबऱ्या उदाहरणार्थ, 'भारती', 'सव्यसाची', 'शेषप्रश्न' असा दर्जेदार पुस्तकांचा ऐवज होता आणि वाचनाची प्रचंड आवड असल्यामुळे त्यांनी ती सगळी पुस्तकं अधाश्यासारखी वाचून काढल्याचं त्या सांगतात. त्या काळात वाचनाला मारक अशी कुठलीही दुसरी माध्यमं नसल्यामुळे सगळा भर वाचनावरच असे. त्यांना मैदानावरील प्रत्येक खेळ खेळणं आणि वाचनालयातील प्रत्येक पुस्तक वाचणं हे दोनच छंद! तुरळक वाहतूक असणाऱ्या चेंबूरच्या रस्त्यावरून त्या पुस्तक वाचत चालत असत. इतकी त्यांची वाचनाची आवड जबरदस्त होती. त्यांना तर शिवणकाम भरतकाम याचीही बिलकूल आवड नव्हती. शाळेतील अभ्यासक्रमात असलेलं शिवणकाम त्यांच्या मैत्रिणी करून देत आणि त्या मोबदल्यात त्यांना या पुस्तकं वाचून दाखवत! ही आपापसातील व्यवस्था त्यांच्या पथ्यावरच पडत असे.

वैचारिक वाङ्मय वाचनाचा पाया शाळेतील वरच्या वर्गात असतानाच घातला गेला. मराठीत भाषांतरित डिस्कव्हरी ऑफ इंडिया, ना. ग. गोरे यांनी लिहिलेलं नेहरूंचं आत्मचरित्र, सानेगुरुजींचं आत्मचरित्र अशा कितीतरी पुस्तकांची नावं त्यांनी सांगितली. शाळेतील अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचनासाठी त्यांच्या वर्गात वाचनाचा तास असे. शिक्षक वाचनासंबंधी मार्गदर्शन करत असत. कुठली पुस्तकं आवर्जून वाचायला हवीत त्याकडे त्यांचं लक्ष असे. काही दीर्घ इंग्रजी किंवा मराठी कादंबऱ्यांची गोष्ट करून ते मुलांना सांगत असत. मुलांना वाचनाची आवड लागावी म्हणून ते सर्वतोपरी प्रयत्न करत असत. शिक्षकांमुळे त्या काळातील सर्वच मुलांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा घडत गेला. स्पर्धा न करता



एकमेकांना पूरक कामं करणं ही अभिनव पद्धत त्यांच्या शिक्षकांनी अंगीकारायला लावली. ज्या मुली अभ्यासात थोड्या कच्च्या होत्या त्यांना शिकवायचं, पाठांतर करून घ्यायचं काम शारदाताईंसारख्या हुशार मुलींना दिलं जाई. शिकवता शिकवता त्यांची उजळणी होऊन विषय पक्का होत असे. शारदाताईंचं घर अतिशय सुसंस्कृत, शिक्षणाला आणि विविध मैदानी खेळांनाही उत्तेजन देणारं असल्यामुळे वाचनाचा संस्कार आधी घरातून आणि नंतर चेंबूर हायस्कूल या शाळेतून झाला. म्हणतात ना – घर ही पहिली शाळा आणि शाळा हे दुसरं घर असतं.

आपल्या आवडीनुसार कॉलेजचा अभ्यासक्रम निवडणं आणि त्यात प्रगती करणं हे सगळ्यांनाच जमत नाही. त्याला विविध कारणं असू शकतात; परंतु शारदाताईंनी इंग्रजी लिटरेचर हा मुख्य आणि मराठी साहित्य हा पर्यायी विषय घेऊन रुईया कॉलेजमधील आपला अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. इथे त्यांना सरोजिनी वैद्य यांच्यासारख्या विदुषी शिक्षक म्हणून लाभल्या. आता मराठीबरोबर त्यांचं इंग्रजी वाचनही जोमानं सुरू झालं. त्यांच्या वाचनाला दिशा मिळाली. वडील ओल्ड कस्टम हाऊसमध्ये नोकरीस होते त्यामुळे त्यांनी मुलींना साधारण साठ सालापासूनच एशियाटिक लायब्ररीचं सदस्यत्व मिळवून दिलं. आजतागायत ही लायब्ररी विविध पुस्तकांचा आणि दुर्मिळ संदर्भग्रंथांचा खजिना म्हणूनच ओळखली जाते. डेव्हिड ससून, ब्रिटिश काउन्सिल या नावाजलेल्या लायब्ऱ्यांची मेम्बरशिप शारदाताईंकडे होती. तिथल्या कॅसेट त्यांना इंग्रजी लिटरेचरच्या अभ्यासासाठी उपयोगी पडत. त्याशिवाय युनिव्हर्सिटी क्लब हाऊसमध्ये जाऊन त्या तिथे असलेले इंग्रजी सिनेमेही पाहत. रुईया कॉलेजमधील लायब्ररीही अतिशय समृद्ध होती. वाचनाची प्रचंड आवड असल्यामुळे जिथे पुस्तकं मिळतील अशा जागांवरील त्यांचा वावर वाढत गेला.

गूढकथांची आवड लहानपणापासूनच असल्यामुळे पेरीमेसन आणि अगाथा ख्रिस्ती यांची सगळी इंग्रजी पुस्तकं त्या वाचत असत. त्याकाळातील गाजलेल्या अभिजात कादंबऱ्या जशा 'गॉन विथ द विंड', 'लॉस्ट होराइझन', ऑस्कर वाईल्डची नाटकं त्यांनी वाचली आहेत. 'लव्ह अँड फिलॉसॉफर' ही तर त्यांची अत्यंत आवडती कादंबरी. त्याची त्यांनी पारायणं केली आहेत. वाचनाबाबतची शारदाताईंची ही सवय मला थोडी वेगळी वाटली आणि आवडलीही. त्या आवडलेलं पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचतात. जशी समज वाढत जाते तसतसे लेखकाचे, पुस्तकातले संदर्भ अर्थ वेगवेगळे जाणवू लागतात. नव्यानं दालनं उघडतात. जेम्स हिल्टनच्या लघुकादंबऱ्यांच्याही त्या वेड्या होत्या. डेव्हिड कोपरफील्ड, चार्ल्स डिकन्स हे तर त्या पिढीचे आवडते लेखक होते. त्या म्हणतात, या सगळ्या साहित्याचा त्यांनी फडशा पाडला आहे. ज्या गोष्टींमध्ये नैतिक आणि तात्त्विक प्रश्न असत त्या कादंबऱ्या आवडू लागल्या आणि मग हळूहळू काल्पनिक कथांकडून तथ्यांवर आधारित वैचारिक वाचनाकडे त्या वळल्या. सायन्स फिक्शनही भरपूर वाचलं. आयझॅक असिमोव्ह या अमेरिकन लेखकाची अशी पुस्तकं त्यांना भुरळ घालत.

कुमार केतकरांशी विवाह झाल्यानंतर त्यांच्या घरात पुस्तकांचा जणू ओघच चालू झाला. विविध विषयांवरील पुस्तकं घरात येऊ लागली. त्या दोघांचं वाचन वेगवेगळ्या प्रकारचं असलं तरी एकमेकांच्या वाचनासंबंधी त्यांना कल्पना असे. वाचनाची आवड हा स्थायीभाव आहे आणि खूप वाचन केल्यानं आपल्याला आपल्या आवडीचा कल उम



जू लागतो त्यामुळे सगळ्या प्रकारचं वाचन करावं अशा मताच्या त्या आहेत. वाचनाबरोबरच शाळेत झालेल्या समाजसेवेच्या संस्कारामुळे शारदाताईंनी आणि छाया दातार यांच्यासारख्या त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी १९७५ साली स्त्री मुक्ती संघटना स्थापन केली. ही पाश्चात्त्य संकल्पना भारतात रुजवण्यासाठी त्यांनी खूप वाचन केलं. प्रामुख्यानं गेल नोवाक या लेखिकेचं. परंतु ही चळवळ भारतात रुजवण्यासाठी आधी स्त्रियांनी साक्षर असणं महत्त्वाचं होतं. शिक्षणाचा प्रसार होणं आवश्यक होतं. आपल्या देशात महात्मा फुले आणि धोंडो केशव कर्वे यांनी कित्येक दशकांपूर्वी स्त्री शिक्षणासाठी जोमानं प्रयत्न केले होते. न्यायमूर्ती रानडे, आगरकर यांनी समाजाचा कडवा विरोध पत्करून आपापल्या पत्नींना शिक्षण दिलं होतं. स्त्रीला स्व-भान येण्यासाठी स्त्री मुक्ती संघटनेनं कलापथक, गाणी गोष्टी, पथनाट्य, 'मुलगी झाली हो'सारखं नाटक, चित्रप्रदर्शनं याचा अवलंब करून शिक्षणासाठी मौखिक परंपरेचा वापर केला. त्यासाठी शारदाताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रचंड वाचन करून भारतीय स्त्रियांना समजेल, रुचेल, पचेल अशा भाषेत ज्ञान देण्याचं शिवधनुष्य उचलावं लागलं. त्यासाठी गाण्यांची पुस्तकं करून त्याचं हिंदीत भाषांतर करून ती अगदी कमी किमतीत बायकांना उपलब्ध करून दिली. शाहीर अमर शेखांची गाणी कामगार समाजातील लोकांना खूप आवडत. वा. वि. भटांची 'अभिनव प्रकाशन' ही पुरोगामी विचारांनी प्रेरित पुस्तकं काढणारी प्रकाशन संस्था. तिथे या समविचारी व्यक्तींच्या बैठका होत. म्हणजे चळवळीच्या काळातही त्यांचं पुस्तकाशी नातं टिकून होतं. तिथली सगळी पुस्तकं शारदाताईंनी वाचून काढली होती. अभिनव प्रकाशन शरदचंद्र चॅटर्जींच्या भाषांतरित कादंबऱ्या छापत असे. तो तर शारदाताईंचा आवडता लेखक.

नवशक्ती या दैनिकात शारदाताईंचं 'क्षितिजावरील शलाका' हे सदर तेव्हा फार लोकप्रिय झालं होतं. त्याचं संकलन होऊन ते पुस्तकरूपात आपल्या पुढे आलं. त्या प्रसिद्ध स्त्री व्यक्तिमत्त्वांवर लिहिताना त्यांना खूप वाचन करावं लागलं. स्त्रीला आजचे व्यक्तिमत्त्व प्राप्त होण्यासाठी, 'अर्ध्या आकाशावर' हक्क सांगण्यासाठी खूप झगडावं लागलं. अशा कर्तबगार महिलांचं कार्यकर्तृत्व या पुस्तकात सांगितलेलं आहे. क्लिओपात्रा, अहल्याबाई होळकर, जिजाबाई, पंडिता रमाबाई, कमला सोहोनी, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, आनंदीबाई जोशी, मेरी ह्युस्टन अशा कित्येकींचा यात समावेश आहे. समाजोपयोगी कामं करणाऱ्या, दुःखितांच्या सेवेत आपलं आयुष्य खर्ची करणाऱ्या, कामगारांच्या प्रश्नांना हात घालून त्यांना सुरक्षितता देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या, वैचारिक बंड करणाऱ्या, तसेच राजकारण, विज्ञान अशा विविध क्षेत्रांत असाधारण कामगिरी करून समाजात मूल्यांची प्रतिस्थापना करणाऱ्या स्त्रियांचं जीवन समाजासमोर ठेवण्यासाठी, या विशाल ऐतिहासिक पटाचं चित्रं हुबेहूब उभं करण्यासाठी त्यांच्या चरित्रांचा, त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास शारदाताईंनी केला. या लेखमालेसाठी पंडिता रमाबाई यांचं हिंदू स्त्रियांच्या स्थितीवर लिहिलेलं पुस्तक, महात्मा फुले यांचं समग्र वाङ्मय त्यांनी वाचून काढलं. चरित्रवाचन हा त्यांचा आवडता प्रांत होताच. शारदाताईंच्या 'पुस्तकांच्या घरात' एका खोलीतील मोठं कपाट हे फक्त त्यांच्या आवडीच्या पुस्तकांनी भरलेलं आहे. चळवळीच्या संबंधांनी लागणारे संदर्भ ग्रंथ, चरित्र अशी विविधता त्यात मला आढळली.

पुढे आधुनिक काळातील कर्तबगार महिलांच्या मुलाखती घेऊन त्यांनी 'कृतज्ञता' या पुस्तकाचं संकलन केलं. अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे यांच्यासारख्या महिलांच्या जीवनातून पुष्कळ प्रेरणा मिळते. तरुण पिढीनं हे जरूर वाचावं. खास करून आजच्या पिढीतल्या लेखकांनी यावरून बोध घ्यावा. अर्थपूर्ण लिखाण करण्यासाठी त्याच्या दसपट वाचन करावं लागतं.


अनुवाद हा साहित्यप्रकार हाताळण्यामागची शारदाताईंची भावना अगदी निर्भेळ होती. त्यांनी जे प्रचंड साहित्य वाचलं होतं त्यातलं भावलेलं साहित्य मराठीत आणायचं आणि मराठी वाचकांना त्याचा आनंद मिळवून द्यायचा. कित्येकदा तर ते छापलं जावं असा आग्रहही नसे त्यांचा. आवडलं म्हणून अनुवाद केला हे त्यांचं साधंसरळ गणित. त्यांनी आपल्या जीवनातील पहिला अनुवाद त्या अकरावीत असताना केला होता. 'सोव्हिएत डेज' या मासिकाकरता 'हाऊ द स्टील वॉज टॅम्पर्ड' या निकोल ऑस्ट्रोवस्की या लेखकाच्या कादंबरीचा तो अनुवाद होता आणि तो छापलाही गेला आहे. अनुवाद करायला त्यांना मनापासून आवडतं. सुनील खिलनानी यांचं 'आयडिया ऑफ इंडिया' यांच्या भाषांतराचं त्यांचं काम चालू आहे आणि 'आयडिया ऑफ जस्टीस' या अमर्त्य सेन यांच्या पुस्तकाचा अनुवाद करण्याची त्यांची इच्छा आहे.

शारदाताईंचा तरुणांसाठी संदेश एकच - काहीही वाचा, पण वाचा! पुस्तक हातात धरा, आपोआप वाचनाची गोडी लागेल. वाचनाचा प्रसार व्हावा या तळमळीतून त्यांनी आपल्याकडील हजारो पुस्तकं अंबरनाथ येथील शाम जोशींच्या ग्रंथालयाला आणि ठाण्यातील इतर ग्रंथालयांना भेट देऊन एक प्रकारे ज्ञानदानाचं कार्य केलं आहे.

वाचनाचा संस्कार हा घरातूनच होतो म्हणूनच शारदाताई यांच्या घरासारखी पुस्तकांनी खचाखच भरलेली 'पुस्तकांची घरं' जन्माला यावीत.

**– मेधा आलकरी**

medhaalkari@gmail.com



# वाचनसंस्कार महत्त्वाचा


**वैभव मांगले**

वाचनाची गोडी तशी लहानपणापासूनच लागली. माझे आई-वडील दोघंही वाचणारे होते. सुहास शिरवळकर, गुरुनाथ नाईक, सुमती क्षेत्रमाडे, बाबूराव अर्नाळकर आदी साहित्यिकांचे ते चाहते होते. ती पुस्तकं काही मी कधी वाचली नाहीत. पण मला असं वाटलं, की वाचन करायला पाहिजे. आमच्या देवरुखमधली लायब्ररी आम्ही लावलेली होती. मला आठवतंय की नववी-दहावीच्या काळात माझ्या हातात पहिले पडले ते श्री.ना. पेंडसे. पु.ल. देशपांडे तर त्यांच्या गोष्टी, त्यांची व्यक्तिचित्रं, नाटकांच्या माध्यमामुळं माहीत होते. वि.स. खांडेकर तेव्हा वाचले गेले. शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांचंही साहित्य वाचलं जात होतं. मला गारूड पडलं ते मात्र पेंडश्यांचं. 'तुंबाडचं खोत' वगैरे पुस्तकं मी दहावी-बारावीत असताना वाचून काढलेली होती. माझ्या वाचनाचा परीघ तेव्हाच मोठा झाला होता. मग नेमाडे आले. खूप सारं दलित साहित्य त्या दरम्यानच्या काळामध्ये वाचलं गेलं. त्यामुळंच कदाचित मला वाचनाची खोली कळली. त्या अर्थानं डायरेक्ट जो काही सूर मारला, तो खोल तळाशी मी जाऊन पोहोचलो होतो. त्यामुळं त्या दृष्टिकोनातून पाहता करमणूक करणारे लेखक कधी फार भावले नाहीत. ज्यांच्या लिखाणात खोली आहे असेच लोक भावत गेले. अशी वाचनाची माझी आवड त्या काळात पुढं पुढं जात राहिली. नंतर खानोलकर वाचनात आले. दळवी आले. प्रकाश संत आले. कविता या प्रकाराशी माझं फारसं नातं जुळू शकलं नाही. त्या दरम्यान काही अनुवाद-भाषांतरंही वाचली गेली.

मला कधी आत्मचरित्रं नाही भावली. कारण मला वाटतं, की त्यात लोक फार तोलूनमापून लिहीत असतात. ते आत्मचरित्र नाही होऊ शकत, ते फार फार तर चरित्र होऊ शकतं. किंवा आयुष्यात जे काही ठळक प्रसंग घडले आणि मला सांगावेसे वाटतात, ते मी सांगितले इतपतच त्याचं महत्त्व आहे. मला कादंबरी हा प्रकार जास्त भावतो. कथाही आवडतात मला; पण कादंबरी जास्ती आवडते, कारण तिचा पट फार मोठा असतो. त्या पटामुळं लेखक जे कादंबरीचं विश्व ताकदीनं उभं करतो, त्यातल्या व्यक्तिरेखा, तो परिसर, पात्रांच्या मनोभावना या वाचकांच्या मनाचा ठाव घेत असतात. म्हणून कादंबरी हा साहित्यप्रकार मला फार आवडतो.

मला प्रवासवर्णनंही वाचायला आवडतात. पुलंपासून मीना प्रभूंपर्यंतची प्रवासवर्णनं मी वाचलेली आहेत. दुर्गाबाई भागवत मला फार आवडतात. वैचारिक लिखाण मला भुरळ घालतं. त्या अर्थानं दुर्गाबाईंचं 'ऐसपैस गप्पा' असेल, 'ऋतुचक्र' असेल, हे असं वैचारिक आणि स्वतःचं भान येऊन जे लेखक लिहितात, काहीएक गमक त्यांना सापडतं किंवा सापडण्याच्या मार्गावर असतं किंवा ते भोवतालाकडं काय म्हणून पाहतात, एकूण सगळ्या मनोविश्वाकडं कसे पाहतात, त्यातून सूक्ष्म, तरल अशा भावभावनांचं जे वर्णन करत राहतात, ते वाचायला मला फार आवडतं. महेश एलकुंचवार मला त्यासाठीच आवडतात. विजय तेंडुलकरांच्या कथा असतील किंवा त्यांचं जे बाकीचं लिखाण आहे तेसुद्धा फार सुंदर आहे. ते अनुभवांतून आलेलं आहे. ज्या पुस्तकांच्या मांडणीमागं काहीएक वैचारिक भूमिका आहे, अशी पुस्तकं मला फार आवडतात.

पुस्तकांनी मला काय दिलं हे शब्दांत सांगता येण्यासारखं नाही. कारण प्रत्येक पुस्तकानंतर तुम्ही स्वतःची अनुभवलेली जी गोष्ट असते, ती अनुभवाच्या पातळीकडून अनुभूतीच्या पातळीवर घेऊन जाणारी गोष्ट असते. ती फक्त पुस्तक आणि तुमच्यामध्येच घडलेली असते. पुस्तक वाचताना अनुभवणं, त्या प्रोसेसमधले आपण जे काही असतो, ते शब्दांत नाही सांगता येऊ शकत. पुस्तकांनी जगण्याचं भान दिलं. सभोवतालच्या वातावरणाचं भान दिलं. जागतिकीकरण, जागतिक युद्धाबद्दलची, राजकारणाबद्दलची पुस्तकं वाचता तेव्हा तुम्हाला भान येत राहतं, की आपण समजतोय तेवढं जग साधंसोपं सरळ चाललेलं नाही. किंवा ते चालवत नाही कुणी. ते चालवण्यासाठी फार



मोठे आणि अत्यंत हिडन अजेंडे असलेले लोक आजूबाजूला आहेत, याचं भानसुद्धा पुस्तकं तुम्हाला देत राहतात. त्यासाठी वाचन फार महत्त्वाचं आहे. अवलोकन महत्त्वाचं आहे. पुस्तकांमुळं तुम्हाला तर्कसंगती कळायला लागते. तुम्ही तार्किक वागायला लागता. जगण्यातलं लॉजिक शोधायला लागता. घडामोडींमधलं लॉजिक शोधायला लागता. मला वाटतं, पुस्तकांमुळंच हे घडत असावं. आपलं मन जे विवेकवादी होतं, त्याचं कारण मला वाटतं पुस्तकंच असावीत. एक कलाकार म्हणून मला वाटतं, की पुस्तकं तुम्हाला कॅरॅक्टर देतात. अभिनयाचे कंगोरे भरायला शिकवतात. लेखक तुम्हांला त्यांच्याबरोबर घेऊन जातात वर्णनांमध्ये. पुस्तकातल्या त्या वर्णनांमध्ये तुम्ही तुमचा गाव वसवता. तुमच्या ओळखीची, आजूबाजूची कॅरॅक्टर त्यात घालता. त्यांना पेहेराव देता. पुस्तकात उभं केलेलं वातावरण तुमच्या मनात तयार होतं. मनाच्या आतमध्ये अभिनयासाठी पोषक अशी बीजनिर्मिती होत असते.

युव्हाल नोआ हरारीचं सेपियन्स पुस्तक मी वाचलं तेव्हा माझा जगाकडे, माणसांकडं बघण्याचा दृष्टिकोनच पूर्ण बदलला. त्याच्याही आधी तो दृष्टिकोन बदलला होता गौतम बुद्धांनी. बुद्धांची शिकवण, त्यांच्या अनेक जातककथा, त्यांच्यावरची अनेक लेखकांची अनेक प्रकारची पुस्तकं – त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धर्मानंद कोसंबी यांचंही पुस्तक आहे– या बुद्धांवरच्या पुस्तकांनी माझ्या विचारांना, माझ्या धारणांना अगदी वेगळं रूप दिलं. स्वरूप दिलं. विचारधारांमध्ये काही आमूलाग्र बदल केले. त्यानंतर मतपरिवर्तन करण्याइतपत ज्याच्यात सामर्थ्य आहे, किंवा बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याचं सामर्थ्य आहे ते युव्हाल नोआ हरारीचं सेपियन्स पुस्तक आहे, असं वाटतं मला.

पुस्तकं वाचायला पाहिजेत, याचं कारण पुस्तकांसारखा मित्र नाही, असं उगाच म्हटलेलं नाही लोकांनी. पुस्तक जवळ असेल तर आजूबाजूला काय परिस्थिती आहे किंवा मनात उद्वेग असेल किंवा अन्य काही गोष्टी असतील तर पुस्तकांमध्ये खूप ताकद आहे तुम्हाला त्यातून बाहेर काढायची. पुस्तकं आनंद देतात. दुःखात साथ देतात. संगीत जसं आपल्या आयुष्यात एक भूमिका पार पाडत असतं, तशीच पुस्तकंही आपल्या आयुष्यात एक भूमिका पार पाडतात. मुलांना वाचनाची आवड लावली पाहिजे. वाचन हा एक गुण आहे. तो गुण कधी कधी वाटतं की आपल्यात असावा लागतो. कारण सगळेच लोक वाचत नाहीत. लहानपणापासून हा गुण मुलांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये भिनवलात, त्याचं महत्त्व त्यांना जाणवून दिलंत, तुम्ही त्यांच्याबरोबर वाचायला बसलात तर त्यांना वाचनाची गोडी लागते. हा अनुभव माझ्या मुलांमुळं मी घेतला आहे. ती रोज वाचत नाहीत पण वाचायला बसली की छान अर्धा–पाऊण तास वाचतात. एकुणात आपल्या मुलांवर स्वच्छता, विवेकवादी, तर्कसंगती, सौंदर्य आदी संस्कारांसारखाच वाचन हा एक संस्कार म्हणून मुलांना द्यावा लागतो.

मी कुठलंही पुस्तक घेऊन वाचत बसू शकत नाही. मला वाचायला जरा बैठक लागते. त्या काळामध्ये मन थोडं स्थिर असावं लागतं. सहेतुक वाचन करायला मला आवडतं. अमुक पुस्तक या कारणांसाठी वाच, असं मला कुणी सांगितलं तर आणि पहिल्या दोन पानांत त्या पुस्तकानं माझा ठाव घेतला तर ते पुस्तक मी दोन दिवसांतही संपवतो किंवा माझ्याकडून फार पटापट वाचून होतं. परंतु असंच कुणी पुस्तक वाचायला दिलं तर मला ते वाचता येत नाही, असा माझा अनुभव आहे.

गावाला असताना आणि मुंबईत आल्यावर मी लायब्ररीतून आणून पुस्तकं वाचत असे. नंतर नंतर लक्षात आलं की पुस्तकं विकत घ्यायला पाहिजे. कारण मराठी वाचक कमी आहेत. त्या अर्थानं चांगल्या मराठी लेखकांची संख्या कमी आहे. मग जी चांगली पुस्तकं आहेत, जे लेखक सातत्यानं चांगलं लिखाण करत आहेत, त्यांची पुस्तकं प्रत्येकानं विकत घेऊनच वाचली पाहिजेत, या मतापर्यंत मी आलो. अशी संदर्भ मिळालेली पुस्तकं मी नेहमी वाचतो. वाढदिवसानिमित्त भेट म्हणून, काम आवडलं म्हणून अनेक मित्रांना मी पुस्तकं देतो. ती कायम ची आठवण म्हणून राहते. 'फॅण्ड्री'मधलं किशोर कदमचं काम मला आवडलं, तेव्हा मी त्याला भैरप्पांच्या मराठी अनुवादित पुस्तकांचा संच भेट म्हणून दिला होता. पुस्तकांमुळं खूप मित्र जोडले गेले. अक्षय शिंपी या चांगल्या कलाकार आणि लेखकाची ओळख पुस्तकांमुळंच झाली. अनेक पुस्तकांतील


संदर्भ मी त्याला विचारत असतो. औरंगाबादच्या दासू वैद्य यांच्याशी पुस्तकांसंदर्भात चर्चा होतात. पुण्याच्या आनंद अवधानी यांच्याशी पुस्तकांच्या संदर्भात अनेक विषयांवर गप्पा होत असतात. रोहन प्रकाशनाची नीता कुलकर्णी ही मैत्रीण खूप छान अनुवाद करते. ती छान पुस्तकं पाठवत असते. पुस्तकांच्या निमित्तानं अनेकांशी ओळखी, भेटीगाठी होतात. मैत्री वाढत राहते.

कुठली पुस्तकं वाचावीत, या संदर्भात अनेक मत-मतांतरं असू शकतात. मला वाटतं, की आपल्याकडं नेमाडे, पेंडसे, सगळं दलित साहित्य हे वाचलंच गेलं पाहिजे. भैरप्पा कन्नड लेखक आहेत, तरी त्यांची पुस्तकं फार छान आहेत. मोहन राकेश, प्रेमचंद, निर्मल वर्मा हे साहित्यिक वाचले गेले पाहिजेत. नारायण धारपांच्या भयकथा, चंद्रकांत खोत, भाऊ पाध्ये यांची पुस्तकं, मधू मंगेश कर्णिक यांची माहीमची खाडी, हृषिकेश गुप्तेंची पुस्तकं, संग्राम गायकवाड यांचं 'मनसमझावन' अशी अनेक पुस्तकं आहेत जी आपल्याकडं वाचली गेली पाहिजेत असं मला वाटतं. ज्या लेखकांचं लेखन सर्वव्यापी होतं, मानवाच्या एकूण सगळ्या भावभवनांशी, त्याच्या जडणघडणीशी आणि दैनंदिन प्रक्रियेशी जे लिखाण जोडलं जातं, ते मला वाटतं मोठं लिखाण आहे. मानवी आयुष्याचं जे चिरंतन दुःख आहे, तो जो शोक असतो, ती खंत असते, ती ज्याच्या लिखाणात येते, तो लेखक मला वाटतं, भावतो आणि तो जागतिक पातळीवरचा होतो. चेकॉव्हच्या कथा वाचताना तो रशियन आहे का, हा फरकच पडत नाही. हेमिंग्वेसारख्या लेखकांचं लिखाण हे कालातीत आणि सर्वव्यापी असतं. अशा लेखकांची पुस्तकं मला वाटतं, वाचली गेली पाहिजेत. त्या अर्थानं आपल्याकडं मला वाटतं, की श्री. ना. पेंडसे दुर्लक्षित आहेत. पण मला वाटतं, ते फार सर्वव्यापी आहेत. पेंडसे थोडेसे बाजूला सारले गेलेत की काय, अशी मला शंका येते. त्यांचं 'कलंदर' वाचा. 'लव्हाळी'सारखं पुस्तक हे जागतिक दर्जाचं आहे, असं मला वाटतं. 'हद्दपार' आहे, 'हत्या' आहे, 'गारंबीचा बापू' तर आहेच आहे. पण 'तुंबाडचे खोत', 'गारंबीची राधा', 'ऑक्टोपस' ही फार सुंदर पुस्तकं आहेत. ती जरूर वाचावीत असं मला वाटतं.

**– वैभव मांगले**
vaibhavmangale@gmail.com

ग्रंथाली


## प्रसादचिन्हे




**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**

**मूल्य १००० रुपये । सवलतीत ६०० रुपये**

## स्मृतिघर




**लेखिका : रेखा जैन**
**अनुवाद : डॉ. वसुधा सहस्रबुद्धे**

**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २४० रुपये**



# पुस्तकांनी उभं केलेलं घर!

**सॅबी परेरा**

मी पहिले पुस्तक कोणते वाचले, कधी आणि कुठे वाचले हे आज मला आठवत नाही. आठवत असलेले वाचलेले पहिले पुस्तक म्हणजे 'रानमुलगा रामू' नावाचे एक गोष्टीचे पुस्तक. पेशाने शिक्षिका असलेल्या आमच्या तेरशीमावशीने तिच्या शाळेच्या ग्रंथालयातून आणलेले हे पुस्तक मी दुसऱ्या किंवा तिसऱ्या इयत्तेत असताना वाचले आणि वाचनाच्या प्रेमातच पडलो. म्हणून लगेच खूप पुस्तकांचे वाचन सुरू झाले असे नाही. आमच्या गावात पुस्तकांचे दुकान किंवा ग्रंथालय नव्हते आणि असते तरी पुस्तके विकत घ्यायची किंवा ग्रंथालयाचे सभासद होण्याइतकी आर्थिक कुवतही नव्हती. शाळेत जाऊन शिकणारे आमच्या खानदानातील आम्ही पहिल्या पिढीचे शिलेदार असल्याने घरातील कुणी वडीलधाऱ्या व्यक्तीने वाचण्यासाठी पुस्तक विकत आणण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे माझे आणि माझ्या भावंडांचे वाचन शाळेतील पुस्तके, घरात येणारे नवाकाळ, संध्याकाळ, तरुण भारत, शिवनेरी यांसारखे उच्चभ्रू न समजले जाणारे पेपर आणि किराणामालाच्या दुकानातून येणाऱ्या सामानाच्या पुडीचा कागद यापुरतेच मर्यादित होते. वाचनाच्या नादामुळे मला पुड्या सोडण्याची सवय लागली की पुड्या सोडण्याच्या सवयीमुळे वाचनाचा नाद लागला हे सांगता येणे अवघड आहे. इयत्ता पाचवी ते सातवी या काळात शाळेतील ग्रंथालयात गोष्टींची पुस्तके मिळू लागली. अकबर-बिरबल, तेनाली रामन, इसापनीती, बायबलमधील गोष्टी, परीकथा अशी पुस्तके शाळेच्या ग्रंथालयात किंवा मित्राकडून उसनवारीवर मिळू लागली. सोबत चांदोबा, चंपक अशी नियतकालिकेही हाती लागू लागली. कधीमधी गावातील तरुण पोरांकडून मिळवलेली सिनेमाविषयक किंवा क्रिकेटविषयक नियतकालिके वाचायला आवडू लागली. दर महिना-दीड महिन्याने न्हाव्याच्या दुकानात बसून मायापुरी किंवा स्टारडस्ट वाचल्यामुळे साहित्यप्रेमी पोरगा अशी माझ्या मनातल्या मनात आणि गावात माझी इमेज तयार होऊ लागली होती.

चांदोबाच्या पानांमध्ये झपाटून टाकण्याची जादू होती. अभ्यासाच्या पुस्तकात लपवलेला चांदोबा वाचताना मी अक्षरशः वास्तव विसरून परीकथांमध्ये हरवून जात असे. 'फास्टर फेणे' वाचल्यावर मला आपणही गुप्तहेर असल्यासारखे वाटायचे. मी घरात, शाळेत, रस्त्याने जातायेताना सगळ्या लोकांकडे, घटनांकडे संशयाने बघत असे. अकबर-बिरबल, इसापनीती, तेनाली रामन यांची पुस्तके वाचल्यावर मित्रांच्या चर्चेत आपण मांडलेल्या मुद्द्याने सगळे निरुत्तर झालेले आहेत किंवा हसून हसून लोटपोट झाले आहेत अशी मला दिवास्वप्ने पडत असत.

आठवीपासूनच्या आमच्या शाळेतील ग्रंथालय मात्र उत्तमोत्तम पुस्तकांनी भरलेले होते. शाळेतील शिक्षकदेखील अवांतर वाचनाला प्रोत्साहन देणारे होते आणि मलादेखील मैदानी खेळांपेक्षा वाचनात अधिक रुची वाटू लागली होती. त्यामुळे इयत्ता आठवी ते बारावी या पाच वर्षांत मी मिळतील तितकी पुस्तके वाचली.


ययाती, कोसला, श्रीमान योगी, मृत्युंजय, रणांगण, छावा, शाळा, श्यामची आई, राऊ, महानायक, स्वामी, फकिरा, पानिपत, युगंधर, बलुतं, उपरा, उचल्या, आमचा बाप आन् आम्ही, आहे मनोहर तरी, तुंबाडचे खोत, वासूनाका, स्मृतिचित्रे, माझी जन्मठेप, एक होता कार्व्हर, व्यक्ती आणि वल्ली, बटाट्याची चाळ, असा मी असामी, माणदेशी माणसे, पार्टनर, बनगरवाडी, एमटी आयवा मारू यांसारख्या अनेक पुस्तकांनी मला भारावून टाकले.

श्रीमान योगी, मृत्युंजय, स्वामी यांसारख्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमुळे कार्यनिष्ठा, धैर्य आणि बलिदान याचे सुंदर दर्शन झाले. ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तिरेखांचे भावनात्मक, सखोल आणि मानवतावादी चित्रण वाचायला मिळाले. देशभक्ती, नेतृत्व आणि दृढनिश्चय यांचा मला प्रेरणादायक अनुभव आला. कर्णाच्या दृष्टिकोनातून महाभारत समजून घेता

आले. ‘ययाति’सारख्या कादंबऱ्यांनी मानवी मनाची वेगळी ओळख करून दिली. आध्यात्मिक पुस्तकांनी शिस्त आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व ठसवले. ‘श्यामची आई’ आणि सानेगुरुजींच्या इतर पुस्तकांनी भावनिक नाते, माणुसकी आणि मनाच्या हळवेपणाचा प्रत्यय दिला. व. पु. काळेंच्या पुस्तकांनी छोट्या छोट्या घटनांतून मनोरंजकरीत्या जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवले आणि रोजच्या आयुष्यात लागू पडतील असे धडे दिले. बलुतं, उपरा, उचल्या, आमचा बाप आन् आम्ही यांसारख्या दलित साहित्याने आपल्या आजूबाजूला मूलभूत हक्कांपासून वंचित असलेला समाज, त्यांचे प्रश्न, त्यांचा विद्रोह आणि जिद्दीने ते आपल्या परिस्थितीवर करत असलेली मात याचे भान दिले. वंचित समाजघटकांबद्दल माझ्या जाणिवा सजग केल्या. प्रेमावर आधारित कथा-कादंबऱ्यांनी माझे तारुण्याचे दिवस अधिक गुलाबी केले. मिरासदार, शंकर पाटील, पु.ल. देशपांडे, आचार्य अत्रे, चिं. वि. जोशी यांसारख्या लेखकांनी जीवनाकडे हसतखेळत पाहण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन दिला. बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथांनी गुंगवून ठेवले. रत्नाकर मतकरींच्या कथांनी मानवी मनाची आणि नात्याची गुंतागुंत उकलून दाखवली. अशा प्रकारे आजवर वाचलेल्या सगळ्याच पुस्तकांनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात माझ्या आयुष्यावर प्रभाव टाकलेला आहे.

पुढे नोकरी-संसाराच्या व्याप-तापात आवडीचे वाचन करण्याऐवजी, कामाच्या गरजेनुसार तातडीचे वाचन करायची पाळी आली आणि वाचनातील उत्स्फूर्तता, उत्कटता हरपतच राहिली. तरीही वाचन सुटले नाही, सुटणार नाही. आज माझ्या वाचनातली नियमितता कमी झालेली असली तरी किमान एक पुस्तक सदैव माझ्या बॅगेमध्ये असते. पुस्तक सोबत असले की प्रवासातील ट्रॅफिक, गोंधळ, गदारोळ, रस्त्यातले खड्डे, गाड्यांचा विलंब, दूरच्या प्रवासातील कंटाळा असे सारे काही विसरायला होते आणि प्रवास सुंदर होतो... रस्त्यावरचा आणि आयुष्याचादेखील!

आज माणसाच्या आयुष्याला मीडिया आणि सोशल मीडियाने घेरले आहे. जगण्यातल्या डिजिटल गदारोळामुळे डोळ्यांना वाचण्यापेक्षा पाहण्याची इतकी वाईट सवय लागली आहे आहे, की वाचण्यासाठी कुणी थांबायला तयार नाही. थांबणे हे क्रियापदच नव्या व्याकरणाने गाळून टाकले आहे. वाचन किती महत्त्वाचे आहे हे नवीन पिढीला समजावून सांगण्यासाठीदेखील व्हिडीओ बनवावे लागतात हे आपल्या पिढीचे प्राक्तन आहे. माझ्या मते, लिहिण्याच्या कलेचा शोध हा आग निर्माण करण्याची कला, चाकाचा शोध या शोधांइतकाच महत्त्वाचा आहे. पुस्तके ही अशी व्यायामशाळा आहे जिथे, कुठलीही ट्रेडमिल न वापरता, घाम न गाळता, माणसांच्या मेंदूचा व्यायाम होतो. पुस्तक वाचण्यासाठी वीज,



इंटरनेट अशी कुठल्याही बाह्य गोष्टींची गरज भासत नाही. कुठल्याही जाहिरातीशिवाय आणि अजिबात बफरिंग न होता लेखकाचे म्हणणे तुमच्या आतपर्यंत पोहोचू शकते. सोशल मीडिया जसा तुम्हाला धोका देतो तशी पुस्तकं तुम्हाला धोका देत नाहीत. पुस्तकं हे असे मित्र आहेत जे तुम्हाला सीन करून इग्नोर करत नाहीत. ब्लॉक करत नाहीत. ॲटिट्यूड दाखवत नाहीत. पुस्तकांसोबतचं नातं लाँग टर्म असतं.

पुस्तकांनी मला घडवले तसे बिघडवलेदेखील. इतर मुले मैदानात खेळत असायची, समाजात मिसळायला शिकत असायची. तेव्हा मी कुठेतरी एका कोपऱ्यात बसून एखाद्या काल्पनिक पात्राच्या मृत्यूवर हळहळत असायचो. इतर मुले क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल अशा खेळातले डावपेच शिकत असायची तेव्हा मी जादूची सतरंजी घेऊन उडण्याची जादू कशी वापरायची, ड्रॅगनशी कसे लढायचे, आणि सतराव्या वर्षी क्रांती कशी घडवायची या मला कधीच न साधणाऱ्या कलांचे पारायण करत असायचो.

कादंबऱ्यांनी मला प्रेमाबद्दल इतकी गोड कल्पना दिली, की प्रत्यक्ष प्रेमात पडलो तेव्हा काही मजाच वाटेनाशी झाली. कुठेतरी काहीतरी कमी असल्याची जाणीव काळीज कुरतडत राहिली. कादंबरीतील नायिका सुंदर असते, सुकेशिनी असते, उंच असते, प्रेमळ असते, कर्तृत्वान असते, प्रेमळ असते, प्रणयात कुशल असते आणि कुटुंबातील सर्वांना सांभाळून घेऊन कुटुंब एकत्र ठेवणारी असते, तेव्हा खऱ्या आयुष्यातली सिमरन कितीही रसरशीत असली तरी कादंबरीतल्या नायिकेपुढे फिकटच वाटते.

पुस्तकांनी मला कर्मयोग शिकवला. माणसाची जात, धर्म, वर्ण हे त्याच्या कर्मावरून ठरतात असे पुस्तकांनी सांगितले, पण लग्नाच्या वेळी मात्र नेमकी जात आडवी आली. पुस्तकांनी मला दुसऱ्यांच्या दृष्टिकोनातून विचार करायला शिकवले त्यामुळे स्वार्थ साधण्यात मी नेहमीच कमी पडतो. ‘व्यक्ती आणि वल्ली’ आणि ‘असामी असामी’ यांसारखी

पुस्तके वाचल्यावर मी लोकांमध्ये 'कॅरेक्टर' शोधायला लागलो. त्यामुळे अनेक गैरसमाजांचा धनी झालो. जीवन, मरण, सण, उत्सव, दुःख या सगळ्याकडे साक्षीभावाने पाहण्याची दीक्षा पुस्तकांनी दिली, पण त्यामुळे नात्यागोत्यातल्या लोकांना मी अरसिक, कोरडा किंवा कठीण हृदयाचा वाटू लागलो. आजूबाजूला कितीही गदारोळ सुरू असला तरी मी शांतपणे पुस्तक वाचू शकतो त्यामुळे माझ्यावर एकलकोंडेपणाचा शिक्का बसला. शेवटचे एकच प्रकरण वाचता-वाचता भल्या पहाटे तीन वाजेपर्यंत जागे ठेवून झोपेचे खोबरे करण्याचे पापदेखील पुस्तकांनीच केलेले आहे. पुस्तकांनी मला खूप काही दिलं... मानसिक गुंतागुंत दिली, कधी कधी ताण दिले, आयुष्यभरासाठी काल्पनिक पात्रांवर जीव लावायची सवय दिली. थोडक्यात काय तर आयुष्याचे खरे सुख कधीच मिळू न देण्याची हमी मला पुस्तकांनीच दिली. असे अनेक बिघाड माझ्या आयुष्यात पुस्तकांमुळे झालेले आहेत. परंतु ही बिघडवणूक म्हणजेच आयुष्याचे खरे साजूक तूप! हसवणारी, विचार करायला लावणारी, एखाद्या वाक्यानं डोळे ओलावणारी, तर दुसऱ्याच क्षणी मन मोकळं करून देणारी. म्हणून ही बिघडवणूक एन्जॉय करायलाही मला पुस्तकांनीच शिकवले.

वाचून झालेल्या आणि आवडलेल्या पुस्तकांची मित्रांना शिफारस करण्याची आणि आपल्याकडील पुस्तके त्यांना देण्याची माझी सवय असल्याने माझ्याकडे स्वतःचा खूप मोठा पुस्तकसंग्रह नाही. मात्र पुस्तकांमुळे जोडलेले मित्र मात्र खूप आहेत. त्यामुळे माझ्या घराला खचितच पुस्तकाचे घर म्हणता येणार नाही. परंतु हे घर पुस्तकांमुळे उभे राहिलेले घर आहे हे मात्र नक्की.

माझे जे काही बरेवाईट आयुष्य आहे त्यात मी समाधानी आहे. त्यामुळे जीवन बदलून टाकणारी पुस्तके, आयुष्याला नवे वळण देणारी व्याख्याने, जीवनात आमूलाग्र बदल घडवणारे मोटिव्हेशनल स्पीकर यांपासून मी शक्यतो लांबच राहतो! एक काळ असा होता की किमान चाळीस-पन्नास पाने वाचल्याशिवाय मी झोपत नसे. नाही म्हणायला, अवघ्या चार-पाच पानांत वाचकांना झोपवण्याची क्षमता असलेली पुस्तकेदेखील वाट्याला आली. परंतु मनोरंजनक पुस्तकांपेक्षा वैचारिक, चरित्रात्मक पुस्तकांकडे हल्ली माझा ओढा वाढत चाललेला आहे. एकंदरीत, वाचनाचा माझा प्रवास हा झोपायला लावणाऱ्या पुस्तकांपासून ते झोप उडवणाऱ्या पुस्तकापर्यंत होत आहे.

**– सॅबी परेरा**

sabypereira@gmail.com

ग्रंथाली

**मोहन टांकसाळे यांचे**
**मराठी व हिंदी पुस्तक**





**बँकिंगचे अमर्याद विश्व**
**आणि**
**बैंकिंग की अनंत सीमाएँ**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

**टपालखर्च ५० रु.**



# पुस्तकांची सफर

## नंदन जोशी

लहानपणापासून वाचनाची आवड. चार-पाच वर्षांचा असताना एक-दोन खोल्यांच्या घरात पुस्तकाचं कपाट होतं. त्यातली सर्व पुस्तकं वाचून झालेली होती. त्यामुळे नवीन पुस्तक हातात यायची वाट पाहात असायचो. वाढदिवसाला काय हवंय विचारताच पुस्तकं हे उत्तर असायचं नेहमी. एका वाढदिवसाला बाबांनी आलेल्या पाहुण्यांनी आणलेल्या पुस्तकांचं प्रदर्शन मांडल्याचं आठवतंय. त्यातली पुस्तकं आधीच वाचलेली असल्यानं विरस झाल्याची आठवण आहे. ही पुस्तकं लहान मुलांसाठीच्या परीकथांची होती.

पुढे काही वर्षांनी आई, बाबा आणि मी व्हीटी (आता सीएसटी) स्टेशनाजवळ असलेल्या थिएटरला गेलो. त्यांना पाहायचा सिनेमा A rated असल्यामुळे परत जाण्याची पाळी आली. १९६०चं दशक. रस्त्यावर फडकं पसरून पुस्तकांची विक्री करणारे सहसा दिसत. वाटेत असाच एक विक्रेता लहान मुलांची पुस्तकं मांडून होता. बाबा म्हणाले तुला वाचायला दोन-तीन पुस्तकं घेतली तर तू प्रोजेक्शन रूममध्ये बसून सिनेमा संपेपर्यंत बसशील का? मजाच! मला ते प्रोजेक्शन रूममध्ये तिथल्या कर्मचाऱ्यासोबत बसवून सिनेमा पाहायला बसले. सिनेमा सुरू झाला. मी मागच्या भागात बसलो होतो, जिथून पडदा नजरेस येत नव्हता. थोड्याच वेळ तो माणूस कशातरी कारणासाठी बाहेर पडला; मी उभा राहून संपूर्ण सिनेमा पाहिला. Truffaut चा Bride wore Black ही एक सूडाची कथा आहे ज्यात पहिल्याच प्रवेशात नायिकेच्या नवऱ्याचा लग्नाच्या दिवशीच खून होतो. विशेष काही भीतिदायक वा आक्षेपार्ह असं सिनेमात नव्हतं. पुस्तकं हाती आली आणि सिनेमाही पाहून झाला.

घरी मराठी-इंग्रजी पुस्तकं भरपूर होती. मैलभरावर मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाची शाखा होती. आईनं नाथमाधव, ह.ना. आपटे वाचायला सांगितले होते. 'वीरधवल', 'गड आला पण सिंह गेला', 'उष:काल' अशा पुस्तकांच्या आठवणी दाट आहेत. गूढता, अंधार आणि अचंबित करणाऱ्या गोष्टींची आवड तेव्हापासूनची. आजही रहस्यमय पुस्तकांविषयीचं आकर्षण आहे. याखेरीज बाबांना वाटत होतं की मी नॉन फिक्शन साहित्य वाचावं. त्यामुळे त्यांनी मला बसवून जवाहरलाल नेहरूंचं 'Discovery of India' वाचून दाखवलं. प्रत्येक अडलेला शब्दाचा Oxford English Dictionary च्या संक्षिप्त आवृत्तीतून अर्थ वाचायचा. याची सवय मात्र मला लागली नाही. थोडा मोठा झाल्यावर लांबच्या लांब इंग्रजी कादंबऱ्या वाचताना मी वेळ काढून न्यायचो. संदर्भानुसार अर्थनिर्णयन करायचे.

इंग्रजी वाचन सुरू झाल्यावर मराठी वाचन थोडं मागे पडलं. तरीदेखील 'किशोर', 'कुमार', 'नवनीत', 'चांदोबा', 'विचित्र विश्व'चा खुराक असायचा. इंग्रजीतील वाचनाला दिशा देण्याकरता माझ्या आजोबांनी मला एक पुस्तक दिलं होतं ज्यात अनेक क्लासिकच्या गोष्टी संक्षिप्त स्वरूपात सांगितल्या होत्या. इंग्रजी, फ्रेंच, अमेरिकन पुस्तकांवर भर होता. बरीच वर्षं मी यात नोंदलेल्या कादंबऱ्या वाचत गेलो. चार्ल्स डिकन्सचं Great Expectations; व्हिक्टर ह्युगोचं Hunchback of Notre Dame; George Eliot चं Mill on the floss; वॉल्टर स्कॉटचं Ivanhoe; हेन्री फील्डिंगचं Tom Jones आणि इतर अनेक. सगळीच वाचून झाली नाहीत, तरी बरीच झाली. उदाहरणार्थ, Life and times of Tristram Shandy हे पुस्तक मी सुरू केलं पण फार प्रगती झाली नाही. लॉरेन्स स्टर्नचं हे पुस्तक इतर वाचलेल्या कादंबऱ्यांच्या मानानं पुष्कळच वेगळं होतं आणि मुख्य गोष्टीपासून भरकटत काही वेगळ्याच गोष्टीत गुंतलेलं असायचं. ते मला मानवलं नाही आणि एक दिवस आजोबांना भेटायला गेलो असताना मी त्यांना हे सांगितलं. त्यावर ते म्हणाले की हे पुस्तक वाचायला जमलं नाही तरी काही हरकत नाही. बाकीची पुस्तकं वाच.

चार्ल्स डिकन्सचा मला जणू सोसच लागला होता.



एकापाठोपाठ दुसरी अशा मी त्या कादंबऱ्या वाचतच गेलो. Oliver Twist, Nicholas Nickleby, Tale of Two Cities, Christmas Carol, आणि काही लघुकादंबऱ्या.

माझ्या जडणघडणीत चार्ल्स डिकन्सचा मोठा वाटा आहे. त्याच्या कादंबऱ्यांमध्ये अनाथ मुलं, कर्जबाजारी लोक, कठीण परिस्थितीनं ग्रस्त माणसं आणि एकंदरीत यांत्रिकी जगाच्या तडाख्यानं घायाळ झालेला खालच्या वर्गातील समाज याचं विदारक चित्रण आहे. त्यामुळे या वर्गाविषयी सहानुभूती आणि प्रस्थापित समाजाचा दांभिकपणा आणि त्याविषयीचा अविश्वास खोलवर रुजला आहे.

ही पुस्तकं मला ब्रिटिश काऊन्सिलच्या लायब्ररीमधून मिळाली. तिथे एका वेळी दोन पुस्तकं नेता यायची. घाटकोपर शाखेच्या मुं.म.ग्रं.सं.मध्ये एकच पुस्तक आणि फक्त एक मासिक. १८व्या शतकातल्या कादंबऱ्यांमध्ये बरीच वर्षं गुंतून गेलो. चार्ल्स डिकन्स नंतर हेन्री फील्डिंग, ब्रॉन्ट बहिणी, जेन ऑस्टिन. सगळीच पुस्तकं व लेखक आता आठवणीत नाही. इंग्रजी नंतर फ्रेंच त्यात अलेक्झांडर ड्युमा, व्हिक्टर ह्युगो प्रामुख्यानं.

The count of Monte Christo ही दीर्घ कादंबरी कशी वाचत गेलो लक्षातच आलं नाही. त्यानंतर Three Musketeers वाचली. त्यातली भाषा, व्यक्तिरेखा आणि एकंदरीतच राजकीय जाणीव ही आत्मसात करायला अवघड वाटली. बराच वेळ गोष्टीला वेग येत नाही आणि विविध व्यक्तिरेखांची आपापसातली नाती आणि अंतर्विरोध याचा उलगडा करणे कठीण. नंतर गती आली आणि कादंबरीला रंग चढला. ह्युगोच्या Hunchbackची कहाणी चित्तथरारकच. थोडी अधिक समज आल्यावर (१४, १५व्या वर्षी) वडिलांनी रशियन लेखकांची पुस्तकं हातात ठेवली. टॉलस्टॉयची ॲन करेनीना (आईची लाडकी कादंबरी) ही पाहता-पाहता हातावेगळी झाली. एका आगगाडीच्या वेगानं ही कादंबरी माझ्याकडे धाव घेऊन आली. नंतर War and Peaceशी झटापट करावी लागली. एकदा सुरू केली, सोडून दिली, काही महिन्यांनी परत हाती घेतली. यावेळी मात्र पात्रांच्या नावांची यादी त्यांच्या टोपणनावांसकट बाजूला घेतली. War and Peace वाचायला उन्हाळ्याच्या सुट्टीत जवळपास दोन महिने लागले. टॉलस्टॉयच्या कादंबरीचा इतका मोठा आवाका आहे की त्यात वेगवेगळे अनुभव येतात. आंद्रे व पिएर ह्या दोन मुख्य व्यक्तिरेखा आणि वेगवेगळ्या प्रवृत्तींचं दर्शन. एका प्रसंगात आंद्रे युद्धामध्ये जखमी होऊन पडला आहे त्यावेळी नेपोलियन आपल्या घोड्यावरून युद्धभूमीवर प्रवेश करतो. आतापर्यंत नेपोलियनला पूजणाऱ्या आंद्रेला तेव्हा अचानक जाणवतं की (वैश्विक संदर्भात) त्याचा हीरो अपरिपूर्ण आहे. कादंबरीतल्या पिएरचा अंतर्गत प्रवास आणि वाढ याचबरोबर त्याची जीवनविषयक मूलभूत मतं यांचं विश्लेषण आहे.

हे सगळं झालं जरा लायब्ररी फिकशनचं. यासोबत सातत्यानं किंवा अधिकच कॉमेडी, गूढ, साहस, युद्धकथा या जॉनरचं वाचन. तर कुठून सुरुवात करायची? लहानपणी भा.रा. भागवतांचा 'फास्टर फेणे' आणि त्याच्या भारताच्या सीमेलगतच्या कहाण्या. अतिशय उत्कंठावर्धक आणि रहस्यपूर्ण. इंग्रजीमध्ये अगाथा ख्रिस्तीचं तर वेडच वेड. एक उन्हाळ्याच्या सुट्टीत जवळपास पन्नासेक कादंबऱ्या वाचल्याचं आठवतंय. त्यावेळी मिनिटाला एक पान वाचन व्हायचं. (आता वेग बराच मंदावलाय.) माझा मित्र राजीव श्रीखंडे मात्र तोच झपाटा ठेवून आहे. अगाथा ख्रिस्तीच्या प्रसिद्ध व्यक्तिरेखा Hercule Poirot, Miss Marple आणि काही कमी परिचित म्हणजे 'N or M?'सारख्या गुप्तहेर कथेमधलं दांपत्य Tommy and Tuppence. त्यानंतर शेरलॉक होम्सचा विशाल प्रदेश. चार कादंबऱ्या आणि सहा-सात कथासंग्रह. ह्या कथा कितीही वेळा वाचल्या तरी त्यांची मजा तितकीच टिकून आहे.

बराच काळ पी.जी. वूडहाऊसचं वेड लागलं होतं. कधी Ukridge तर कधी Jeeves. वुडहाउसच्या इंग्रजी Manors मध्ये ऊन-पावसाच्या खेळात रमणारे दिवस. भाषेची खुमारी, मजेदार व्यक्तिरेखा आणि घटना यात बुडून जाणं अगदी सहजसोपं होतं. कुठेही जाताना पुस्तक हाती असायचं. लोकांना भेटायला जाताना, मोटारीतून प्रवास करताना, नेहमीच पुस्तक हाती. मग त्या पुस्तकांच्या आणि जागांच्या एकत्र आठवणी. महाबळेश्वरला दुपारी व्हरांड्यावर बसून वाचलेली ॲलेक्स हेलीची एअरपोर्ट. कोचीनमध्ये खोलीबाहेर बसून वाचलेली Illustrated Weeklyमधली आर.के. नारायणची कथा. अंक मोठ्या असल्यानं बाबा समोर कधी येऊन बसले ते कळलंच नाही. कथा संपून अंक बाजूला सारल्यानंतरच. त्यांना अचंबा वाटला.

हातात येणारी पुस्तकं बहुधा लायब्ररीमधूनच असायची. मघाशी म्हटल्याप्रमाणे घाटकोपरच्या शाखेतून, ब्रिटिश काऊन्सिल लायब्ररीतून किंवा आईच्या कॉलेजच्या लायब्ररीतून. मुंबईतल्या वास्तव्याच्या शेवटच्या काही वर्षांत यूएसआयएस लायब्ररीमधून. त्या लायब्ररीमध्ये मी अमेरिकन युनिव्हर्सिटी-विषयीची माहिती काढायला जायचो. यूसीसमधल्या पुस्तकांचं मला इतकं आकर्षण नव्हतं. त्यावेळी मला अमेरिकन लेखक, नाटककार, कवी इतके परिचित नव्हते. तरी हर्मन मेलव्हिलची Moby Dick, स्टाइनबेकची Cannery Row, हेमिंग्वे Old Man and the Sea अशा थोड्याफार वाचल्या होत्या.

Moby Dick चे काही भाग मी अगदी जबरदस्तीनं स्वत:ला वाचायला भाग पाडले. मात्र पुढे शेवटी-शेवटी कादंबरी असा आकार आणि वेग घेते की खोलवर अनुभव देऊन जाते.

घरी लोक येऊन-जाऊन असत ते पुस्तकं आणून देत. पुष्पामावशी आणि भावेकाकांकडून उदाहरणार्थ, मिलन कुंदेराचा 'Life is Elsewhere' हाती आल्यावर कुंदेरा वाचनाचं पर्व सुरू झालं. (Unbearable Lightness of Being इत्यादी) बाबांच्या ऑफिसमधल्या सहकाऱ्यांकडून दोन Tintin Comics मिळाल्यावर बाकीची सगळी वाचली. दुसऱ्या एका बाबांच्या ऑफिसमधील मित्राकडून थॉमस हार्डीचं 'Two on a Tower' भेट मिळालं. हार्डीच्या कादंबऱ्या खूप आवडायच्या. विशेषत: 'Tess of the D'urbervilles' त्यामुळे 'Mayor of Casterbridge' मी वाचली होती. त्यातला ट्रॅजिक सूर अतिशय परिणामकारक होता आणि त्या कादंबरीनं काही काळ माझ्या मनावर पगडा बसवला होता.

अमेरिकन कादंबऱ्यांच्या विषयापासून दूर जाण्यापूर्वी मार्क ट्वेन आणि जे.डी. सालिंगविषयी बोलणं भाग आहे. Tom Sawyer कुमारवयात वाचताना एक रोमांच उभा राहतो. Huck Finn चा या पुस्तकात परिचय होतो. त्यापुढच्या Huckleberry Finn या कादंबरीचा पोत आगळावेगळा आहे. अमेरिकेतील आफ्रिकन कृष्णवर्णीय लोकांच्या गुलामगिरीतल्या काळातील आहे. जिम हा आपल्या मालकाच्या जाचातून आपल्या कुटुंबाला वाचवण्यासाठी पळून जातो आणि Huck त्याच्यासोबत निघतो. कथा मिसिसिपी नदीवरच्या प्रवासाची आहे. घटनांना अग्रक्रम नाही आणि बरेचसं कथन त्या नदीच्या प्रवाहाशी संलग्न आहे. एकापाठोपाठ वाचताना या कादंबऱ्यांमधला फरक जाणवतो. Huck Finn ही अधिक आव्हानात्मक असून, त्या प्रवासासह जाण्यातली गंमत अनुभवता आली. 'Catcher in the Rye' ही कादंबरी तरुण मनावर विलक्षण पगडा टाकणारी आहे. सोळा-सतरा वर्षांचा असतानाही वाचली तेव्हा तिच्या नायकाच्या अंतर्गत विश्वात शिरणं सोपं होतं. कादंबरी संपल्यावर काही दिवस मन सुन्न होतं.

मुंबईतल्या वास्तव्यात पुस्तकगृहांशी फार संबंध नव्हता. अकरावी-बारावीत आणि इंजिनीयरिंगमध्ये असताना फार इथे-तिथे भटकंती करायला वेळ नव्हता. तरीदेखील शानबागांच्या स्ट्रॅण्ड बुक डेपोमध्ये काही वेळा जाऊन आलो होतो. एच.जी. वेल्सच्या विज्ञान कादंबऱ्यांचा संच घेतल्याचं आठवतंय. 'The Invisible Man', 'Time Machine', 'War of the Wrolds' इ. तिथले पुस्तकांचे ढीग म्हणजे खजिनाच होता. एकदा बाबांचं कोलकात्यात काम निघाल्यानं आम्ही सर्व तिथे पोचलो होतो. सहज चालताचालता बुक फेअरचा शोध लागला. पुस्तकांच्या स्टॉलच्या रांगाच रांगा. अतिशय आनंदात दुपार गेली. परतताना एका गल्लीत रसगुल्ल्याचं छोटं मडकं घेतलं आणि वाटेतच संपवलं. पुढे अमेरिकेत आल्यावर वेगळंच दृश्य होतं. सहा मजल्यांची लायब्ररी; त्यात जवळपास एक अख्खा मजला लिटररी फिसिशनला वाहिलेला होता. पहिल्यांदा पुस्तकं

नेताना मी तिथल्या लायब्ररीयनला विचारलं की एका वेळी किती पुस्तके नेता येतील. ती म्हणाली की तू शंभरहून अधिक घेतलीस तर अधिक नेण्याकरता परवानगी लागेल! त्याकाळी नुकताच दूरदर्शनवर पॉल स्कॉटच्या Raj Quartet मधलं Jewel in the Cn पाहून आलो होतो. त्या कादंबऱ्यांचा संच होता तसाच Milan Kunderaच्या न वाचलेल्या कादंबऱ्या. असं बरंच काही. त्याखेरीज शेकडो मासिकं, Granta, Paris Review, New Yorker हे प्रथम तिथे नजरेत आले. घरी आईनं पीएच.डी.च्या कामासाठी अनेक क्रिटिसीझमवरची पुस्तकं आणली होती. त्यांच्या वाटेला गेलो नव्हतो. या मासिकांच्या वाचनातून टीकालेखन वाचू लागलो आणि त्याची गोडी लागली.


अमेरिकेत आल्यावर पुस्तकांच्या जगाचं एक नवीन दालन उघडलं. कॉलेजनंतर वॉशिंग्टन डी.सी.ला कामाच्या निमित्तानं वर्षभर होतो. तिथे वेगवेगळ्या पुस्तकगृहांशी परिचय झाला. त्यातलं एक होतं 'Kramer Books'. Dupont Circle लगतचं. पुढच्या भागात पुस्तकांसाठी दोन दालने, मागच्या बाजूला एक रेस्टॉरंट आणि डावीकडे कोपऱ्यात बार. त्यामुळे पुस्तकं चाळताचाळता वाटलं तर खाण्यापिण्याची व्यवस्था. शुक्रवारी सकाळी उघडल्यावर क्रेमर बुक्स रविवारी रात्री उशिराच बंद व्हायचं. आतापर्यंतच्या पुस्तकसफरीत असं पुस्तकगृह कधीच नजरेस आलं नाही. (हल्ली हे ९-१० वाजता बंद होतं. ते सोनेरी वीकेंड आता संपुष्टात आलेत.) डी.सी. राजधानी असल्यामुळे राजकीय व ऐतिहासिक पुस्तकं आणि मासिकांवर भर असणारी दुकानं होतं. जॉर्जटाउन परिसरात Bridge Street Books हे दुमजली, चिंचोळं दुकान जवळपास पूर्णत: राजकीय घडामोडी, ऐतिहासिक घटना व व्यक्तिमत्त्वं आणि काही कादंबऱ्या ज्यादेखील ऐतिहासिक घटनांनी प्रेरीत (historical fiction) होतं. अर्थात अमेरिकेवर खूप भर, पण इतरही उदाहरणार्थ, रशिया, क्युबा, दोन्ही जागतिक महायुद्धं, वगैरे साहित्यही होतं. वॉशिंग्टनमधील वातावरणाचा गंध तिथल्या पुस्तकांच्या दुकानात उतरला होता.

या सफरीचा वृत्तांत इथे थांबवतो. आपण १९९४पर्यंत पोचलो आहोत. पुस्तकांची आवड लहानपणापासून रुजली आणि जसजसं वय वाढत गेलं तसतसा त्यांचा वेगवेगळ्या पद्धतीनं शोध घेत राहिलो.

**– नंदन जोशी**
nandanpjoshi@gmail.com


## रंग जीवनाचे


**सुधा हुजूरबाजार-तुंबे**




**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**
**टपालखर्च ५० रु.**

## अभिजात साहित्याचे अक्षरश्वि!

**राजीव श्रीखंडे**




**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २०० रुपये**
**टपालखर्च ५० रु.**



# घराची अक्षरसमृद्धी!

## राजीव श्रीखंडे

समजायला लागल्यापासून मी आमच्या घरात पुस्तकं बघत आलेलो आहे. माझी आई इंग्रजी वाङ्मयाची पारितोषिकप्राप्त पदवीधर. तिला वाचनाचा अतिशय नाद. वाचायची प्रेरणा मला खरं तर तिच्यापासूनच मिळाली. तसा एकंदरच आमच्या घरी पुस्तकांना फार मान होता. त्यांची खूप काळजी घेतली जायची. माझे आजोबा आणि वडील यांनाही पुस्तकांबद्दल विशेष प्रेम होते. माझे काका डॉ. व्ही.एन. श्रीखंडे यांनाही वाचनाचं बरंच वेड होतं. या सगळ्याचा माझ्यावर परिणाम होणं स्वाभाविकच होतं.

मी लहान असताना माझ्या हातात एक गोष्टीचं पुस्तक पडलं. सुप्रसिद्ध लेखक शं.ना. नवरे हे माझ्या वडिलांचे सख्खे मामा. त्यांनी 'जादूचे जोडे' असं काहीसं पुस्तक लिहिलं होतं. ते मला फारच आवडलं. मला आणखीन त्याचप्रकारची पुस्तकं वाचायची ओढ लागली. दादरला आमच्या जवळच्या रानडे रोडवर पूर्वी 'सरस्वती बुक डेपो' नावाचं दुकान होतं. या दुकानात अशी सगळी लहान मुलांसाठी असलेली पुस्तकं मिळायची. 'जादूचे जोडे', 'बहुरूपी जादूगार', 'जादूचा गालिचा' अशी अनेक पुस्तकं. हे मला कसं कळलं ते आता आठवत नाही, पण ते मी वडिलांना सांगितलं आणि अनेक पुस्तकं आमच्या घरी आली. अधाश्यासारखी ती पुस्तकं मी वाचून संपवली. माझं मराठी वाचन चालू झालं. 'किशोर', 'कुमार' मासिकं नियमित घरी यायची. मग पुढे आईनं माझ्यासाठी Enid Blyton या इंग्रजी लेखिकेची पुस्तकं विकत घेतली. आमच्या वेळेला पाचवीपासून इंग्रजी शिकवायला सुरुवात व्हायची. मी तर जेमतेम तिसरी-चौथीत होतो, त्यामुळे मला इंग्रजीचा गंध नव्हता. मग आई मला ती पुस्तकं वाचून मराठीत सांगायची. दिवसाला एक किंवा दोन प्रकरणं. रात्री वडील एखादं प्रकरण सांगायचे, ऑफिसमधून घरी आल्यावर. Enid Blytonच्या गाजलेल्या Secret Seven मालिकेतील ती पुस्तकं होती आणि आजही त्या कुमारसाहसकथा माझ्या डोक्यात पक्क्या बसल्या आहेत. याचं श्रेय Enid Blyton इतकंच माझ्या आई-बाबांना जातं.

असं बाळकडू मिळाल्यावर वाचनाची गोडी उत्पन्न होणारच की! आणि एकदा वाचनाची गोडी निर्माण झाली की मग सुटका होणं अशक्यच! शाळेत इंग्रजी शिकवण्याला सुरुवात झाली होती. आईनं नेटानं मला इंग्रजी पुस्तकं तीही कुमारांसाठी लिहिलेली वाचायला शिकवली. ती म्हणाली आधी सगळं वाच. शब्द कळला नाही तरी थांबू नकोस. आशय कळला तरी झालं. न कळणारे शब्द आले की मग पुस्तक संपल्यावर त्यांची नोंद करायची आणि डिक्शनरीतून त्यांचा अर्थ शोधायचा. पण पुस्तक संपल्यावरच. वाचताना नाही. त्यामुळे कथानक वाचताना अडथळा आला नाही आणि वाचनाचाही कधी कंटाळा आला नाही. वाचनाची गोडी यामुळेच तर टिकली.

मला आठवतंय मी माझं पहिलं इंग्रजी पुस्तक सहावीनंतरच्या मे महिन्यात वाचलं. Enid Blytonच्या Adventure मालिकेतील The Castle of Adventure ही एक उत्कंठावर्धक, बहारदार कादंबरी. याच वेळी भा.रा. भागवतांनी ज्यूल व्हर्नच्या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांचे केलेले अनुवाद वाचनात आले. पुढे Walter Scott, R. L. Stevenson, Alexandre Dumas या दिग्गज लेखकांच्या कादंबऱ्यांचे भा.रा. यांनी केलेले अप्रतिम अनुवाद वाचले. त्यांची इतरही पुस्तकं वाचली. बाकी मराठी वाचन चालूच होतं. 'वीरधवल', 'कालिकामूर्ती', 'चिमणराव', ह. ना. आपटे, पु. ल., महादेवशास्त्री जोशी असे अनेक लेखक वाचनात आले. त्यावेळी मराठीत अशा गाजलेल्या कादंबऱ्यांचे उत्कृष्ट अनुवाद नियमित प्रकाशित व्हायचे. ते नेहमी वाचायचो. शेरलॉक होम्सच्या अजरामर The Hound of The Baskervilles या कथेचा अनुवाद सरिता पत्की यांनी फारच छान केला होता. पुढे मूळ कादंबरी वाचूनही या अनुवादाची गोडी काही कमी झाली नाही.

नववीनंतरच्या मे महिन्यात मी प्रथम प्रौढांसाठी लिहिलेली इंग्रजी कादंबरी वाचली. या कादंबरीचं नाव होतं Shannon's Way आणि ती Dr. A. J. Cronin या जगद्‌विख्यात इंग्रजी लेखकाची गाजलेली कादंबरी होती. याचवेळी मराठी कवितांची गोडी लागली. अनेक कविता पाठ केल्या (अजूनही बहुतेक सगळ्या लक्षात आहेत.)

कॉलेजमध्येही मी वाचायचो, अभ्यास जरा कमीच करायचो. याच वेळी माझे काका जगातल्या पुस्तकांची आणि लेखकांची उत्तम माहिती देणारं Books and Bookman हे मासिक घ्यायचे. त्यांचं वाचून झालं की ते माझ्याकडे पाठवायचे. त्यात देशोदेशींच्या पुस्तकांबद्दल बरीच माहिती मि ळायची. बाबांनी माझ्यासाठी याच काळात ढळाश साप्ताहिकाची वर्गणी भरली होती. त्यातल्या पुस्तकांचा विभाग मी नेहमी वाचायचो. त्यात दर आठवड्याला येणारी Bestsellor यादीही बघायचो. त्यामुळे जागतिक साहित्याबद्दल बरीच उपयुक्त माहिती मिळत गेली. या आधारे पुस्तकं घेत गेलो. माझा मोठा भाऊ दोन वर्षं अमेरिकेत होता. त्यानं येताना माझ्यासाठी अनेक दुर्मिळ पुस्तकं आणली. पुढे व्यवसायात आलो. बाबांची कंपनी असल्यामुळे तिथली शिस्त काटेकोर. आमच्या कंपनीची कामं देशभर चालू होती. प्रकल्प व्यवस्थापन मॅनेजर म्हणून मला देशभर फिरायला लागायचं. त्यामुळे सततचा विमानप्रवास होई. त्यामुळे माझ्या वाचनात कधी खंड पडला नाही; उलट त्यात वाढच झाली. अशा तऱ्हेनं वाचन माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलं.

एकदा का तुम्ही कशातही पडला, की मग पुढची वाट आपोआपच समोर येते. माझी चुलत-बहीण प्रज्ञा सिकंद ही अमेरिकेला असते. ती वर्षातून दोन-तीन वेळेला तिच्या आई-वडिलांना भेटायला मुंबईला यायची. ती म्हणजे जागतिक साहित्याची विशेषतः युरोपीय साहित्याची पट्टीची वाचक. तिची-माझी गट्टी जमली. आज आम्ही एकमेकांना Soulmates म्हणतो. तिच्याकडून मला खूप काही शिकायला मिळालं. तसाच माझा मित्र विराट चांडोक हा त्याच सुमारास भेटला. हा १९९८-९९चा काळ. Lotus Book House हे पुस्तकाचं दुकान विराट चालवत असे. हे दुकान वांद्रे मशिदीसमोर होतं. माझी मुलगी अरुंधती त्यावेळी आठ वर्षांची होती. एखाद्या शनिवारी किंवा रविवारी संध्याकाळी मी अरुंधतीला घेऊन विराटच्या दुकानात जायचो. विराट अरुंधतीला मोठ्या स्टुलावर बसवून तिच्याशी गप्पा मारायचा आणि मी त्या दुकानात मनसोक्त फिरून पुस्तकं जमा करायचो. एकेकावेळेला पंधरा-वीस पुस्तकांचा गठ्ठा घरी यायचा. याबद्दल माझी पत्नी अदितीच्या कपाळावर मी आठी कधीच बघितली नाही. विराट हा नुसताच पुस्तक विक्रेता नाही, तर तो एक असामान्य वाचक आहे. तोही पुस्तकं सुचवायचा. त्याच्यामुळे मला लॅटिन अमेरिकेच्या साहित्याबद्दल खूप माहिती मिळाली, तसेच आशियाई साहित्याबद्दलही. याचवेळी मला शशिकांत सावंत, किशोर कदम असे वाचनप्रेमी मित्र मिळाले. शशिकांतच्या वाचनाची, फिरत विलक्षण आणि जागतिक वाङ्‌मयाबद्दलचं ज्ञान असामान्यच. आमच्या मैफिली व्हायच्या, कधी घरी, कधी हॉटेलात, कधी शिवाजीपार्कवर. पुस्तकांवर, लेखकांवर खूप चर्चा व्हायच्या.

अशा तऱ्हेने माझ्या वाचनाचा परीघ रुंदावत गेला. नंदन जोशीसारखा फार विलक्षण वाचन करणारा मित्रही मिळाला. ग्लोबल ग्रंथपरिचय हे सदर मी 'शब्द रुची' मासिकात दरमहा लिहायला लागलो आणि 'ग्लोबल साहित्य सफर' हे यूट्यूबवरील सदर या प्रकल्पांमुळे पूर्वी वाचलेली पुस्तकं अभ्यासण्याची संधी पुन्हा मिळाली, नवीन काही कळलं, जाणवलं, उमगलं.

मी स्वतःला जागतिक साहित्याचा विद्यार्थी मानतो, त्यामुळे मी पूर्वीच योजनाबद्ध वाचायचं ठरवलं. मी ५० पुस्तकांचा संच योजतो. त्यात युरोपीयन, जर्मन, फ्रेंच, लॅटिन अमेरिकन, इंग्लिश, अमेरिकन, रशियन, कुमारकथा, मराठी, कॉमनवेल्थ/आफ्रिका वगैरे, भारतीय इंग्रजी, एशियन, (जपानी, चिनी, श्रीलंका, मध्यपूर्व वगैरे), जुनी क्लासिक्स कुठल्याही भाषेतील, नाटकं (कुठल्याही भाषेतील), इतिहास, तत्त्वज्ञान, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र वगैरे इतर भारतीय भाषा (कन्नड, बंगाली, तमिळ वगैरे), हिंदी आणि साहसकथा, रहस्यकथा, भयकथा, विज्ञानकथा, फॅण्टसी वगैरे यामुळं वाचन संकुचित होत नाही हे मला अनुभवांवरून लक्षात आलं. मराठी, हिंदी, किंवा इंग्रजी सोडून बाकीची पुस्तकं अर्थातच अनुवादित असतात. (एवढ्या भाषा येत असत्या तर किती बरं झालं असतं असा विचार नेहमीच माझ्या मनात येतो.) नवनवीन लेखक, नवनवीन पुस्तकं आणि तीही सगळ्या प्रकारची वाचली जातात, आपण updated राहतो, जगाच्या बरोबर राहतो. स्कँडेव्हियन देशातल्या अनेक मान्यवर लेखकांनी रहस्यकथेला वेगळ्याच स्तरावत नेल्याचे अशा योजनाबद्ध वाचनामुळे लक्षात आलं. आपलं क्षितिज रुंदावलं जातं, आपण समृद्ध होतो.

माझ्या नशिबानं आणि देवाच्या, थोरामोठ्यांच्या आशीर्वादानं जगातील बहुतेक गाजलेली पुस्तकं मी वाचू शकलो, अगदी लॅटिन अमेरिकेपासून चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडपर्यंत. मानवी जीवनावरचं दिग्गजांचं सखोल भाष्य वाचून अंतर्मुखही झालो. वेगवेगळे देश, वेगवेगळे समाज यांच्याबद्दल बरंच ज्ञान मिळालं आणि देश, समाज एकमेकांपासून कितीही भिन्न असले तरी शेवटी आपण मानव म्हणून एकच आहोत, याचीही आत कुठेतरी जाणीव झाली. मानवाची मूलभूत जीवनमूल्ये सारखीच आहेत हेही ध्यानात आलं - प्रेम, बंधुभाव, निष्ठा, इमान, एकमेकांशी असलेले

नातेसंबंध, आपल्या मूलभूत आशा, आकांक्षा, अपेक्षा, आपला आनंद, दुःख आणि नियतीचा अविरत चाललेला अगम्य खेळ... उमर खय्यामनं चार ओळीत मांडलेला!

पुस्तकांमुळे अनेक माणसांची ओळख झाली. त्यांच्याशी स्नेहसंबंध प्रस्थापित झाले. या सगळ्यांकडून बरंच शिकायला मिळालं. पुस्तकप्रेमींची मैत्री ही अगदी वेगळ्या स्तरावरची असते. ती पटकन होते आणि दीर्घकाळ टिकते. पुस्तकांचं जग इतकं मोठं आहे की त्यावर बोलणं कधीच संपू शकत नाही. वेगवेगळे संदर्भ मिळतात. नवनवी माहिती मिळते, मानवी जीवनाचे वेगवेगळे आयाम जाणवतात.

पुस्तकांनी मला काय दिलं याची यादी जर करायला बसलो तर ती यादी पूर्ण होईल की नाही याबद्दल शंकाच आहे. अनेक ग्रंथांना फार मोठं संदर्भमूल्य आहे. पाहिजे ती पुस्तकं मिळवण्यासाठी तुम्हाला अथक प्रयत्न करावे लागतात. फोर्टमधल्या Central Camera इमारतीसमोरचा फुटपाथवरचा एक पुस्तकविक्रेता माझा खास दोस्त होता. फारसा न शिकलेला, पण माझ्या आवडीची पुस्तकं तो नेहमी मला आणून द्यायचा. अमेरिकेत न्यू यॉर्कमध्ये Mysterious Press नावाचं पूर्वीच्या Twin Towersच्या जवळ असलेलं दुकान होतं. त्यात जगभरच्या रहस्यकथा मिळायच्या. आता ते आहे की नाही माहीत नाही. Strand Book Stall, Barnes and Noblesची दुकानं माझी हक्काचीच ठिकाणं. पॅरिसमध्ये कामाला गेलो असताना तिथल्या जगप्रसिद्ध Shakespeare and Co या पुस्तकाच्या दुकानात खास गेलो होतो. मी Voltaire, Stendhal, Proust, Flaubert, Balzac, Dumas, Hugo, France, Romain Rolland, Sartre, Camus यांच्याबद्दल बोलून जरा भाव खाल्ला तेव्हा तिकडची मॅनेजर इतकी प्रभावित झाली की त्या पुस्तकाच्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर त्यांचा दुर्मिळ हस्तलिखितांचा जो विभाग आहे (तुम्ही ती हस्तलिखितं चाळू शकता पण तिथेच. तुम्हाला वाईनचा ग्लासही देतात On house!) तिथे मला घेऊन गेली. दोन तास मी वाईनच्या ग्लासचे घुटके घेत अनेक दुर्मिळ हस्तलिखितं बघितली. कळलं काहीच नाही कारण बहुधा फ्रेंच भाषेतली होती. एक Stendhalचं होतं असं मला आठवतंय. पण ती हस्तलिखितं हातात घेऊन चाळताना काय वाटलं हे शब्दांत सांगणं कठीणच आहे!

तसाच एकदा इटलीतील मिलानजवळील एका छोट्या गावात कामावरून परतताना मी माझ्या इटालियन सहकाऱ्यासमवेत जेवायला थांबलो. जवळच पुस्तकाचं दुकान होतं. माझी पावलं आपसूकच तिकडे वळली. पुस्तकालयाच्या मालकाला मोडकं-तोडकं इंग्रजी येत होतं. दुकानात बहुतेक पुस्तकं इटालियन होती, पण मी त्याच्याशी इटालियन साहित्यावर गप्पा मारल्या. Dante Alighieri ते Alberto Moravio, Italo Calvino, Dario Fo वगैरे. मी त्याला सांगितलं की जेजूपे तोमासी लॅम्पेदुसाची एकमेव आणि जगभरात गाजलेली कादंबरी The Leopard ही माझी अतिशय आवडती कादंबरी आहे तेव्हा तो अगदी भारावून गेला. त्यानं दहा मिनिटं सगळं दुकान हुडकून The Leopardची इंग्रजी प्रत शोधून मला दिली. मी पैसे द्यायला लागलो तर त्यानं अतिशय अदबीनं ते घ्यायला नकार दिला. इतकंच नव्हे तर ते पुस्तक त्यानं मला माझं नाव घालून स्वतःची सही करून भेट म्हणून दिलं! हे असं भाग्य पुस्तकप्रेमींच्या नशिबी असतं हे मला अनुभवानं कळलेलं आहे.

'वाचाल तर वाचाल' हे शंभर टक्के खरं आहे. वाचल्यानं आपल्या जगाचा परीघ रुंदावतो. संकुचित वृत्तीला आळा बसू शकतो. मला मानवी जीवनाचा वेगवेगळ्या देशातला, समाजातला जो आविष्कार असतो त्याचं तत्त्वज्ञान, इतिहास याच्यातही रस आहे. जगभरच्या तत्त्ववेत्त्यांची, इतिहासकारांची पुस्तकं मी वाचू शकलो. त्यावर मनन करू शकलो याबद्दल मी स्वतःला नशीबवान समजतो. खरं म्हणजे सगळंच वाचलं पाहिजे. वाचनामध्ये भेदभाव नसावेत. नुसतं स्वतःच्या भाषेतलंच नाही तर जगातलं उत्तमोत्तम सगळंच वाचलं पाहिजे. रहस्यकथेतही The Hound of The Baskerville सारखी Classic कलाकृती निर्माण झालेली तसंच भयकथांमध्ये Dr. Jekyll and Mr Hyde ही अजरामर कथाकृती निर्माण झालेली आहे. कुठलाच वाङ्मयप्रकार टाकाऊ नसतो. त्यामुळे वाचन सर्वंकष असेल तर वाचनाचा आनंद जास्त मिळतो एवढं मात्र खरं. अनेक मोठ्या कलाकृतींमुळे जागतिक इतिहासावर परिणाम झालेला आहे. Dystopian साहित्यातली भविष्यवाणी अनेकदा खरी ठरलेली आहे त्यामुळे साहित्य हे द्रष्टंदेखील असतं हे लक्षात ठेवणं जरुरीचं आहे. आपल्या धकाधकीच्या आयुष्यात कधी विचारांना चालना देणारं, कधी आपल्या ज्ञानात अनमोल भर टाकणारं, कधी अंतर्मुख करणारं तर कधी निर्भेळ करमणूक करणारं वाचलं तर आपलं जीवन किती समृद्ध होतं हे असं वाचल्यावर स्वानुभवामुळे लक्षात येतं आणि हृदयात पुस्तकांविषयी अपरंपार कृतज्ञता दाटून येते! मी आज जो काही आहे त्यात पुस्तकांचा सिंहाचा वाटा आहे हे मान्य केलंच पाहिजे.

माझ्याकडला जवळजवळ ८००० पुस्तकांचा ग्रंथसंग्रह हीच माझी सर्वात मोठी संपत्ती आहे याची मला आणि माझ्या कुटुंबातल्या सर्वांनाच जाणीव आहे!

**– राजीव श्रीखंडे**

rshrikhande@yahoo.com



# पुस्तकांची वंडरलँड!

**मेधा आलकरी**

गणेश मतकरी यांच्या ‘पुस्तकांच्या घरात’ प्रवेश केला आणि वंडरलँडमध्ये शिरल्यावर तिथली अजब दुनिया बघून ॲलिस जशी अचंबित झाली असेल तशी मी झाले. गणेश मतकरींना आपण फिल्म क्रिटिक आणि लेखक म्हणून ओळखतो. ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक, नाटककार माधव मनोहर हे त्यांचे मातुल आजोबा आणि वडील गूढकथा लेखक आणि नाटककार रत्नाकर मतकरी. असा समृद्ध वारसा असल्यामुळे घर पुस्तकांनी भरलेलं असेल ही अपेक्षा होतीच; परंतु पपांच्या (आजोबा) आणि बाबांच्या पुस्तकांव्यतिरिक्त त्यांचाही संग्रह प्रचंड आहे. सिनेमा या विषयावरील पुस्तकांचा फक्त त्यांचा संग्रह मी बघितला आणि थक्क झाले. गुळगुळीत पानांची नटनट्यांचे फोटो असलेली ही पुस्तकं नव्हेत. अभ्यासू समीक्षकाला लिखाणासाठी लागतात ते संदर्भग्रंथ, प्रथितयश दिग्दर्शकांनी लिहिलेली पुस्तकं, त्यांनी लिहिलेल्या लेखांचं, मुलाखतींचं, डायरी स्वरूपात लिहिलेल्या टिपणांचं संकलन, एकेका सिनेमाची माहितीपूर्ण आणि विश्लेषणात्मक गंभीर लिखाण असलेली ब्रिटिश फिल्म इन्स्टिट्यूटची मालिका, आइझेन्स्टाईन या रशियन लेखक आणि दिग्दर्शकाची जवळजवळ सगळी पुस्तकं, हॉरर सिनेमांबद्दलच्या पुस्तकमाला, गुन्हेगारी सिनेमांबद्दलची, एडिटिंग वरील काही, हिचकॉकची तर एक पूर्ण लाईन आणि मध्येच डोकावणारी आपल्या सत्यजित राय यांची पुस्तकं.

गणेश मतकरी ललित मासिकासाठी बिब्लिओफाइल हे सदर लिहीत असत. बिब्लिओफाइलचा अर्थ आहे पुस्तकांवर प्रेम करणारा, पुस्तकांचा संग्रह करणारा. तेच याचे मूर्तिमंत रूप आहेत. त्यांनी आपल्या वैयक्तिक संग्रहासाठी खरेदी केलेलं पाहिलं पुस्तक होतं, ते फाउंटन भागातील फूटपाथवरून घेतलेलं ‘द बेस्ट, द वर्स्ट अँड द मोस्ट अनयुज्वल हॉरर फिल्म्स’. हॉरर फिल्मवरील या पुस्तकासाठी त्यांनी त्यावेळी म्हणजे साधारण एकोणीसशे नव्वद साली दीडशे रुपये मोजले होते. वडिलांच्या गूढकथांचं वलय असेल किंवा नारायण धारपांच्या कथाकादंबऱ्यांचं वाचन, (त्यांच्याकडे धारपांची नव्वद पुस्तकं आहेत) यामुळे गणेशना हॉरर फिल्म आणि त्यातील बारकावे खूप आकर्षित करत असतात.

ते १९९७ मध्ये सिनेमावर लिहायला लागले. हा इंटरनेटच्या आधीचा काळ! त्यामुळे अधिकारवाणीनं लिहिण्यासाठी संदर्भग्रंथ जमा करणं त्यांना क्रमप्राप्त वाटलं. तोपर्यंत क्रॉसवर्ड पुस्तकालय उघडलं होतं. तिथे त्यांना



गणेश मतकरी आणि त्यांचा अक्षरखजिना



सालानुसार आलेल्या सिनेमाची थोडक्यात माहिती देणारं एक गलेलठ्ठ पुस्तक मिळालं. हळूहळू त्यांच्या या संग्रहात भर पडत गेली. थोड्या दिवसांतच त्यांनी फिल्म सोसायटीचं सदस्यत्व घेतलं आणि हॉलीवूड व्यतिरिक्त जागतिक सिनेमाचं मोठं दालन त्यांच्यासमोर उघडलं गेलं. त्यांच्या पुस्तकखरेदीला गती आली ती यानंतर, २००७ मध्ये.

२००७च्या सुमारास एके दिवशी प्रभात चित्रमंडळाच्या सुधीर नांदगावकरांनी काही कामानिमित्त गणेशना ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अरुण खोपकरांकडे पाठवलं. परिचयानंतर काही दिवसांतच खोपकरांच्या डोक्यात बरेच दिवस चालू असलेल्या एका कल्पनेनं उचल खाल्ली. सिनेमा या विषयाकडे गंभीरपणे पाहणाऱ्या काही तरुण मुलांना एकत्र बोलवावं, चर्चा घडवून आणाव्यात असं त्यांच्या मनात होतं. गणेशबरोबरच फिल्म सोसायटीत असलेले त्यांचे मित्र संतोष पाठारे, अभिजित देशपांडे, चित्रपट दिग्दर्शक सचिन कुंडलकर, उमेश कुलकर्णी, चित्रपट आणि साहित्याचा अभ्यास असणारे निखिलेश चित्रे अशांच्या समवेत ते अरुण खोपकर यांच्या घरी नित्यनेमानं जाऊ लागले. त्या अनौपचारिक भेटींमध्ये खोपकर किंवा या कंपूपैकी कोणीतरी एक कुठल्यातरी विषयावर किंवा फिल्मवर बोलायचे. एकमेकांकडच्या चांगल्या पुस्तकांची देवाणघेवाण व्हायची. खोपकरांच्या 'पुस्तकांच्या घरातील' फिल्मविषयक सगळी पुस्तकं या तरुणांना मुक्तहस्ते हाताळायची मुभा होती. मला वाटतं गणेशना त्यांच्या पपा आणि बाबांच्या नंतर खोपकरांच्या या वैयक्तिक पुस्तकसंग्रहानं आकर्षित केलं असावं. खोपकरांनी सांगितलेल्या अनेक फिल्म, त्यावर होणाऱ्या चर्चा, त्यांच्या घरातील पुस्तकांचा संग्रह हे गणेशना प्रेरणा देणारं ठरलं.

वैयक्तिक पुस्तकांचा संग्रह करण्याच्या छंदाला आता खरी गती मिळाली होती. यात कॉमिक्ससारखं स्वरूप असणाऱ्या पण आशयाचा विस्तृत आवाका असलेल्या ग्राफिक नॉव्हेलच्या काही विशिष्ट एडिशन जमवण्याचा छंदही सामील झाला. उदाहरणार्थ, ॲबसोल्यूट एडिशन, जी सगळ्याच बाबतीत अव्वल दर्जाची असते, त्यात ती पात्रं लेखकाच्या मनात कशी उभारली त्याचीही माहिती दिलेली असते. किंवा आर्टिस्ट एडिशन, जिच्यात पुस्तकांमधली चित्रं काळ्यापांढऱ्या रूपात पण ज्या आकारात मुळात काढली गेली त्या प्रचंड आकारातच पाहता येतात. काही पुस्तकांचे संच छानशा केसमध्येदेखील असतात. हारुकी मुराकामीच्या 1Q84 या कादंबरीची तीन भागांतली आवृत्ती असणारा पारदर्शक केसमधला संच मिळवण्यासाठी गणेश यांनी जंग जंग पछाडले आणि आज तो त्यांच्या पुस्तकांच्या शेल्फमध्ये दिमाखाने विराजमान आहे.

मोठमोठी बुक स्टोअर, आणि ऑनलाइन खरेदीसाठी फ्लिपकार्ट, ॲमेझॉन या सोयी गेल्या काही वर्षांत आल्या. त्यामुळे हवी ती, हव्या त्या एडिशनची पुस्तकं मागवणं पर्यायानं सोपं झालं आहे; पण काही खास पुस्तकं मात्र परदेशातच मिळू शकतात. इथे मागवली तर त्याची किंमत तर वाढतेच, आणि मिळण्याची खात्रीही देता येत नाही. परदेशात ॲमेझॉनकडे सेकंड हॅन्ड पुस्तकं ज्या प्रमाणात मिळतात तशी आपल्याकडे मिळत नाहीत. त्यामुळे मतकरींच्या परदेशात राहणाऱ्या मित्रमैत्रिणींनी भारतात येण्यापूर्वी फोन करून 'कुठलं पुस्तक हवंय का?' अशी विचारणा करण्याची सवयच लावून घेतली आहे. तेही परदेशात गेले की त्यांची प्रेक्षणीय स्थळं म्हणजे तेथली विविध पुस्तकालयं. अशा ठिकाणाहून परत येताना त्यांची एखादी बॅग पुस्तकांनीच भरलेली असते.

व्यवसायानं आर्किटेक्ट असलेलं हे दाम्पत्य, पल्लवी आणि गणेश, एकमेकांबरोबरच पुस्तकांच्याही प्रेमात आकंठ बुडालेलं आहे. लग्नाच्या पहिल्या वाढदिवशी गणेशनी पल्लवीला ॲस्ट्रिक्स मालिकेतल्या कॉमिक्सचा पुस्तकसंच भेट म्हणून दिला. त्यासाठी फूटपाथवरच्या पुस्तकविक्रेत्यांशी दोस्ती केली, रद्दीवाल्यांकडे चकरा मारल्या, पुस्तकालयात डोकावून झालं. जिथे जशी मिळतील तशी ते ती पुस्तकं जमवू लागले आणि घरात लपवून ठेवू लागले. पस्तीस पुस्तकांचा हा संच पूर्ण करण्यासाठी शेवटची दोन-तीन पुस्तकं मात्र त्यांना नवीकोरी घ्यावी लागली.



गणेश मतकरींचा हा सगळा पुस्तक संग्रह आवडला म्हणून खरेदी केलेला आणि त्यातली काही पुस्तकं संदर्भ-मूल्यांसाठी घेतलेली. 'फिल्म आर्ट - ॲन इंट्रोडक्शन' या प्रख्यात अभ्यासक डेव्हिड बोर्डवेल लिखित पुस्तकाची जुनी आवृत्ती रत्नाकर मतकरींच्या संग्रहात होती. परंतु 'चित्रपट प्रवाहांचा इतिहास - जागतिक आणि भारतीय' हे पुस्तक लिहिताना विशिष्ट संदर्भांकरता त्यांना त्याची नवी एडिशन लागणार होती. कारण मधल्या काळात त्यात बरीच नवी भर पडली आहे. अशा वेळी त्याच पुस्तकांची पुन्हा खरेदी करणंही अनिवार्य असतं, असं गणेश सांगतात.

चित्रपटांच्या अनेक अंगांबद्दलची पुस्तकं संग्रहात असणाऱ्या गणेशना दिग्दर्शकांचे 'स्टोरीबोर्ड' वाचकांपुढे ठेवणाऱ्या पुस्तकांचंही तितकंच आकर्षण आहे. अवघड प्रसंग चित्रित करण्याआधी दिग्दर्शकानं आराखड्याच्या रूपात केलेली मांडणी या पुस्तकांमध्ये पाहता येते. त्यांची चित्रपट आणि ग्राफिक नॉव्हेल यांची आवड 'पॅरासाइट - अ ग्राफिक नॉव्हेल इन स्टोरीबोर्ड्स', यासारख्या पुस्तकात एकत्र आलेली दिसते. पॅरासाइट या 'सर्वोत्कृष्ट चित्रपट' आणि 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट' या दोन्ही विभागात ऑस्कर पुरस्कार मिळवणाऱ्या विक्रमी चित्रपटातले सारे स्टोरीबोर्ड, दिग्दर्शक बॉन्ग जून हो यांनी एखाद्या ग्राफिक नॉव्हेलसारखे मांडले आहेत.


इंद्रजाल कॉमिक्सपर्यंतच माहितीचा परीघ असलेल्या मला हा ग्राफिक नॉव्हेल्सचा खजिना पाहून आश्चर्याचा धक्काच बसला. सुपरमॅन, बॅटमॅन यांसारख्या सुपरहीरोंबरोबरच या आकारानं मोठ्या आणि जाड चित्रमय पुस्तकांमध्ये राजकारणासारखे आणि मर्डर मिस्ट्रीसारखे गंभीर विषयही हाताळले जातात. ॲलन मूर, नील गेमन, फ्रॅन्क मिलर हे त्यातले अग्रणी लेखक.


स्टीव्हन किंगचा 'स्केलेटन क्रू' हा भयकथासंग्रह गणेशनी दहावीत असताना वाचला. तेव्हापासून मनात ठाण मांडून बसलेल्या या लेखकाची सगळी पुस्तकं त्यांनी पुढे जमवली. त्याबरोबरच एच.पी. लव्हक्राफ्ट, हारुकी मुराकामी, रे ब्रॅडबरी, रेमंड कार्व्हर, मायकल कॉनली, रोअल्ड डाल असे त्यांचे अनेक आवडते लेखक आहेत. परंतु विशिष्ट लेखकांपुरतं त्यांचं वाचन मर्यादित नाही. शेवटी पुस्तक आवडण्याला गणेश जास्त महत्त्व देतात. कॉलेजमध्ये असताना ब्रिटिश काऊन्सिल लायब्ररीत सापडलेलं ब्रिटिश कवी सायमन आर्मिटेज याच्या कवितांचं 'झूम' हे पुस्तक आवडलं म्हणून त्यांनी झेरॉक्स करून ठेवलं होतं. अनेक वर्षं त्यांच्याकडे ही स्पायरल बाईंड करून ठेवलेली कॉपी होती. पुढे लंडनच्या एका पुस्तकाच्या दुकानातून त्यांना एका मित्रानं फोन करून विचारलं, की 'काय घेऊन येऊ?', तेव्हा त्यांनी याच पुस्तकाची कॉपी आणायला सांगितली.

पुस्तकांचा संग्रह करणाऱ्या माणसानं आपल्याला आवडणारी, आपल्याकडे असावीत असं वाटणारी पुस्तकं घेतली पाहिजेत असं त्यांचं मत आहे. सगळीच वाचून होतात असं नाही. सगळंच वाचलं गेलं पाहिजे ही अपेक्षाही नाही. संदर्भग्रंथांमधील तर अनेकदा मर्यादित भागच वाचला जातो. परंतु जे पुस्तक लागेल तेव्हा आपल्याकडे असावं या मताचे ते आहेत.

संदर्भग्रंथांची जागा गुगल घेतंय का, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला. गुगलवरही कुठे काय शोधायचं याची जाण हवी, आणि त्याची विश्वासार्हता तुम्हाला पक्की माहीत हवी. ती अनुभवानं येते, समविचारी मित्रांकडून कळते. उदाहरणार्थ, 'सेन्सेस ऑफ सिनेमा' नावाची साईट चित्रपटांबद्दल अभ्यासपूर्ण लेख पोस्ट करते, जे पुस्तकांमध्येही सापडत नाहीत.

गणेश मराठी पुस्तकांचं वाचनही तितक्याच जोमानं करतात. त्यांच्याकडे मराठी पुस्तकांचाही मोठा संग्रह आहे. अनुवादांबद्दल त्यांचं निश्चित मत आहे. मूळ पुस्तक इंग्रजीत असेल वा एखाद्या वेगळ्या भाषेतल्या पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादाची गुणवत्ता सिद्ध झाली असेल, तर ती पुस्तकं ते इंग्रजीतच वाचतात. परंतु मूळ भाषेतून केलेले थेट मराठी अनुवाद असले, तर मात्र ते आवर्जून त्यांची मराठी आवृत्ती





वाचतात. पपांच्या आणि बाबांच्या संग्रहातील जुन्या पुस्तकांचं वाचन हा त्यांचा आवडीचा विरंगुळा. विंदांचं 'विरूपिका' अनेकदा वाचायला त्यांना आवडतं. गंगाधर गाडगीळ, विजय तेंडुलकर, अरुण साधू, दि.बा. मोकाशी, अरविंद गोखले अशा ज्येष्ठ लेखकांसह सतीश तांबे, मिलिंद बोकील, प्रणव सखदेव, पंकज भोसले, हृषीकेश गुप्ते, अशा आज लिहित्या लेखकांचीही अनेक पुस्तकं त्यांच्या संग्रही आहेत.


दहावीपर्यंत शिक्षण मराठी माध्यमातून झाल्यामुळे मराठी वाचन आणि लेखन यावर त्यांची चांगलीच पकड आहे. वडिलांच्या रूपानं सिद्धहस्त लेखक घरातच होता. रत्नाकर मतकरींची एक छान सवय होती, ते त्यांचं लिखाण आधी घरातल्यांना मोठ्यानं वाचून दाखवायचे. दिवाळी अंक नित्यनेमानं घरी येत. नाटकं, कथा, कविता या सगळ्या साहित्यप्रकारांचं वाचन करण्यास अनुकूल असं वातावरण घरात होतं. इंग्रजी वाचनाची गोडी मात्र त्यांना पपांनी लावली. पाचवीसहावीत असताना, शाळेत नुकतं इंग्रजी सुरू झाल्यावर त्यांनी गणेशना त्यांच्या घराशेजारी असलेलं वसंत वाचनालय सुरू करून दिलं आणि कॉमिक्सच्या माध्यमातून त्यांनी आपल्या इंग्रजी वाचनाचा श्रीगणेशा केला. चित्रं जोडीला असल्यामुळे इंग्रजी शब्दांचे अर्थ कळणं पर्यायानं सोपं जातं हे पपांचं म्हणणं योग्यच ठरलं. तिथे सुरू झालेलं वाचन हळूहळू सखोल झालं तरी त्यांची ग्राफिक नॉव्हेलची टिकून राहिलेली आवड ही त्या दिवसांचीच खूण म्हणता येईल.

ई रीडर आल्यानंतर वाचनाच्या माध्यमांमध्ये क्रांती झाली. किंडलसारखं माध्यम जन्माला आलं. ऑडिबल, स्टोरीटेलसारखे ऑडिओबुक प्रकाशक अस्तित्वात आले. प्रवासात, विशेषतः तुम्ही स्वत: ड्राइव्ह करत असाल तर ऑडिओबुक फार फायद्याची असतात असं गणेशचं मत आहे. पूर्वी कामानिमित्त दिवसाला तीन-चार तास ड्रायव्हिंग होत असे त्या काळात त्यांनी अनेक जाडजूड पुस्तकं अशा प्रवासात संपवली आहेत. आयन रँडचं 'अॅटलस श्रग्ड', वा स्टीव्हन किंगच्या 'द डार्क टॉवर' मालिकेचे पहिले चार भाग अशा अनेक पुस्तकांची उदाहरणं ते देतात. ई वा ऑडिओ स्वरूपात वाचन सुरू असतानाच गणेशच्या डोक्यात एकदा असा विचार आला, की काही अशी पुस्तकं असतील का, जी इ स्वरुपात वाचताच येणार नाहीत? याची काही उदाहरणं त्यांच्याकडे पाहता आली. मार्क झेड डॅनीएलेव्स्की याच्या 'हाउस ऑफ लीव्हज' या पुस्तकात फॉन्ट, लेआउट, रंग यात अनेक प्रयोग आहेत, जे केवळ प्रिन्ट एडिशनमधेच कळू शकतील. जे जे अॅब्रम्स आणि डग डॉर्स्ट यांनी लिहिलेल्या 'S.' या पुस्तकाचा प्रकार तर आणखीच वेगळा. वर वर पाहता हे वाचनालयातल्या एका पुस्तकाची प्रत वाटतं. या वाचनालयातल्या पुस्तकातला मजकूर आणि वेळोवेळी वाचनालयातून हे पुस्तक घेऊन जाणाऱ्या दोन वाचकांनी मार्जिनमध्ये लिहून एकमेकांशी साधलेला संवाद, एकमेकांसाठी पुस्तकाच्या पानांमध्ये ठेवलेल्या खुणा, कागद, पोस्टकार्ड, या सगळ्यातून एकत्रितपणे हे पुस्तक आकाराला येतं. मुळात 'वाचनालयातलं पुस्तक' हे रूप असणं हाच या संकल्पनेचा आधार आहे, त्यामुळे ई रीडरवर ते असूच शकत नाही.

गणेशना स्वतःला नवनवीन पुस्तकांचा शोध घ्यायला आवडतो. व्हिडिओ ब्लॉग, पॉडकास्ट, गार्डिअन / न्यू यॉर्करसारख्या मासिकांतले लेख यांमधून बरीच माहिती मिळते. बुकरसारख्या पुरस्काराच्या निमित्तानं प्रकाशित होणाऱ्या याद्या, हादेखील माहितीचा मार्ग असू शकतो. काही लेखक असे असतात ज्यांचं नित्य नवं लिखाण येत असतं, तर लवक्राफ्टसारखा एखादा असा असतो, की ज्याच्या पश्चातही त्याचं काम नव्या एडिशन, सटीप आवृत्त्या, रूपांतरं अशा नवनव्या स्वरूपात आपल्यापर्यंत येत असतं.

लेखक हा उत्तम वाचक असायला हवा, हे मत गणेशना सरसकट मान्य नाही, तरीही पुस्तकं अनेकदा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रेरणा देऊ शकतात या मताचे ते आहेत. याचं एक उदाहरण म्हणजे त्यांनी लिहिलेली 'ब्रेक' या नावाची पहिली कथा, जी 'खिडक्या अर्ध्या उघड्या' या कथारूपी कादंबरीचं पहिलं प्रकरण आहे. ही लिहिण्याआधी ते मुराकामीचा 'द एलिफन्ट व्हॅनिशेस' हा संग्रह वाचत होते. तो वाचतावाचता त्यांना तीव्रतेनं वाटायला लागलं की आपणही काहीतरी लिहायला हवं. मग त्यांनी हातातली कथा संपवली आणि स्वतःची लिहायला घेतली. याला शुद्ध प्रेरणा म्हणता येईल, कारण मुराकामीचा संग्रह आणि खिडक्या यात आशयाच्या दृष्टीने कुठलाच थेट संबंध नाही.

'मॅड' मासिकांचा एक संग्रह गणेश यांच्या लायब्ररीत शिस्तीनं उभा आहे. त्या संग्रहित मासिकांची जन्मकथा सांगताना ते म्हणाले की हे अमेरिकन मासिक त्यांना खूप आवडायचं. हे 'मॅड'प्रेम वारसाहक्कानं पपा आणि बाबांकडून आलेलं. टीव्ही किंवा सिनेमातील कथांचं विडंबन या अंकांमध्ये हटकून पाहायला मिळत असे. शालेय दिवसांत 'स्टार ट्रेक' मालिकेचं विडंबन असलेला एक अंक त्यांना बाबांनी दाखवला होता. मग



त्या मासिकांचा शोध सुरू झाला. ब्रिटिश मॅडचा २५ वर्षांचा प्रवास मांडणारा एक अंक त्यांना रद्दीवाल्याकडे मिळाला. शिवाजीपार्क, किंग्ज सर्कल, सीएसटी (व्हीटी), फाउंटन येथील पुस्तकांची दुकान आणि रद्दीवाले यांना भेटी देऊन ही शोधमोहीम जारी राहिली. या जुन्या अंकांचा गठ्ठा त्यांच्या संग्रहात आहे. अलीकडे मात्र यातली बरीच आपण सहज ॲमेझॉनवरून मागवू शकतो. लहानपणी आवडणाऱ्या 'टिनटिन' कॉमिक्सचा पूर्ण संच त्यांनी असाच ॲमेझॉनवरून विकत घेतला आहे. त्यांच्याही विशेष आवृत्त्या सहज हाती लागत नाहीत. टिनटिन रंगीत होण्याआधीच्या जवळजवळ दुप्पट पृष्ठसंख्या असलेल्या आवृत्त्या उपलब्ध आहेत, पण त्या टिनटिनच्या अधिकृत दुकानांमध्येच सहसा सापडतात. त्यासाठी वेगळी शोधाशोध करावी लागते.

मलेशियाला भेट द्यायची होती तेव्हा गणेशनी तिथल्या पुस्तकालयांचा शोध घ्यायला सुरुवात केली. खवय्ये जशी खाद्यसंस्कृती अनुभवण्यासाठी स्थानिक पदार्थांची चंगळ असलेली आहारगृह धुंडाळतात; तसे गणेश त्यांच्या वाचनछंदाला खाद्य शोधत तिथल्या गल्लीबोळांत फिरत असतात. नेटवरील शोधमोहिमेत त्यांना 'बुकअॅक्सेस' या चेन स्टोअरचा शोध लागला. अतिशय वाजवी किमतीत दुर्मिळ, आवृत्त्या संपलेली पुस्तकं या दुकानांमध्ये मिळतात. यातलं पहिलं दुकान सापडलं, ते 'रेक्स केएल', या जुन्या थिएटरमध्ये केलेल्या नव्या मांडणीत. या दुकानाची बांधणी करणारा कसलेला कलाकारच असावा. या इमारतीतल्या ऑडिटोरियमचा ढाचा तसाच ठेवून, इतर डागडुजी करून तिथे हे पुस्तकालय उघडलंय. 'घेता किती घेशील दो करांनी' अशी अवस्था झालेल्या गणेशनी या, आणि बुकअॅक्सेसच्या इतर आउटलेटमधूनही भरपूर पुस्तकं खरेदी केली. त्या दुकानांसाठी पुन्हा मलेशियाला जायची त्यांची तयारी आहे.

पुस्तकांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या एका अवलिया समीक्षक मित्राचा किस्सा मला मतकरींशी मारलेल्या गप्पांच्या ओघात ऐकायला मिळाला. घरात एक गादी घालण्यापुरती जागा आणि बाकी सगळीकडे फक्त पुस्तकांचे ढीग. वरचा माळाही त्याला अपवाद नाही. खूप दुर्मिळ पुस्तकं, महागड्या एडिशन असं अक्षरश्रीमंतीनं भरलेलं पुस्तकांचं घर! पुस्तकांच्या घरात त्याला राहायला फक्त सहा फुटी जागा. एके दिवशी त्याने या चारपाच मित्रांना बोलावलं आणि त्याच्या घरातील मोजकी पुस्तकं अर्ध्या किमतीत द्यायला तो तयार झाला. पुस्तकं सुस्थळी पडावीत ही त्यामागची भावना असावी. गणेशची नजर त्यातील सुपरमॅनच्या मूळ पुस्तकाच्या रीप्रिंटवर खिळून होती. अगदी निघताना त्या पुस्तकवेड्यानं ह्या पुस्तकवेड्याला ती फुकट देऊ केली. गोल्डन एज कालावधीतल्या सुपरमॅनच्या वेषातली एक फिगरीनही या पुस्तकाबरोबर आहे. त्या वेषातील हा बलदंड सुपरमॅन फारच आकर्षक दिसत होता.

बऱ्याचदा असं होतं की पुस्तकांशी भावनिक नातं जुळतं. कुठेतरी नाळ जोडली जाते किंवा त्या लेखकाबद्दल त्यातील पात्रांबद्दल अपार करुणा दाटून येते. हे नातं चाचपडण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सांगितलं की अशी दोन पुस्तकं त्यांना खूप अस्वस्थ करून गेली. 'नोटीस' पुस्तकाची लेखिका हिदर लुईस हिनं आत्महत्या केली. ऑली या ब्लॉगरने आपल्या 'क्रिमिनॉली' या यूट्यूब चॅनलवर तिच्याबद्दल माहिती दिली होती. मानसिकदृष्ट्या अस्थिर असणाऱ्या या लेखिकेनं तिला लहानपणी आलेल्या लैंगिक अत्याचारांच्या अनुभवांबद्दल या पुस्तकात लिहिलं आहे. ऑलीनं केलेल्या भावनात्मक वक्तव्यामुळे लोकांमध्ये ते पुस्तक विकत घेऊन वाचण्याची इच्छा बळावली. मूळ पुस्तकाच्या आवृत्त्या संपल्या होत्या. परंतु जुन्या प्रतींच्या किमती वाढत गेल्या. पुस्तक अल्पावधीत नव्यानं लोकप्रिय झालं. प्रकाशकांना तसं कळवल्यावर त्यांनी ते रीप्रिंट केलं आणि वाचकांना प्रती उपलब्ध करून दिल्या. त्याची माहिती पॉडकास्ट चॅनेलवरून गणेशना मिळाली आणि त्यांनी ती विकत घेतली. वाचून त्यांचं मन खूप अस्वस्थ झालं होतं. दुसऱ्या पुस्तकाच्या लेखकाची केस आत्महत्येचीच पण थोडी वेगळी. कार्टूनिस्ट केफेब नावाचा ग्राफिक नॉव्हेलबद्दलचा एक अभ्यासपूर्ण यूट्यूब चॅनेल आहे, जो जिम रग आणि एड पिस्कोर हे ग्राफिक नॉव्हेलिस्ट असलेले दोघं चालवत. कॉमिक इंडस्ट्रीतल्या काही जणांनी यातल्या एड पिस्कोरची प्रचंड बदनामी केली, ती सिद्ध होऊ न शकलेल्या लैंगिक शोषणाच्या आरोपावरून. बदनामीच्या भीतीनं जिम रगनं जाहीरपणे एड पिस्कोरशी असलेले संबंध तोडले आणि एडच्या गावात त्याची कला दाखवण्यासाठी भरवण्यात येणारं प्रदर्शन आयोजकांनी रद्द केलं. यानं व्यथित झालेल्या एडनं आपण का आत्महत्या करतोय हे सांगणारं आणि आपली बाजू स्पष्ट करणारं एक पत्र इंटरनेटवर टाकून आत्महत्या केली. त्याच्या बाजून बोलणारे अनेक आवाज हळूहळू पुढे आले पण खूप उशिरा. कार्टूनिस्ट केफेबचे नियमित प्रेक्षक असलेल्या गणेशना या प्रकाराची खंत वाटली आणि एड पिस्कोर आपल्या संग्रहात असण्याची गरजही. पिस्कोरच्या प्रसिद्ध कामातल्या 'एक्स मेन– ग्रॅन्ड डिझाइन'चा संच त्यांनी आपल्या संग्रहात ठेवण्यासाठी मागवून घेतला.

पुस्तकांच्या संग्रहानं विचारांची, ज्ञानाची समृद्धी वाढते. गणेश मतकरी यांनी तनमनधन अर्पून हा आपला छंद जोपासला आहे. पुस्तकांच्या शोधात त्यांनी कित्येक रस्ते आणि दुकानं पालथी घातली आहेत, जड बॅगा उचलून आणल्या आहेत. कित्येक रात्री एकाग्र चित्तानं ब्लॉगवाचन केलंय, लिखाण केलंय आणि आवडलेल्या पुस्तकासाठी हात आखडता न घेता आपला खिसा मोकळा केलाय. कायिक 'वाचिक' आणि मानसिक अशी ही अक्षरगुंतवणूक, आनंदरूपी भरपूर परतावा देणारी.

**– मेधा आलकरी**
medhaalkari@gmail.com



# पानफुटीचं झाड

## डॉ. सिसिलिया कार्व्हालो

विद्यार्थिदशेत असताना घरात काही 'ट्रंका' दिसल्या होत्या. त्या पुस्तकांनी भरलेल्या होत्या आणि माळ्यावर ठेवून दिलेल्या होत्या. एकदा मी त्या उघडून पाहिल्या, त्यात सारीच पुस्तके इंग्रजीतली होती. त्यात पालग्रेव्हचे 'गोल्डन ट्रेझरी' हे पुस्तक होते. इंग्रजीतली पुस्तके धार्मिक स्वरूपाची होती. त्यातले पालग्रेव्हचे पुस्तक वेगळे वाटले. ते बाजूला करून ठेवले होते. महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली, कारण आमच्या वर्तक महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय! तत्पूर्वी वडिलांकडून काही साहित्याचा आणि साहित्यिकांचा परिचय झालेला होता. त्यांना वाचनाची आवड होती. माझ्या चुलत्यांनाही वाचनाची आवड होती. त्यामुळे घरात पुस्तके येत होती. शिवाय दोन चुलतबंधू धर्मगुरू होण्यासाठी 'सेमेनरी'त गेलेले होते. त्यामुळे धार्मिक स्वरूपाची पुस्तके येत गेली. इंग्रजी पुस्तकांची बांधणी भक्कम पुठ्ठ्याची आणि हातात घ्यायलाही छान वाटायचे. आपणही अशी पुस्तके जमवावीत असे वाटत असे. वडील रेल्वेत नोकरी करत असल्याने उदयपूर (राजस्थान) येथे हिंदीच्या परीक्षा देण्यासाठी जात. त्या पुस्तकातील छापील अक्षरे ठळक आणि मोठी होती. त्यामुळे मी हिंदी पुस्तकेही वाचत असे. वडील परीक्षेसाठी वाचत आणि मी माझ्या आनंदासाठी वाचत असे. म्हणजे एकाच वेळी शालेय अभ्यासक्रमातील मराठी पुस्तके, घरातील धार्मिक स्वरूपाची इंग्रजी पुस्तके, वडिलांची हिंदी पुस्तके आणि आठवीपासून संस्कृत विषय होता. तो अगदी महाविद्यालयातील दोन वर्षापर्यंत! त्यामुळे संस्कृतचीही गोडी लागली. अशी चार भाषांतील पुस्तके शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात वाचायला मिळाल्याने तिथूनच वाचनाची आवड निर्माण झाली. बी.ए.ला मराठी प्रमुख विषय असल्याने अभ्यासक्रमात लावलेल्या पुस्तकांव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचायला हवीत, विषयाशी संबंधित पुस्तकं वाचायला हवीत म्हणून बी.ए. आणि एम.ए. करत असताना, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाणे सुरू झाले. तेथील ग्रंथसंभार पाहून तर मी दिपूनच गेले. पुस्तकांची अशी चळत आपल्याही घरात असावी असे वाटत राहिले. तोपर्यंत काही पुस्तके विकत घेण्यास हळूहळू सुरुवात केली होती.

मराठी विषयाची प्राध्यापक म्हणून वर्तक महाविद्यालयात रुजू झाले; आणि अभ्यासाचा आवाका वाढला. त्यातच थोडेफार लिहू लागले होते. साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग वाढू लागला होता. आमच्या चर्चप्रणीत मुखपत्राची संपादकीय जबाबदारी माझ्याकडे सोपवलेली होती. महिलांविषयक प्रश्नांवर वाचा फोडणारे लेखनही मी करू लागले. सांस्कृतिक-सामाजिक



स्वत:चे ग्रंथालय

परिवेश विस्तारित होऊ लागला होता. त्यानिमित्ताने वाचन, लेखन, व्याख्याने आणि पुस्तके विकत आणणेही चालले होते. वर्तक महाविद्यालयात असताना साधारणपणे १९८० ते १९८३च्या दरम्यान ग्रंथालीने, वर्तक महाविद्यालयात प्रदर्शन भरवले होते. तेव्हा मी कमी किमतीत बरीच पुस्तके विकत घेतली होती. आता माझा ग्रंथसंग्रह वाढत चालला होता. विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या निमित्ताने, माझ्या वैयक्तिक अभ्यासाच्या निमित्ताने आणि १९८५ मध्ये पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला, तेव्हा अनेक पुस्तके भेटीदाखल मिळू लागली. पुस्तकांचे मूल्य कळू लागले. विविध समाजातील जीवन अधिक जवळून कळू लागले. विशेषत: संतसाहित्य आणि दलितसाहित्य. त्यातही दलित समाजातून आलेल्या कविता आणि आत्मकथने यांनी मनावर गारुड केले.



अमेरिकेतील ग्रंथालयाला भेट

इतक्या धीटपणे, स्पष्टपणे आणि आत्मविश्वासाने आपल्याला लिहिता यायला हवे असे वाटत गेले. त्यासाठी वाचन आवश्यक होते. तशी पुस्तकेही घरात येत गेली. आधी आजीच्या पेटीत विसावलेल्या पुस्तकांसाठी एक कपाट आणले. नंतर भिंतीवरले कपाट, पुन्हा लोखंडी आणि काचेची दारे असलेले कपाट आले. दिवसागणीक पुस्तकांची संख्या वाढत गेली. घरात पुस्तके असणे म्हणजे पानफुटीचे झाड लावण्यासारखेच असते किंवा फुले वेचिता बहरू कळियांसि आला; अशी ही अवस्था!

मग जुन्या घराच्या जागी नवीन घर बांधण्याचा घाट घातला; तेव्हा पहिला विचार पुस्तकांचा आला आणि त्याप्रमाणे एक संपूर्ण मजला मला पुस्तकांसाठी राखता आला. तरीही अन्य मजल्यांवरही पुस्तकांनी जागा व्यापलेली आहे. शेकडो पुस्तके वसईतील चार ग्रंथालयांना देणगी म्हणून पाठवली जातात. आवश्यक असलेली पुस्तके, मला आवडलेली पुस्तके मात्र आपली जागा सोडत नाहीत. अनेक जण माझ्याकडील पुस्तके वाचण्यासाठी घेऊन जातात. काही जण परत आणून देतात. काही नाही देत. पुस्तकांची अशी पायफुटी असते म्हणायची! मीही दुसऱ्यांकडील पुस्तके वाचण्यासाठी आणते, काही प्रेमाने मला पुस्तके देतात त्यांच्याकडची. ती मात्र मी त्यांना परत करते. परंतु माझा ग्रंथांचा खजिनाही काही रिकामी होत नाही.

काळ आणि परिस्थितीनुसार वाचनाचे विषय बदलू शकतात. आपल्या आवडीनुसार आपण पुस्तके वाचू शकतो. संस्कृतिवैविध्यावरील पुस्तके वाचणे हाही आनंदाचा आणि माहितीत भर घालणारा भाग आहे, असे वाटते. इतर कोणत्याही लौकिक संपत्तीपेक्षा ज्ञानसंपत्ती बाळगणे आजच्या काळात महत्त्वाचे आहे असे वाटते. किंबहुना ती काळाची मागणीच आहे! सुधारक पुरुष आणि महिलांची चरित्रे वाचणे ही तर आजच्या काळाची खरी गरज आहे.

आजच्या घडीला आपण जगाचे नागरिक आहोत. त्यामुळे आपल्या मनाच्या आणि अनुभवाच्या कक्षा रुंदावायला हव्यात. त्यासाठी प्रवास आणि वाचन ही दोन चाके मनाला लावायला हवीत. प्रवासामुळे मन सतत जागृत आणि ताजतवाने होते. त्यामुळे परिसराचे, परिस्थितीचे वाचन होते. माणसे वाचता येतात आणि वाचनामुळे एका ठिकाणी बसून जगभरचा प्रवास करता येतो.

लिओ टॉलस्टॉयचे ख्रिस्ताच्या शिकवणीसंदर्भातील एक छोटेसे पुस्तक (The Gospel in Brief) मला आवडले होते. ते कोठेतरी वाचायला मिळाले होते. त्यात येशूचे पर्वतावरील प्रवचन, प्रेम, करुणा, अहिंसा, क्षमा याविषयी अतिशय सोप्या भाषेत लिहिलेले आहे. ख्रिस्त समजून घेण्यासाठी याचा खूप उपयोग झाला. मग 'वॉर अँड पीस' ही कादंबरी संपूर्ण नव्हे, पण समजेल तशी वाचून घेतली आणि त्यावर मराठीत वा इंग्रजीत कोठे कोठे लिहून आले होते ते वाचत गेले. रिझरेक्शन, ॲना कॅरनिना वाचल्या. रशियन माणसाच्या उंच धिप्पाड शरीरयष्टीप्रमाणेच त्यांच्या महाकाय अशा कादंबऱ्या होत्या. लिओ टॉलस्टॉय, फ्योडोर दोस्तोयेवस्की यांची 'द ब्रदर्स कार्माझोव्ह' या सर्व कादंबऱ्या मी विकत आणल्या होत्या. त्या वाचून मी झपाटून गेले.

लिओ टॉलस्टॉयचा महात्मा गांधींवर विलक्षण प्रभाव होता. महात्मा गांधींची छोटी-छोटी पुस्तके. 'नेचर क्युअर'पासून 'सत्याचे प्रयोग'पर्यंत, वाचल्यावर तर येशू ख्रिस्त-



टॉलस्टॉय-महात्मा गांधी अशा त्रिपुटीचा, त्यांचे विचार आणि वर्तन यांचा प्रभाव माझ्याही व्यक्तिमत्त्वावर होत होता. महात्मा गांधी तर म्हणाले, 'मला जगाला नवीन काही सांगण्यासारखं नाही. कारण सत्य आणि अहिंसा ही येथील डोंगरदऱ्यांइतकीच पुरातन काळापासून अस्तित्वात असलेली तत्त्वं आहेत.'

मनाचा असाच कब्जा घेतला होता तो खलिल जिब्रनच्या साहित्याने! सुरुवातीला 'द प्रॉफेट' वाचले होते. विकत घेतले होते; त्यानंतर 'The treasured writing of Khalil Gibran' विकत आणले. खलील जिब्रानच्या भाषावापराची हातोटी पाहून तर मला त्यांच्या साहित्याने वेडे केले. एकामागोमाग एक त्यांची सारी पुस्तकं वाचून काढली. जिब्रान चित्रकारही होते. खलील जिब्रान मला अधिक जवळचे वाटू लागले. त्यांचे एकेक वाक्य म्हणजे सुवचने-सुवर्णवचने होती. 'Prophets are not accepted in his own country.' हे खरे तर येशूचे वचन. पण खलील जिब्रानच्या 'प्रेषित'मध्ये वाचल्यावर त्याचे आकलन लगेच झाले. त्याचे एक वाक्य तर सोबत चालतच असते,

'कवी, तुझ्या डोक्यावरील मुकुट काटेरी आहे. तुझ्यावर स्तुतिसुमनांचे हारतुरे पडण्याआधी तू त्या मुकुटात बंदिस्त आहेस, असे तुला दिसून येईल.'

'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथाचा अनुवाद घन:श्याम तळवटकर, प्राचार्य म.भि. चिटणीस, शां.शं. रेगे यांनी केलेला आहे. माझ्या वडिलांनी मला, मी कॉलेजात शिकत असताना सांगितले होते, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याआधी अनेक धर्मांचा अभ्यास केला होता. ख्रिस्ती धर्माचाही अभ्यास केला होता. परंतु भारतीय मातीतलाच बौद्ध धम्म त्यांनी स्वीकारला. त्या बौद्ध धम्माची सर्वश्रेष्ठता या ग्रंथामुळे कळली. परदेशातून शिक्षण घेऊन आल्यावर सामाजिक चळवळी आणि प्रबोधनाचा विडा त्यांनी का उचलला याचे महत्त्व या ग्रंथाच्या वाचनाने कळले.

कन्नड साहित्यातील संस्कार, 'घटश्राद्ध', 'हयवदन', 'वंशवृक्ष' अशा कादंबऱ्या/नाटके यांनीही मी दिङमूढ झाले होते. तत्कालीन समाजस्थिती वाचून अंगावर काटा आला. तेथील लेखकांनी वास्तवाचे दर्शन किती निडरपणे केलेले आहे. मी थक्क झाले. मराठी वाङ्मयाचा इतिहास शिकताना आणि पुढे शिकवताना तर काळानुसार बदलही मनाला भिडणारा होता.

साहित्याचे वाचन आपल्याला समृद्ध करतेच, ते लेखनासाठीही प्रेरणा देते. पुस्तके आपल्या घरातच असली; तर ती केव्हाही उघडून वाचता येतात. त्यातील व्यक्तिरेखांशी संवाद करता येतो. समाजस्थितीचे, संस्कृतीचे दर्शन होते. आपल्याला विचारप्रवृत्त करते आणि विचार करणे; हे तर जिवंतपणाचेच लक्षण आहे. आज नवनवीन लेखक बदलत्या समाजाची स्पंदने टिपताहेत. ती जाणून घेणेही महत्त्वाची असते. आजच्या पिढीने खरे तर अधिकाधिक वाचन करणं त्यांना प्रदूषित वातावरणापासून वाचवण्यास मदत करील.

जागतिकीकरणानंतरच्या पस्तीस वर्षांच्या काळात आपण वावरतो आहोत. अशा वेळी जात-पात, धर्म-अधर्म-अंधश्रद्धा याकडे अत्यंत डोळसपणे आणि विज्ञानाच्या चक्षूंनी बघता येणे ही तर काळाची फार मोठी गरज आहे. आपल्याच आजूबाजूला आपल्याला आठशे वर्षे मागे नेणारी माणसे आणि वातावरण असताना आपण आपल्या विचारांना निकोप, निरोगी समजाची धार लावण्यासाठी वाचन करणे गरजेचे आहे. विधायक-विचार देणाऱ्या संस्कृती-समन्वय घडवणाऱ्या विचारांचा आविष्कार करणाऱ्या, मानवताधर्माची शिकवण देणाऱ्या आणि माणसांबद्दलची संवेदना जागवणाऱ्या साहित्याचे वाचन करण्याची आवश्यकता आहे, असे मनापासून वाटते.

**– डॉ. सिसिलिया कार्व्हालो**
drceciliacar@gmail.com



# घराला घरपण देणारी - पुस्तकं!

**सुधा हुजूरबाजार-तुंबे**

'मॅडम, बॅग खोलो...चेकिंग करना है...'

'अरे, भैय्या ये देखो ... सिर्फ किताबें है... हम शिक्षक लोग और क्या लेकर जायेंगे? एक बात और सुनो, ये किताबे बाहर निकाली तो ऐसेही लगाकर रखना फिरसे बॅगमें...'

'मॅडम, दारूबंदी है न गुजरातमें... इसलिए चेकिंग करना पडता है... ऐसे बॅगमें किताब, कपडोंमें छिपाकर ले आते है बॉतले बाहरसें... यहाँ कुछ नहीं है... बंद करो...'

'देखा? कुछ मिला क्या? अब सब किताबें बराबर रखो...'

दरवेळचा अहमदाबादच्या बॉर्डर चेकिंगवरचा आमचा हा अनुभव आहे. हे डायलॉग आम्ही गेली अनेक वर्षं ऐकतोय/बोलतोय...

ह्याला कारणीभूत आहेत आमचे पुत्र, सुनबाई आणि नातू...

ह्यांचीच आमच्या सांताक्रूझच्या घरात असलेली पुस्तकं आम्ही दरवेळी एक बॅग भरून घेऊन जातो आणि मग आम्हाला असा अनुभव येतो.

माझ्या माहेरी म्हणजे आमच्या हुजूरबाजारांच्या घरात दोन गोष्टी कायमस्वरूपी असत- एक म्हणजे फळा आणि दुसरी गोष्ट म्हणजे पुस्तकांचा खजिना!

लग्न होऊन सासरी आले. आम्ही उभयतांनी संसार सुरू केला आणि घरात भांडी-कपडे ह्यांच्याबरोबरीनं पुस्तकं जमा होऊ लागली.

मला अगदी लहानपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड. मग खेळाडू ह्या गटात मोडणाऱ्या वासुदेवांना माझा 'वाण नाही पण गुण लागला' आणि वाचनाची आवड निर्माण झाली.

मुलगा चिन्मयचा जन्म झाला आणि मग काय!

त्याच्या वयाला साजेशी अशी पुस्तकं येऊ लागली. आमच्या घरखर्चात बजेटमध्ये 'पुस्तकं' असा एक रकाना कायम असतो. हळूहळू तो खर्च चिन्मय मोठा होत गेला तसा वाढत वाढत जात 'डेफिसिट'मध्ये आला.

चिन्मय आमचा एकुलता एक शांत वृत्तीचा पुत्र खूप बालवयात स्वतः पुस्तक घेऊन वाचू लागला.

अगदी सुरुवातीला आणलेल्या इंग्रजीतील संपूर्ण नॉडी सीरिजपासून फेमस फाय, हार्डी बॉईजपासून पुढे मराठी/इंग्रजी चंदामामा, किशोर, टिनटिन... चिन्मय मोठा होत गेला तशी शेरलॉक होम्स आणि मग मिष्किल विनोद असलेले वुडहाऊस, वाचताना निखळ आनंद देणारी इंग्रजी क्लासिक्स, जॉन ग्रिशम ची पुस्तकं, काहीतरी वेगळं लेखन असलेली पावलो कोहलोची पुस्तकं करता करता जगभरातल्या नामवंत लेखकांची (अगदी काफ्कासुद्धा), बुकर विजेते, नोबेल विजेते आणि इतरही उपस्थिती पुस्तकरूपानं आमच्या घरी लावली.

चिन्मयचं लग्न झालं. सुनबाई दिव्या अगदी अनुरूप म्हणजे वाचनप्रेमी!

ती तिच्या आईवडिलांची एकुलती एक कन्या. लहानपणापासून चिन्मयसारखीच वाचनाची आवड निर्माण झाली होती.

बहुतेक एकुलती एक मुलं वाचनप्रेमी असतात का? हा मला पडणारा प्रश्न संशोधनाचा विषय असू शकतो. तर ह्या वाचनप्रेमी नववधूनं तिच्या माहेरून बॅगा भरभरून तिनं तिचा पुस्तकखजिना आणला होता.

त्यांनी बंगळुरूला आपला संसार थाटला आणि आमच्या घरची पुस्तकं कमी झाली.

तरुण पिढीचं नवीन घर लागलं आणि आम्ही बंगळुरूला त्यांच्या घरी गेलो. आम्हाला आम्ही वाचनालयात आलो आहोत की काय, असं वाटलं.

सगळ्या प्रकारचं साहित्य तिथं नांदत होतं. अर्थात इंग्रजी पुस्तकं अधिक होती. किंबहुना नव्वद टक्क्यांहून अधिक होती असं म्हणणं बरोबर होईल.

नीट कॅटलॉग करून लावलेली ती असंख्य पुस्तकं



काचांच्या कपाटातून आम्हाला खुणावत होती.

त्यांच्यामुळे आमच्या वाचनाची यादी आता विस्तृत झाली होती. ही नवीन पिढी नवीन विचार घेऊन पुस्तकसंचय करताना दिसत होती.

भारतीय तसंच आंतरराष्ट्रीय पातळीवर अग्रेसर असलेल्या लेखकांची इंग्रजी किंवा इंग्रजी भाषांतरीत पुस्तकांची रेलचेल बंगळुरूच्या चार खोल्यांच्या घरात होती.

बंगळुरूचं घर सोडून अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जाताना हा विविधतेनं नटलेला खजिना बॉक्समध्ये विशेष काळजी घेत पॅक होऊन आमच्या मुंबईच्या मोकळ्या माळ्यांवर स्थानापन्न झाला. तो तसाच सुरक्षित राहिला.

चिन्मय नोकरीनिमित्तांनं अहमदाबादच्या आय.आय.एम.च्या बंगल्यात राहायला आला आणि आम्ही हळूहळू माळ्यावरच्या बॉक्समध्ये असलेल्या पुस्तकांना बाहेर काढून बॅगेतून मुंबई ते अहमदाबाद अशी पाठवणी करणं सुरू केलं.

आमच्या मुलाचं अहमदाबादचं घर हे 'पुस्तकांचं घर' ह्या श्रेणीत मोडेल...

संचयी असलेल्या असंख्य पुस्तकांची व्यवस्थित संगणकात नोंद करून पुस्तकांच्या ओळीनुसार तो प्रिंटाऊट कपाटात काचेतून दिसेल असा लावलेला आहे.

नातू सिद्धार्था आता चौदा वर्षांचा होईल. त्याची आजपर्यंतची सगळी पुस्तकं (काही गरीब मुलांना डोनेशन दिलेली वगळता) व्यवस्थित अशीच त्याच्या खोलीत आहेत. लहानपणी त्यांच्यासाठी साध्यासोप्या भाषेतली चित्रांनी भरलेली इंग्रजी तसंच हिंदी पुस्तकेही आणली होती. इटलीच्या एक वर्षाच्या वास्तव्यात अगदी सोप्या इटालियन भाषेतली एक-दोन वर्षांच्या मुलांना समजेल अशा चित्रमय गोष्टींची पुस्तकं मी सिद्धार्थाला मांडीवर घेऊन वाचली आहेत.

क्रॉनिकल्स ऑफ नार्नियाचा समस्त संग्रह तसंच संपूर्ण हॅरी पॉटर सीरिज त्यानं कोव्हिडकाळात वयाच्या दहाव्या वर्षी दोन-तीन महिन्यांत व्यवस्थित वाचली होती. टिनटिन आणि ॲस्टेरीक्स ही सदाबहार पुस्तकं आम्ही तीन पिढ्या अजूनही वाचतो आणि चर्चा करत एकत्र हसतो.

लहानपणापासून प्राध्यापक आई-वडील घरात सातत्यानं वाचताना बघून त्यालाही वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली आणि ती आता वाढतेच आहे...

दिव्याला रहस्यकथा, सामाजिक कादंबऱ्या, लघुकथा विशेष आवडतात. अमिताव घोष, अनुराधा रॉय, चिमामांदा अदीचे आणि हल्लीच्या काळातले भारतीय तसंच आंतरराष्ट्रीय नवीन लेखकही तिला वाचायला आवडतात.

नुकताच तिनं 'सिटीज् इन फिक्शन' म्हणजे काल्पनिक कथांमध्ये असलेल्या शहरांवर आधारित एक उपक्रम सुरू केला आहे. तो सध्या बराच गाजतोय. त्याचं वर्कशॉप ती घेते. त्यात ती काल्पनिक कथा लिहिणाऱ्या लेखकांच्या मुलाखती घेते. शहराबद्दल विचारते. त्यानिमित्तानं बरीच पुस्तकं वाचून जमा झाली आहेत.

तर चिन्मय अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र तसंच राजकारणावर आधारित पुस्तक आवडीनं वाचतो. त्याला काल्पनिक कथांमध्ये रुची नाही असा दिव्याचा आरोप आहे. त्याच्याकडे बरीच पुस्तकं अभिप्रायलेखनासाठी येतात. ती वाचून अभिप्राय देणं त्याला आवडतं.

आधुनिक काळातल्या गणित तसंच विज्ञानावर आधारित कथाही त्यांना आवडतात.

चिन्मयनं तीन वर्षांपासून हिस्टरी लिटरेचर फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात सहयोग दिला आहे. तीन दिवसांत विविध विषयांच्या इतिहासांची चर्चा होते. उदाहरणार्थ, खाद्यपदार्थांचा इतिहास, भारतीय संगीताचा इतिहास, जहाजबांधणीचा इतिहास वगैरे विविध पुस्तकांच्या लेखकांबरोबर चर्चासत्रं असतात. त्याकाळात चिन्मयची किमान चाळीस पुस्तकं विविध लेखकांबरोबर चर्चा करण्याच्या निमित्तानं वाचून होतात आणि घरातल्या संचयात दिमाखानं सामील होतात. तसंच तोही लेखक असल्यानं भारतातल्या विविध लिटरेचर फेस्टिव्हलमध्ये सक्रिय सहभागी असतो. मग काय! येताना बॅगा भरभरून पुस्तकं येतात.

त्याची बरीच शिकवण्यासाठी लागणारी रेफरन्स पुस्तकं त्याच्या ऑफिसमध्येही आहेत.

त्याच्या पुस्तकप्रेमापायी त्यानं मुंबईत गेल्या महिन्यात आला असताना आम्ही आणलेले, त्याला आवडणारे हापूस आंबे अहमदाबादला नेण्याचं नाकारून, ती बॅगेतली जागा मुंबई भेटीत घेतलेली तसंच मिळालेली पुस्तकं नेण्यासाठी वापरली होती.

आम्ही उभयता निवृत्तीचा आमचा काळ अहमदाबादच्या घरी गेलो की पुस्तकं वाचण्यात सुखानं घालवतो...

अगदी आधुनिक हरारीच्या 'सेपियन्स'पासून पूर्वापार 'लक्ष्मीबाई टिळकांच्या चरित्रापर्यंत' अनेक पुस्तकं मी त्यांच्या घरी वाचली आहेत.

आय.आय.एम. अहमदाबादच्या प्राध्यापक मंडळींचा एक 'बुक क्लब' आहे. अतिशय वाचनीय पुस्तकं त्यामुळे घरी विकत घेता येतात.

त्यातलंच 'अ जेंटलमॅन इन मॉस्को' (Gentleman in Moscow) हे मला आवडलेलं इंग्रजी पुस्तकं अमोर टॉव्लेस (Amor Towles) ह्या अमेरिकन लेखकानं अतिशय सुरेख वर्णन करून लिहिलेलं आहे. (त्याचं मराठी भाषांतर झालेलं वाचनात आलं नाही). त्यांचं नंतरचं 'लिंकन हाय वे' तितकंसं आवडलं नाही कारण आधीच्या पुस्तकानं आमच्या अपेक्षा वाढवल्या होत्या.

चिन्मयच्या घराला पुस्तकांनी घरपण आलं आहे. सुरक्षितताही आली आहे असं नातू सिद्धार्था अभिमानानं सांगतो.

''घराला कुलूप फक्त बाहेर गावी जाताना लागतं. इतर वेळी दार लोटून घेऊन चालतं. कारण घरात असंख्य पुस्तकं आणि मिनिमलिस्ट कुटुंबाच्या तत्त्वावर कमीत कमी वस्तू, कपडे आहेत. तेव्हा चोराला नेण्यासारखं काहीही नाही, असं मी माझ्या अहमदाबादच्या घरी भेटायला आलेल्या मैत्रिणीला सांगताच दिव्या मजेनं म्हणाली, ''पण आमच्यासारखा वाचनप्रेमी चोर घरात आला तर मग काही सांगता येणार नाही...''

सभोवताली असलेल्या असंख्य पुस्तकांनी भारावलेल्या माझ्या मैत्रिणीला एक प्रश्न पडला होता–

''तुम्ही सुप्रसिद्ध विक्रम साराभाई वाचनालय असलेल्या आय.आय.एम.च्या कॅम्पसमध्ये रहाता. ही लायब्ररी समोर आहे मग एवढी पुस्तक विकत का घेता?''

''मावशी, आम्हाला पुस्तकाचा कोरा वास आवडतो. किंडलमध्ये तो नसतो. आम्ही वाचताना आत नोंदी करतो. पडलेले प्रश्न किंवा शंका बाजूला समास आखून लिहितो. आणि मुख्य म्हणजे पुन्हा पुन्हा पुस्तक वाचावंसं वाटलं तर कपाटातून लगेच मिळतं. त्यासाठी वाचनालयात वेटिंग लिस्ट असते ती आम्हाला आवडत नाही. मुख्य म्हणजे आम्ही पुस्तकांवर प्रेम करतो. आमच्या घरचा हिस्सा आहेत ती... आमचे मित्र आहेत ही पुस्तकं. वाचताना कधी कंटाळा येत नाही. खूप माहिती मिळते. घरबसल्या जगभर प्रवास घडतो. घडामोडी कळतात.विविध अनुभव समजतात. एकदा वाचनात रंगलो की मग उलट वाचताना उठावं लागलं तर आवडतं नाही. कुठंही प्रवास केला तर तिथली पुस्तकं मात्र नक्कीच आणतो आम्ही.

पुस्तकखरेदी हाच काय तो आमचा खर्च आहे. आम्ही तो खर्च आहे असं मानत नाही.आमच्याकडे गाडी, टीव्ही किंवा भारी कपडे, सौंदर्यप्रसाधनं, सोनंनाणं असे इतर काही छानछौकीचे खर्च होतं नाहीत. तेव्हा पुस्तक विकत घेऊन वाचणं हा आमचा छंद आहे किंवा व्यसन आहे असं समजा...''

शंभर टक्के पटणारे हे विचार मोबाइलच्या जमान्यातली तरुण पिढी करते आहे हे ऐकून धन्य वाटलं. असे तरुण प्राध्यापक भारतीय शिक्षणक्षेत्रात आहेत ह्याचं कौतुकही वाटलं.

आणि पुस्तकांच्या कपाटाचे फोटो काढणाऱ्या माझ्या मैत्रिणीला मग नेहमीसारखे वासुदेव तुंबे मिष्किलपणे म्हणाले,

''तुम्ही इंस्टाग्रामवर शीर्षक द्या– 'असंही एक घर – पुस्तकांचं' किंवा 'घराला घरपण देणारी – पुस्तक'...'

**– सुधा हुजूरबाजार–तुंबे**
sudha.tumbe@gmail.com

# ‘२०२४ – भाजपा जिंकली! कशी?’ पुस्तकाचं प्रकाशन



ग्रंथाली प्रकाशित, तुळशीदास भोईटे लिखित, ‘२०२४ – भाजपा जिंकली! कशी?’ या विधानसभा निकालाचं विश्लेषण करणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन १३ जून रोजी पत्रकार संघाच्या सभागृहात झालं.

यावेळी बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी ‘२०२४ – भाजपा जिंकली! कशी?’ या पुस्तकाच्या नावावरून भाजपावर हल्लाबोल करत भाजपा जिंकलीच कशी असा रोखठोक प्रश्न विचारत मुद्दे मांडले, तर कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी पुस्तकाच्या ‘२०२४ – भाजपा जिंकली! कशी?’ या नावाला योग्य प्रकारे वाचत समजून घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. ते म्हणाले, सध्या भाजपावर बोलणाऱ्यांची संख्या जास्त आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या विचारांनुसार बोलत असतो. मात्र पुस्तकावर बोलण्याऐवजी इतर राजकीय बोलणे हा तुळशीदास भोईटेंच्या पुस्तकावर अन्याय ठरेल. कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. दीपक पवार यांनीही आपले विचार मांडले.

आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले.

लेखक तुळशीदास भोईटे यांनी भूमिका मांडताना २३ नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीचे निकाल लागत असतानाच ‘भाजपा जिंकली! कशी?’ हा प्रश्न मनात आल्याचे सांगत, तोच प्रश्न मोठे नेते ते सामान्य सर्वांच्याच मनात घोळत असल्याचे जाणवल्याचा उल्लेख केला. त्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठीच या पुस्तकाच्या माध्यमातून प्रयत्न केल्याचे सांगितले. केवळ एक प्रकरण वाचून मत बनवू नका तर सर्व २३ प्रकरणे डोळ्यांनी आणि डोक्याने वाचत मग त्यावर भाष्य करा, असेही आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष, एबीपी माझा आणि एबीपी न्यूजचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी ‘२०२४ – भाजपा जिंकली! कशी?’ या पुस्तकात केले गेलेले विश्लेषण अभ्यासपूर्ण, आकडेवारीसह आणि सखोल असल्याबद्दल कौतुक केले. समकालीन घडामोडींची अभ्यासपूर्ण मांडणी पुस्तकांमधून करण्याचे स्वागत करत त्यांनी हे भविष्यातील इतिहास लेखनासाठी उपयोगी ठरेल, असे मत मांडले. सध्या एकांगी पत्रकारिता करण्याऐवजी अशी स्वतंत्र पत्रकारिता करणाऱ्यांसाठी खडतर काळ असल्याचेही निरीक्षण त्यांनी मांडले. असे करणाऱ्यांना साथ दिली जात नाही, असे सांगून तुळशीदास भोईटे यांनाही अशा अवस्थेला तोंड द्यावे लागू शकते, मात्र तरीही त्यांनी ती हिंमत दाखवल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ल, शिंदेंच्या शिवसेनेचे उपनेते निलेश सांबरे, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, सुप्रसिद्ध गझलनवाझ भिमराव पांचाळे खास उपस्थित होते. •

# ‘प्रसादचिन्हे’ एक ज्ञानकोश – बिशप थॉमस डिसोजा




**लेखिका डॉ. सिसिलिया कॉर्व्हालो, बेनॉल्ड डायस, बिशप थॉमस डिसोजा, धर्मगुरू असिस रॉड्रिग्ज, कवी डॉ. महेश केळुसकर, डॉ. अनुपमा उजगरे आणि सुदेश हिंगलासपूरकर**

‘‘प्रसादचिन्हे’ हा केवळ ग्रंथ नाही, तर एक ज्ञानकोश आहे. त्यातून केवळ ज्ञानदान केलेलं नाही, तर समाजावरील प्रश्नांविषयी जागृत केलेले आहे’’ असे उद्‌गार वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस फ्रान्सिस डिसोजा यांनी, डॉ. सिसिलिया कार्व्हालो लिखित ‘प्रसादचिन्हे’ या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलताना उच्चारले. माणिकपूर येथील वाय.एम.सी.ए.च्या सभागृहात सदर प्रकाशनसोहळा मोठ्या थाटात साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कवी डॉ. महेश केळुसकर, डॉ. अनुपमा उजगरे, बसीन कॅथॉलिक बँकेचे अध्यक्ष बेनॉल्ड डायस, माणिकपूर धर्मग्रामचे प्रमुख धर्मगुरू असिस रॉड्रिग्ज आणि ‘ग्रंथाली’चे सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

बिशप पुढे म्हणाले, की ‘‘या ग्रंथाने सद्सद्‌विवेकबुद्धी जागृत केलेली आहे. १८५७च्या स्वातंत्र्यलढ्यात राणी लक्ष्मीबाईंनी राजकीय लढा दिला. हाती तलवार घेऊन इंग्रजांविरुद्ध लढा दिला. तसाच लढा डॉ. सिसिलिया यांनी हातात लेखणी घेऊन आपल्या साहित्यातून समाजातील अन्यायावर प्रकाश पाडून लढा दिलेला आहे.

डॉ. महेश केळुसकर म्हणाले, ‘मराठी साहित्यातील जैवविविधता महत्त्वाची आहे. म्हणूनच मराठी भाषक ख्रिस्ती साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास होत राहिला पाहिजे. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी मराठी भाषक ख्रिस्ती साहित्यिकांच्या २५० लेखक-कवी-संशोधकांच्या ४८४ साहित्यकृतींचा साक्षेपी अभ्यास करून त्यांचा केलेल्या नोंदींचा ‘प्रसादचिन्हे’ हा वाङ्मयकोश म्हणून सिद्ध केलेला आहे.’

शुभेच्छा देताना फादर असिस रॉड्रिग्ज म्हणाले, की ‘प्रसादचिन्हे’ हा ग्रंथ केवळ एक साहित्यकृती नाही, तर मराठी ख्रिस्ती साहित्याच्या वाटचालीचे, समृद्ध परंपरेचे आणि जिवंत श्रद्धेचे प्रतिबिंब आहे. मराठी ख्रिस्ती साहित्य परंपरेला नवा आयाम लेखिकेने ‘प्रसादचिन्हे’मध्ये दिलेला आहे. ख्रिस्ताने दिलेल्या मूल्यांचा वाहता झरा यात आहे. हा असा वारसा आहे जो माणसाला आपल्या मुळांशी नव्याने जोडतो. समाज-धर्म-संस्कृती यांचा सेतू बांधण्याचे कार्य या साहित्याने केलेले आहे.

बेनॉल्ड डायस यांनी वाचन चळवळीला प्रोत्साहन मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. अनुपमा उजगरे म्हणाल्या, ‘डॉ. सिसिलियाच्या कामाविषयी मला नेहमीच कौतुक वाटत आलेले आहे आणि नवलही! ‘प्रसादचिन्हे’ या ग्रंथामुळे माझे नवल शमले... सिसिलिया पाचही बोटांनी लिहितात.’ अधिक लिहिण्यासाठी त्यांच्या हाताला सहावे बोट फुटावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. सिसिलिया कार्व्हालो म्हणाल्या, की ‘मराठी भाषक ख्रिस्ती लेखकांनी ख्रिस्ताने दिलेल्या मानवतावादी मूल्यांतून आपल्या समाजाचे दर्शन घडवले आहे. आणि ‘प्रसादचिन्हे’च्या रूपाने ते मराठी भाषा आणि साहित्याच्या नकाशावर विराजमान झालेले आहे. मराठी भाषक ख्रिस्ती साहित्यकारांनी, आपल्या साहित्याच्या छोट्या-छोट्या पणत्या प्रमाण मराठीच्या प्रवाहात सोडलेल्या आहेत. जेव्हा एक धर्म, एक रंग, एक भाषा असण्याचा मारा आपल्यावर केला जातो. त्या काळात संविधानाची आठवण ठेवून विविध धर्म, विविध रंग, विविध भाषा, विविध संस्कृती यांनी आपल्या भारतभूमीची एकता कशी टिकवून ठेवलेली आहे हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे.’ सदर पुस्तकामागील प्रयोजन आणि संशोधनप्रक्रिया यासंदर्भातील भूमिका त्यांनी सविस्तर सांगितली. ही ‘प्रसादचिन्हे’... प्रकाशचिन्हे आहेत असेही त्यांनी सांगितले.

●

## ॲसिडहल्ल्याचे बळी या विषयावर डॉ. रविन थत्ते यांचे मार्गदर्शन




डॉ. रविन थत्ते यांच्याशी संवाद साधताना सुधा हुजूरबाजार-तुंबे

ग्रंथाली प्रतिभांगण आयोजित 'काही तरी विशेष' कार्यक्रमाच्या दहाव्या भागात बुधवार, १९ मार्च २०२५ भारतातील ख्यातनाम प्लास्टिक सर्जन आणि ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक डॉ. रविन थत्ते यांनी 'ॲसिडहल्ल्याचे बळी' या विषयावर मार्गदर्शन कले. याच कार्यक्रमात लेखिका सुधा हुजूरबाजार-तुंबे यांच्या 'रंग जीवनाचे' या ललितलेखसंग्रहाचे प्रकाशन डॉ. रविन थत्ते यांच्या हस्ते झाले. सुधा तुंबे यांच्या 'रंग जीवनाचे' पुस्तकाला डॉ. थत्ते यांची प्रस्तावना लाभली आहे.

लेखिका सुधा तुंबे यांनी डॉ. रविन थत्ते यांची मुलाखत घेतली. संपूर्ण मुलाखत आपल्याला 'ग्रंथाली प्रतिभांगण' या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. ॲसिडहल्ल्याचे मानवी हल्ले, रासायनिक प्रक्रिया, कारखान्यात होणाऱ्या दुर्घटना अशा विविध घटनांमध्ये ॲसिडमुळे भाजल्याच्या घटना घडताना दिसतात. ज्यात अनेकांना अपंगत्वदेखील येते अथवा काही वेळेस प्राणदेखील गमवावे लागतात. ॲसिडने भाजल्यानंतर कशा पद्धतीने प्लास्टिक सर्जरी करून उपचार केले जातात याचे तपशीलवार वर्णन डॉ. थत्ते यांनी मुलाखतीत केले. प्लास्टिक सर्जरीच्या क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉ. थत्ते यांनी त्यांना भारतात व भारताबाहेर आलेले विविध अनुभव-घटना सांगत विषय मांडला.

•

---

## समुद्रविज्ञानाची ओळख



रविराज गंधे व्याख्यान देताना

ग्रंथाली-प्रतिभांगण येथे सोमवार, १९ मे २०२५ रोजी लेखक व माध्यमतज्ज्ञ रविराज गंधे यांनी 'महासागर : समुद्रविज्ञानाची परिपूर्ण ओळख' या विषयावर व्याख्यान दिले. रविराज गंधे आणि डॉ. नंदिनी देशमुख संपादित 'महासागर समुद्रविज्ञानाची परिपूर्ण ओळख' या पुस्तकावर आधारित हे व्याख्यान होते. समुद्राविषयीची अनोखी माहिती, समुद्रातील जीवसृष्टी, समुद्राची निर्मिती, विविध महासागर, असे अनेकविध पैलू गंधे यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून उलगडले. अखेरीस जीवसृष्टीचा ऱ्हास टाळण्यासाठी पर्यावरणीय दृष्ट्या समुद्र या निसर्गातील घटकाचे संवर्धन होणे आवश्यक आहे, असे आवाहन रविराज गंधे यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रम ग्रंथाली प्रतिभांगण यूट्यूब चॅनलवर पाहता येईल.

सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले.

•

## ‘आरोग्याची कॅप्सुल’मध्ये डॉ. आनंद नांदे यांची मुलाखत



डॉ. आनंद नांदे यांच्याशी संवाद साधताना डॉ. सतीश नाईक

ग्रंथाली प्रतिभांगण आयोजित आरोग्याची कॅप्सुल कार्यक्रमाच्या २५ व्या भागात, १ जून २०२५ रोजी सुप्रसिद्ध शल्यविशारद डॉ. आनंद नांदे यांची मुलाखत मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक यांनी घेतली. डॉ. आनंद नांदे मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटल ऑफ मेडिकल सायन्सेस आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सल्लागार शल्यविशारद आणि शस्त्रक्रिया प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. गॅसलेस दुर्बिणीतून शस्त्रक्रिया हे नवे मॉडेल डॉ. नांदे यांनी विकसित केले. रुग्णांना कमीत कमी त्रास होऊन शस्त्रक्रिया केली जावी, यासाठी त्यांनी हे मॉडेल विकसित केले. या पद्धतीने त्यांनी आतापर्यंत जवळपास ३००० शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष सांगायचे म्हणजे रुग्णांचा शस्त्रक्रियेचा खर्च वाढू नये म्हणून गॅसलेस दुर्बिण शस्त्रक्रिया या मॉडेलचे त्यांनी कोणतेही पेटंट घेतलेले नाही.

डॉ. नांदे यांनी मुलाखतीच्या पूर्वार्धातात आपले बालपण, शैक्षणिक प्रवास यासंदर्भातील आठवणी सांगितल्या. गुरुस्थानी असणाऱ्या डॉ. व्ही.एन. श्रीखंडेसरांमुळे आपली एक नीतीमूल्ये जपणारा डॉक्टर म्हणून कशी जडणघडण झाली याविषयीचे काही प्रसंग प्रेक्षकांना सांगितले. डॉ. नांदे मुलाखतीत असेही म्हणाले, की ऑपरेशन आधी डॉक्टरांच्या डोक्यात होते आणि मग ते हातून घडत, श्रीखंडेसरांचे हे वाक्य ऑपरेशन करताना कायम माझ्या मनात असते. ते म्हणाले, मी जे काही काम केले आहे व करत आहे ते मी गुरूंच्या खांद्यावर उभा आहे म्हणून. मी याबाबतीत नशीबवान आहे. मला अतिशय चांगले गुरू मिळाले. यामुळे मला वाटते आपण आपल्या गुरूंकडून मिळालेले ज्ञान नवीन डॉक्टरांना द्यावे, आपल्या गुरूंना दिलेली खरी गुरुदक्षिणा आहे. डॉ नांदे यांनी दुर्बिणीतून शस्त्रक्रिया कशी केली जाते, विविध आजारांमध्ये दिले जाणारे उपचार अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. आनंद नांदे यांची संपूर्ण मुलाखत ग्रंथाली-प्रतिभांगण यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

•

## आरोग्याची कॅप्सूल फॅमिली डॉक्टर विशेष भाग



डॉ. प्रभाकर देशपांडे यांच्याशी संवाद साधताना डॉ. सतीश नाईक

ग्रंथाली प्रतिभांगण आयोजित आरोग्याची कॅप्सूल कार्यक्रमाच्या चोविसाव्या भागात बुधवार, १६ एप्रिल २०२५ रोजी डॉ. प्रभाकर देशपांडे यांची ‘फॅमिली डॉक्टर’ या विषयावर मुलाखत प्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक यांनी घेतली. डॉ देशपांडे १९६३ पासून मुंबईत फॅमिली डॉक्टर म्हणून कार्यरत आहेत. डॉक्टर देशपांडे यांची मल्लिकार्जुन मन्सूर (अनुवादित पुस्तक) आणि ‘स्वास्थ्यसखा’ ही दोन पुस्तके प्रकाशित आहेत.

डॉ. देशपांडे यांनी मुलाखतीत त्यांचा पुणे ते मुंबई व्हाया अहमदाबाद वैद्यकीय क्षेत्रातील प्रवास कसा झाला, फॅमिली डॉक्टर म्हणून काम करत असताना आलेले चांगले-वाईट अनुभव, आज फॅमिली डॉक्टर दुर्मिळ का होत चालले आहेत अशा विविध प्रश्नांना मिश्किल शैलीत उत्तरे दिली.

‘‘फॅमिली डॉक्टर हा छोटा डॉक्टर असतो पण त्या डॉक्टरला रुग्णाच्या दोन-तीन पिढ्यांचा वैद्यकीय इतिहास माहीत असतो.ज्याची डायग्नोसिस मध्ये मदत होते. मिडिया हा मेडिकलचा शत्रू आहे, ज्यात सतत नकारात्मक बातम्या सांगितल्या जातात. फॅमिली डॉक्टर चोवीस तास उपलब्ध असणारा डॉक्टर आहे. पण तुलनेने आर्थिक लाभ कमी आहे. पण आर्थिक बाबी बाजूला ठेवून फॅमिली डॉक्टरने काम करणे आवश्यक आहे. फॅमिली डॉक्टर कमी होत चालल्यामुळे सामान्य माणूस त्रासात आहे.’’ असे डॉ. प्रभाकर देशपांडे मुलाखतीत म्हणाले. संपूर्ण मुलाखत ग्रंथाली-प्रतिभांगण यूट्यूबवर पाहता येईल.

•

## ‘काहीतरी विशेष’मध्ये पार्किन्सन्स विषयावर मार्गदर्शन


डॉ. निकिता छाजेड यांच्याशी संवाद साधताना सुधा हुजूरबाजार-तुंबे


ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित काहीतरी विशेष कार्यक्रम मालिकेच्या तेराव्या भागात, ११ जून २०२५ रोजी डॉ. निकिता छाजेड यांनी पार्किन्सन्स या आजारावर मार्गदर्शन केले. लेखिका सुधा हुजूरबाजार तुंबे यांनी डॉ. निकिता यांना बोलते केले. डॉ. निकिता छाजेड या पुण्यातील हेल्थ कनेक्ट रिहॅब सेंटरच्या वरिष्ठ लीड फिजिओथेरपिस्ट आहेत. तसेच, त्या संपूर्ण भारतात पार्किन्सन्स रुग्णांसाठी कार्य करणाऱ्या पार्किन्सन्स डिसिज अँड मूव्हमेंट डिसऑर्डर सोसायटीच्या पुणे केंद्राच्या सपोर्ट ग्रूपच्या समन्वयक आहेत.

डॉ. निकिता यांनी मुलाखतीतून पार्किन्सन्सची लक्षणे, स्वरूप व उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती दिली. पार्किन्सन्स आजार मुख्यतः मेंदूतील डोपामिनच्या कमतरतेमुळे निर्माण होतो. हा आजार पूर्णपणे बरा होत नाही, पण औषधोपचार व विविध थेरपींच्या साहाय्याने हा आजार नियंत्रणात ठेवता येतो. समाजात वावरताना समाजाने पार्किन्सन्स रुग्णांना सिम्पथी दाखवू नये तर या रुग्णांप्रती एम्पथी आवश्यक आहे, असे डॉ. निकिता म्हणाल्या. हा आजार होऊ नये यासाठी काय करता येईल याविषयी त्या म्हणाल्या, ‘पार्किन्सन्स आजार होण्याची निश्चित कारणे सांगता येत नाहीत. त्यामुळे काय टाळावे हे सांगता येणार नाही. परंतु सुदृढ राहण्यासाठी योग्य व संतुलित आहार व व्यायाम आवश्यक आहे. रोज नवीन काही करत राहिलो तर मेंदूला व्यायाम मिळतो. जसे रोजच्या व्यवहारात उदाहरण द्यायचे तर ब्रश रोज उजव्या हाताने करतो त्याऐवजी डाव्या हाताने करून पाहावा.छोट्या छोट्या गोष्टीतून आपल्याला जितका आनंद घेता येईल तितके आपण सुदृढ राहू.’ डॉ. निकिता यांनी ब्रेनजीम व्यायामप्रकार प्रत्यक्ष करून दाखवले व प्रेक्षकांच्या प्रश्नांना सोप्या भाषेत उत्तरे दिली. •


ग्रंथाली

**चलबट**

अर्जुन व्हटकर





मूल्य ४०० रुपये । सवलतीत २४० रुपये
टपालखर्च ५० रु.

**उन्नती**

समावेशित शिक्षणाची

डॉ. वर्षा श्रीकांत गट्टू, डॉ. पूनम सावंत
डॉ. अतुल जाधव




मूल्य ३५० रुपये । सवलतीत २०० रुपये
टपालखर्च ५० रु.


## ग्रंथपरिचय

# समृद्ध संदर्भग्रंथ

**राधिका कुंटे**

**महाभारत ते भारत @ २०२५**

**माधव जोशी**




'महाभारत ते भारत @ २०२५' या माधव जोशीलिखित आणि हेडविग मीडिया हाऊस प्रकाशित पुस्तकात भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासापासून वर्तमानापर्यंतच्या प्रवासासह अगदी भविष्याचाही वेध घेतला आहे. एक प्रकारे हे पुस्तक एखाद्या कोशातील नोंदीप्रमाणे असले तरी ते केवळ टिकमार्क केलेले नसून त्यात समृद्ध संदर्भ असणाऱ्या नोंदी आहेत. त्या नोंदी वाचून त्या विषयाची अधिक माहिती घ्यावी, असे वाचकाला वाटू शकते. या पुस्तकातील पाच मुख्य भागांमध्ये तब्बल ५७ प्रकरणे लिहिली आहेत. पुस्तकाचे शीर्षक लक्षवेधी असून आणि संतोष घोंगडे यांनी विषय समर्पकपणे सूचित करणारे मुखपृष्ठ साकारले आहे. पाचशे पानांच्या या पुस्तकात भारताविषयीची शक्य तितकी अद्ययावत (पुस्तक प्रकाशित होईपर्यंतच्या काळापर्यंतची) माहिती वाचायला मिळते.

दीडशे वर्षे भारताच्या प्रगतीचा अविभाज्य भाग असलेला टाटा समूह, टाटा ट्रस्ट आणि ज्यांच्याबरोबर दीर्घकाळ काम करायची संधी मिळाली, त्या आदरणीय रतन टाटा यांना जोशी यांनी हे पुस्तक आदरपूर्वक अर्पण केले आहे. पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ वकील हरीश साळवे या मान्यवरांच्या प्रस्तावना पुस्तकाला लाभल्या आहेत. मनोगतामध्ये जोशी यांनी वाचकांशी मोकळा संवाद साधला आहे.

पहिल्या भागात इतिहास व पाया याविषयी सांगताना भारत नावाची उत्पत्ती, भारत सुवर्णभूमी, प्राचीन भारत-समृद्ध संस्कृतीचा पाया, मध्ययुगीन भारत, इंग्रजी सत्तेखालील भारत, स्वातंत्र्यसंग्राम, फाळणी-पार्श्वभूमी व वेदना, स्वातंत्र्यपूर्व महत्त्वाच्या व्यक्ती आणि नोबेल पुरस्कारप्राप्त व्यक्ती, भारताच्या सीमा, भारतातील सण आणि खाद्यपदार्थ असे विषय मांडतात. राष्ट्रनिर्मिती आणि संस्कृती या दुसऱ्या भागात भारतीय राज्यघटना, स्वातंत्र्योत्तर भारत- राष्ट्रउभारणी आणि आव्हाने, आपल्या शास्त्रज्ञांचे योगदान, भारताचे पंतप्रधान, भारताचे १९४७ पासूनचे परराष्ट्र धोरण, प्राचीन भारतीय साहित्य, श्रीमद् भगवद्गीतेची शिकवण आणि महत्त्व, १९०० नंतरचे भारतीय साहित्य, शास्त्रीय संगीत, सिनेसंगीत, सिनेमा, नाटक, चित्रशैली व चित्रकार, नृत्य, क्रिकेटसह इतर खेळ याविषयी लिहिले आहे.


तिसरा भाग आहे अर्थव्यवस्था आणि उद्योग. त्यात कृषीक्षेत्र, भारतीय कामगार चळवळीची १५० वर्षे, उद्योगांचा बदलता चेहरा, बौद्धिक संपदा हक्क, बँकिंग, फायनान्स व इन्श्युरन्स, स्टॉक व कमोडिटी एक्स्चेंज, भारतातील प्रसारमाध्यमे, भारताचा परराष्ट्र व्यापार, परकीय चलन आणि देयक संतुलन, भारतीय खाणकाम उद्योग, भारतीय आयटी क्षेत्र, दूरसंचार क्षेत्र, भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रातील अलीकडील उपक्रम व घडामोडी, भारतात व्यवसाय करणे- आव्हाने व अलीकडील सुधारणा हे विषय मांडले आहेत. चौथ्या भागात पायाभूत सुविधा आणि सेवांची माहिती देताना भारतीय रेल्वे, रस्ते, हवाई मार्ग, बंदरे, भारतातील प्रमुख नद्या, भारतीय अंतराळ कार्यक्रम, भारतीय आरोग्यसेवेचा आढावा, भारतीय शिक्षणव्यवस्था, भारतीय ऊर्जाक्षेत्र, भारतातील पर्यटन, भारताची पर्यावरणीय आव्हाने आणि उपक्रम याविषयी लिहिलेले आहे. पाचव्या समाज आणि प्रशासन या भागात सामाजिक रचना- विविधतेत एकता, ग्रामीण विकास, भारतीय राजकारण, भारतातील समाजसुधारक, भारतीयसंत, विकसित भारत, भारत बदलत आहे अमृतकाळ सुरू आणि उपसंहारात ध्यास सर्वोत्तमाचा हे लिखाण केलेले आहे.

या सगळ्या नोंदींच्या अखेरीस त्या त्या विषयाचा निष्कर्ष अर्थात थोडक्यात त्या विषयाचे जणू सार दिलेले आहे. केवळ इतिहास किंवा भूतकाळावर भर न देता वर्तमानाचा संदर्भ देत पुढील काही वर्षांतील भविष्याचा वेधही या पुस्तकात घेतलेला दिसतो. जोशी यांनी मनोगतात म्हटल्याप्रमाणे, भारताच्या समृद्ध वारशाचा आणि गेल्या काही दशकांतील सर्वांगीण प्रगतीचा अभ्यास करताना हे पुस्तक ज्ञान, प्रेरणा आणि चिंतनाचा मार्ग दाखवील, अशी आशा आहे.

**महाभारत ते भारत @ २०२५**
माधव जोशी
पृष्ठे - ४८८
मूल्य - ६०० रुपये



**- राधिका कुंटे**
kunte.radhika@gmail.com

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**काटेरी मुकुट**
**भास्कर पवार**




**उत्थानाच्या दिशेने जाणारे लेख**

आपण जेव्हा एक कर्ता म्हणून अथवा जबाबदारीची जाणीव असलेला वरिष्ठ पदावरील शासक म्हणून काम पाहतो, तेव्हा त्या पदाला साजेशी कामगिरी अपेक्षित असते. तेव्हा केवळ वैयक्तिक पातळीवर न राहता व्यापक पातळीवर त्याचे स्वरूप निर्माण झालेले असते आणि तिला न्याय देण्याचे काम व जबाबदारी अशा व्यक्तीवर आपोआपच येते. ही जबाबदारी पार पाडताना अनेक प्रक्रियांमधून पार पडावे लागते. सगळ्याच गोष्टी मनासारख्या घडाव्यात अशी अपेक्षा असते, परंतु त्या घडतीलच याची खात्री नसते. म्हणजेच एका बाजूला तृप्तता आणि दुसऱ्या बाजूला अतृप्तता अशा स्वरूपाचे चित्र निर्माण होते. एक प्रकारे ही काटेरी तारेवरची कसरत ठरते. यात आशा-आकांक्षा-अपेक्षा अशा अनेक घटकांचा समावेश होतो. व यातून जे निर्माण होते ते दुःखकारक अथवा दुःखनिवारक असू शकते. या दोन्हीही बाजू तौलनिक पद्धतीने मांडता आल्या तर त्या विषयाची साध्य आणि सिद्धता दिसून येते. ती आपणाला 'काटेरी मुकुट' या लेखनातून दृष्टीस येईल. यासाठी लेखक असे नमूद करतात, की 'शेवटी मुकुट आणि काटे हे अविभाज्य घटक झाले आहेत. स्वार्थाने भरलेल्या मनात मुळात सेवाभाव चालतच नाही. सेवा आणि स्वार्थ ह्या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्या दोन्ही दोन टोकालाच राहू शकतात. त्यामुळे मुकुटाभोवती काटे घिरट्या घालणे साहजिक आहे.'

प्रत्येक घरात वयस्कर मंडळी असतातच. त्यांचे अस्तित्व पूर्वीचे आणि आताचे मान्य करताना नवीन पिढीसाठी ते किती उपयुक्त अथवा अनुपयुक्त ठरतात हे विवाह ठरवण्याच्या मुळाशी येऊन थांबते. त्यांच्यासाठी 'डस्टबिन' - कचरा टाकण्याची कुंडी, अशा शब्दाचा प्रयोग करण्यात येतो. हे प्रसंग अलीकडे वारंवार उपस्थित होत आहेत. म्हणजेच एका बाजूला घरात कोणी नाही म्हणून घर सांभाळण्यासाठी आणि दुसऱ्या बाजूला संसार सुखात आड येणाऱ्या अडचणी अशा स्तरावर त्यांच्याकडे पाहिले जाते. हा दृष्टिकोन योग्य की अयोग्य याची व्यापकता लेखक 'डस्टबिन' या लेखातून मांडतात. त्या उलट काही वृद्धांनी देहदान करण्याचा घेतलेला निर्णय हा सुखावणारा की चिंता व्यक्त करायला लावणारा निर्णय आहे, याची वैचारिक जाणीव लेखक 'वृद्धांची जागृती' या लेखातून करून देतात.

संपूर्ण देशाची आणि जगाची वाटचाल अवलंबून आहे ती शेतकऱ्यावर. शेतीतून मिळणाऱ्या अन्नधान्य व पालेभाज्या, दूध, फळे, आदी निर्माण करणाऱ्या या संपूर्ण प्रक्रियेत असलेला प्रमुख घटक म्हणजे शेतकरी होय. परंतु कुठल्याही व्यवस्थापनात अथवा कारखान्यात ज्या पद्धतीचे नियोजन असते त्या प्रकारचे नियोजन शेतकऱ्यांसाठी केलेले कुठेही दिसून येत नाही. अहोरात्र राबणारा, सोने पिकवणारा हा घटक अवलंबून असतो केवळ पावसावर. तरीही त्याने निर्माण केलेल्या अन्नधान्यासाठी कुठलाही हमीभाव नाही. खूप राबल्यानंतरदेखील अपेक्षित उत्पन्न येईल याची शाश्वती नाही. एका बाजूला अन्नदाता आणि दुसऱ्या बाजूला उपेक्षित घटक, असा हा शेतकरी आज कोणत्या अवस्थेत आहे याबाबतची तळमळ आणि तगमग आपल्याला 'शेतकऱ्याचा कान सर्वांच्या हातात' या आणि खेड्याच्या व्यथा, अन्नदात्याच्या जीवाला घोर, बळीराजा गेला बळी, या लेखांतून लेखकाने किती आत्मीयताने व संवेदनशीलतेने लिहिलेले आहे ते वाचायला मिळते.

वृक्षतोड ही ज्या सर्रासपणे करण्यात येते तितक्या जाणीवपूर्वक वृक्ष लागवड करण्याची अपेक्षा असते. मात्र ती फोल ठरलेली दिसून येते. मृत्यूनंतर देह जाळण्यासाठी जे सरणासाठी लाकूड वापरले जाते त्याची आकडेवारी देत लेखक स्पष्ट करतात की, एका गावात वर्षाला पाच व्यक्ती दिवंगत झाल्या असा हिशोब धरला तर एका तालुक्यात शंभर गावे, गुणिले एका जिल्ह्यात पंधरा तालुके, म्हणजे एका जिल्ह्यात वर्षभरासाठी साडेसात हजार वृक्षतोड होते. या ढोबळ कल्पनेनुसार देशभरात एका वर्षासाठी किती वृक्षतोड होत असेल याची कल्पना येईल. हा असमतोल टाळण्यासाठी प्रत्येकाने प्रत्येक दिवंगत झालेल्या व्यक्तीमागे एक वृक्षाची लागवड केली, वाढदिवसाच्या निमित्ताने एक ते पाच झाड प्रत्येकी लागवड केली आणि त्यांचे संवर्धन केले तर हा समतोल राखला जाईल. आपले जीवनदेखील सुखी व समृद्ध होऊ शकेल असा विश्वास आणि उपाय, वस्तुस्थिती लेखकाने 'वृक्षतोड ही जीवनाची होळी', 'थांबा बर्फ पेटत आहे', 'वृक्ष खरा जीवनदाता' या लेखांतून वाचकांच्या समोर ठेवलेली आहे.

काटेरी मुकुट या लेख संग्रहात एकूण ४२ लेख आहेत. त्यांची साधारणतः विषयांवर आठ भागांत विभागणी केलेली आहे. या लेखसंग्रहाचे वैशिष्ट्य असे की यातून लेखक आपल्याभोवती असलेला समाज, निसर्ग, व्यक्ती, चालीरीती व श्रद्धा याविषयी केलेले निरीक्षण सखोलपणे वाचकांच्या समोर ठेवतात.

तसेच, करिअरसाठी, माणूस मागे का पडतो, सैतानी प्रवृत्तीत वाढ, यासारखे अनेक लेख वाचकांच्या समोर ठेवून त्यांना विचार करायला भाग पाडतात. यातून लेखकाचा सामाजिक भान, त्यातले मानसशास्त्र, निरीक्षण आणि दृष्टिकोन दिसून येतो. हीच बाब त्यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केलेली आहे. समाजाचे उद्बोधन आणि त्याचे परिवर्तन व्हावे ही तळमळ त्यातून दिसून येते.

हे लेखन वाचत असताना असेही लक्षात येते की, त्यांची लेखणी अर्थप्रवाही आहे. लेखक भास्कर पवार सेवानिवृत्त प्राचार्य आहेत. अनेक वृत्तपत्रांतून सातत्याने लेखन करीत आपल्या सदहेतूंची जाणीव वाचकांना करून दिलेली आहे.

'काटेरी मुकुट'ची अभ्यासपूर्ण प्रस्तावना किसन दामोदर डगळे, माजी अपर विक्रीकर आयुक्त यांनी लिहिलेली आहे. सतीश भावसार यांनी या लेखसंग्रहाचे आशयसंपन्न असे मुखपृष्ठ साकारलेले आहे.


**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

**२०२४**

**भाजपा जिंकली कशी?**

**तुळशीदास भोईटे**




**खापर फोडण्यापेक्षा आत्मपरीक्षण हेच सार्थ**

राजकारण हे रणनीतीवर चालते पोकळ अंदाजावर नाही. ही रणनीती कशी असावी आणि ती आपल्याला विजयाच्या खुर्चीपर्यंत कशी घेऊन जाईल, यासाठी ज्या पक्षाने आपले सर्वस्व पणाला लावले तो पक्ष म्हणजे भाजपा! भाजपाने लोकसभेत 'चारसौ पार' असा नारा दिला असताना केवळ २४० वरच थांबावे लागले आणि महाराष्ट्रामध्ये ४८ पैकी ४५ + राहील असे अनुमान असताना प्रत्यक्षात १७ वरच थांबावे लागले. हे घडले कसे? या चमत्काराकडे भाजपाने गांभीर्याने पाहिले. इतकेच नव्हे तर आपल्या अपयशाचे खापर अन्य कुणावर न फोडता त्यांनी आत्मपरीक्षण केले. या आत्मपरीक्षणातून रणनीतीचा जन्म झाला. या रणनीतीचा निकाल हा भाजपाला महाराष्ट्राच्या सत्तेपर्यंत घेऊन गेला, हे वास्तव आहे. या वास्तवातील अंतर आहे अवघे २०२ दिवसांचे. हे सगळे कसे घडले हे समजून घ्यायचे असेल तर '२०२४ : भाजपा जिंकली! कशी?' हे तुळशीदास भोईटे यांनी लिहिलेले पुस्तक वाचणे आवश्यक आहे.

तुळशीदास भोईटे यांनी आपल्या पुस्तकात 'महाराष्ट्रात नवा राजकीय इतिहास घडवणाऱ्या चार तारखा दिलेले आहेत : १३ मार्च १९९५, १९ ऑक्टोबर २०१४, २४ ऑक्टोबर २०१९, आणि २३ नोव्हेंबर २०२४. राजकारणाचे संपूर्ण दिशाच बदलली ती या चार तारखांनी. ती कशी आणि कोणत्या प्रकारे, याचे विश्लेषण भोईटे यांनी तारखांचा संदर्भ देत सखोलपणे केलेले आहे. त्यासाठी त्यांनी लोकसभा आणि विधानसभा यांचे मतदार आणि झालेले मतदान यांची आकडेवारी व त्यातील फरक दाखवून आपले मत स्पष्ट केलेला आहे.

'भाजपा जिंकली कशी' हे या पुस्तकातील महत्त्वाचे प्रकरण आहे. (शीर्षकाचा आत्मा) आपला पराजय झाला पण विरोधकच जिंकलेलेच नाहीत, याचा त्यांनी आत्मपरीक्षण करून शोध घेतला. त्यातूनच रणनीती जन्माला आली ती विरोधकांच्या मुद्द्यांची. या मुद्द्यांवरच आधारित विरोधकांनी लोकसभेत प्रचार केला होता, आणि भाजपाला आश्चर्यचकित केले होते, हेच मुद्दे कसे फेक आहेत आणि ते त्यांच्यावरच कसे उलटवता येतील, त्यासाठी काय काय करण्याची गरज आहे आणि रणनीती म्हणून तिचा वापर कसा करता येईल, हे त्यातले सार. या सगळ्यात आघाडीवर होते ते आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस! त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांवर पराभवाचे खापर फोडले नाही तर, विरोधक जिंकले नाही, त्यांची खोटी आश्वासने व खोटा प्रचार जिंकलेला आहे, असे सांगून कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवला. तळापर्यंत प्रत्येक कार्यकर्त्याने कार्य कसे करायला हवे, याची रणनीती आखली. अनेक घटक आणि टप्प्यांचे नियोजन करण्यात आले. त्याचा फायदा त्यांना सत्तेपर्यंत घेऊन जाण्यात झाला. हे कसे, याचे उत्तर आहे ते या प्रकरणात.

लोकसभेत मिळालेल्या यशाने विरोधक अती आत्मविश्वास आणि गाफीलवृत्तीचे शिकार कसे ठरले याचेही विश्लेषण लेखकाने केलेले आहे. त्यांचा रथ हवेत कसा धावत होता, लोकसभेत जाहीर सभांसाठी उद्धव ठाकरे यांच्या भाषणांना महत्त्व दिले गेले ते विधानसभेच्या वेळी दिले गेले नाही, मतदानकेंद्रावरील वाढलेल्या मतदारसंख्येबाबत सजगता दाखवली गेली नाही, पक्षांमधील अंतर्गत फूट, विधानसभेचे अध्यक्षपद रिकामे ठेवणे, या व अशा अनेक बाबतीत विरोधकांना सजगता दाखवता आलेली नाही. अशावेळी जयाची मुत्सद्देगिरी दाखवत असताना पराभवाची बारीकसारीक कारणेदेखील शोधून त्यांचे विश्लेषण करावे लागते. त्यासाठी आकडेवारी आणि संदर्भांची आवश्यकता असते. ती दिली तरच मताला ठाम अशी पुष्टी मिळते. लेखकाने इथे ती काळजी पुरेपूर घेतलेली दिसून येते. प्रत्येक घटकाचे, टप्प्यांचे, राज्यांचे, मतदारांचे आणि राजकीय मानसिकता यांचे चोख विश्लेषण लेखकाने केलेले आहे. यात घराणेशाही हरली की जिंकली, मुस्लिमांचा व्होट जिहाद, धार्मिक ध्रुवीकरण, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, राष्ट्रीय स्वयंसेवक सेवक संघाची सोबत, हरियाणाने जो पॅटर्न राबविला तोच महाराष्ट्रात कसा लागू झाला, यातून छोट्या छोट्या पक्षांची वाताहात कशी झाली, यांची तपशीलवार माहिती आणि आकडेवारी खूप काही सांगून जाणारी आहे.

'लाडकी बहीण' या योजनेमुळे सत्तेचा लाभ झाला का, हा सगळ्यांच्याच चर्चेचा विषय आहे. ही योजना केम चेंजर ठरलेली आहे हे वास्तव आहे. ते कसे, याचे विश्लेषण करण्यासाठी लेखकाने एक स्वतंत्र प्रकरण लिहिलेले आहे. परंतु केवळ ही एकच योजना नव्हती तर त्या जोडीला मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना, महिलांना एसटी प्रवास ५० टक्के मोफत, मुंबईतील प्रवेश टोलमुक्त, एक रुपया पीक विमा, मोफत तीर्थयात्रा योजना, शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी, मोफत वीज, शेतकरी सन्मान योजना, लाभार्थी मेळाव्यांचे आयोजन, या सगळ्या योजनांचा यात समावेश होता. यांची माहिती लेखकाने सारांश रूपाने या पुस्तकात दिलेली आहे.


२०२४ भाजपा जिंकली कशी या पुस्तकात एकूण २३ लेखांचा समावेश आहे. या लेखांचे वैशिष्ट्ये काय, तर ते राजीव खांडेकर (मुख्य संपादक, एबीपी न्यूज/ एबीपी माझा) यांच्या प्रस्तावनेत सापडतात. हे पुस्तक कुणी वाचायला हवे, यांची तर ते यादीच देतात. त्यांच्या या अभिप्रायला अनुसरूनच लेखकाचे मनोगत आहे. या पुस्तकाची कल्पना कशी सुचली आणि ते जास्तीत जास्त वास्तववादी मांडण्याचा कसा प्रयत्न केला हे लेखकाच्या मनोगतातून वाचायला मिळते. त्यांनी सत्याचा शोध घेत असताना आपले वृत्तपत्रीय शैलीचे व्रत बाळगले आहे परंतु त्याला ललित स्वरूपाचे जे सहज सुंदर रूप दिलेले आहे ते अधिक भावणारे आहे. तुळशीदास भोईटे हे गेल्या तीन दशकाहून अधिक काळ पत्रकारितेत सक्रिय आहेत. प्रिंट, टीव्ही आणि डिजिटल अशा विविध माध्यमातून त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आणि आता ते सध्याही सक्रिय आहेत. ते 'मुक्तपीठ' या मुक्त माध्यमाचे संस्थापक संपादक आहेत. राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर सखोल विश्लेषण करण्यासाठी ते ओळखले जातात. सदरचे पुस्तक हा त्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे.

या पुस्तकाचे आशयाला धरून असणारे मुखपृष्ठ नीलेश जाधव यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

**वानुळा**
**माणदेशी ग्रामीण कथा**
**प्रा. साहेबराव चवरे**



**माणदेशी माणसं पुन्हा**

ललित साहित्य प्रमाणभाषेत लिहावे की बोलीभाषेत लिहावे हा मुद्दा वादाचा आहेच; परंतु बोलीभाषेला एक स्वतःचा बाज असतो, शैली असते आणि तसाच तिचा स्वतःचा वेगवान असा प्रवाह असतो, हे नाकारून चालणार नाही. यापूर्वी आपण व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांच्या कथा वाचलेल्या आहेत. कथाकथनातून ऐकलेल्या आहेत. त्यामधूनदेखील बोलीभाषेचा वापर सर्रास झालेला आहे. इतकेच नव्हे तर त्या भाषेचा गोडवा सगळ्यांनी मान्य केलेला आहे. तोच धागा प्रा. साहेबराव चवरे घेऊन आले आहेत, 'वानुळा' या कथासंग्रहातून. २०१२ सालात प्रकाशित झालेली ही साहित्यकृती आता दुसऱ्यांदा आवृत्तीच्या स्वरूपात प्रकाशित होत आहे.

आपली फसगत कदाचित 'वानुळा' या शीर्षकातील शब्दापासून होऊ शकते. दुसऱ्यांच्या घरी जाताना रिकाम्या हाताने कधी जायचे नसते तर आपल्याकडे असणारी वस्तू, पदार्थ, धान्य जे देण्यासारखे असेल ते जाताना सोबत घेऊन जायचे आणि ते भेट म्हणून द्यायचे. आणलेली आणि दिलेली ही वस्तू तिला 'वानुळा' असे म्हणतात. मग ती ज्वारी, बाजरी, मक्याची कणसे, शेंगा, खरवस असे काहीही असू शकते. त्याचप्रमाणे एका ग्रामीण भागातल्या कथा दुसऱ्या वाचकांच्या समोर सादर करताना हा त्या भागाचा वानुळा आहे, बोली भाषेचा, शैलीचा सादर करण्याचा, असे लेखकाला अपेक्षित आहे आणि आपण तो स्वीकारावा अशी ही अपेक्षा आहे.

वानुळा या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत या सगळ्या कथा वाचत असताना 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसं', यांची आठवण तीव्रतेने नजरेसमोर उभी राहते. एकाच ग्रामीण भागातून आलेल्या या कथा आहेत हे मान्य केले तरी लेखक साहेबराव चवरे यांनी आपल्या स्वतःच्या शैलीत या कथा लिहिलेल्या आहेत. त्यामुळे या त्यांच्याच कथा आहेत आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावनेत प्रा. व. वा. बोधे यांनी म्हटल्याप्रमाणे या कथा सादरीकरण करण्या साठी अतिशय चपखल आहेत. लेखक चवरे यांनी सादरीकरणाच्या शैलीतच हे लेखन केलेले असावे याला पुष्टी मिळते. या लेखनाला स्वतःचा छान असा प्रवाह आहे. भाषेचा गोडवा तर मान्यच करायला हवा. कथा वाचत असताना कुठेही अडचण येत नाही. उलट संदर्भ लागत असताना एक नवीन शब्द आपल्याला सापडला, याचा आनंद होतो. ग्रामीण शब्दांची हीच वैशिष्ट्ये असतात. ती वाचकाच्या शब्द संग्रहात भर घालत असतात, आणि म्हणूनच कुठलाही रसिक वाचक अशा बोलीभाषेपासून कधी दूर न जाता तिच्याकडे आकृष्ट होतो, ते याच कारणांनी.

लेखकाने ग्रामीण भागातील अनेक समस्या आपल्यासमोर मांडलेल्या आहेत. सामाजिक भान आणि कौटुंबिक भान ठेवून वागणारी माणसे आणि त्यांना झुगारून देऊन वागणारी माणसे, अशा दोन्हीही टप्प्यांवर असलेल्या माणसांविषयी लेखकाने लिहिलेले आहे. हे लिहिताना त्यांच्या भावना, त्यांच्या संवेदना आणि कुठल्याही प्रसंगाकडे पाहण्याची त्यांचा दृष्टिकोन या कथांमधून दिसून येतो. हे लेखन करताना लेखक सजग आणि संवेदनशीलतेने या सगळ्या प्रकाराकडे पाहतात आणि टीपकागदाप्रमाणे एक एकच समस्या, एकेक व्यक्तिरेखा आपल्या कथेमधून साकार करतात. कथा सकार करताना वेदनेवर किंवा समस्येवर बोट ठेवताना कुठलीही दूषित भूमिका ते मांडत नाहीत. जे वास्तव आहे त्याला सामोरे जाताना अशी दूषित नजर ठेवून लिहिता येतही नाही. याचे भान त्यांनी राखलेले आहे.

'माहेर' या कथेतील पारू आपल्या भावाची आणि आईची गरिबी ओळखून आहे. लग्नानंतर माहेरी जाण्याचे तिचे स्वप्न अजूनही अपूर्ण आहे, त्याचा रोष व्यक्त न करता अथवा भाऊ व आईला दोष न देता ती त्यांची बाजू सावरून घेत पत्र लिहिते, 'दादाला न् आयला म्हणावं, माजी काय काळजी करू नगंस. पंचमीला मला बोलू नगंस. मला बी यायला घडायचं नाय. औंदा वन्सस्नी आणायचं म्हणतुय मग मला कसं यायला घडायचं! मला माहेर करायच्या भानगडीत पडू नगंस.'

या कथेत केवळ भावनाच नाही तर आपल्या परंपरांचादेखील त्यात संदर्भ येतो. साधारणतः लग्नानंतर पंचमीच्या दरम्यान लग्न झालेल्या मुली माहेरी येतात. आपल्या कुटुंब आणि मैत्रिणी यांच्यासोबत हा सण साजरा करतात. ही रुढी ग्रामीण भागात फार आपुलकीने पाळली जाते, ती या कथेतून आपल्यासमोर येते.

''शीर' सलामत तो'... या कथेतील अख्ख्या गावाला भारी असणारा सदा पाटील छंद आणि व्यसनापायी सर्वस्व गमावून बसतो आणि शेवटी शीरबंदीच्या लाल त्रिकोणाच्या प्राथमिक आरोग्यकेंद्रावर जातो. आणि खिशात साडेचारशे रुपये घेऊन येतो.

हे ऱ्हासपर्व कुठल्या थरापर्यंत जाऊ शकते, याचे हे वर्णन आहे. छंद आणि व्यसन याविषयीचे अंजन डोळ्यांत घालणारी ही कथा आहे.

अशाच 'लगीन', 'तोडगा', 'वायलं', 'पावसाच्या कण्या', 'तरसवाडीच्या शाळेत NCERTची पेटी', 'गरिबीची व्यथा' यासारख्या कथा या संग्रहात आहेत.

या संग्रहाचे एक वैशिष्ट्य सांगता येईल ते असे, की कथांमध्ये आलेले शब्द वाचकाला अडचणीत टाकणार नाहीत. यासाठी या शब्दांचे अर्थ सोबत दिलेले आहेत. तेही कथेच्या क्रमानुसार. तसेच हा संग्रह ज्या मान्यवरांच्या पसंतीला आला आहे आणि त्या पसंतीची पावती त्यांनी दिलेली आहे. असे अभिप्राय परिशिष्ट स्वरूपात सोबत जोडलेले आहेत.

लेखक प्राध्यापक असून त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, झरे, ता. आटपाडी, जिल्हा सांगली येथे ३२ वर्षे अध्यापनाचे कार्य केलेले आहे. विविध संस्थांमध्ये त्यांचा सहभाग आहे. त्याचप्रमाणे अनेक मान्यवर पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

या पुस्तकाचे वास्तववादी ठरावे असे चित्रमय मुखपृष्ठ रियाज महंमद शिकलगार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**




मुद्रक, प्रकाशक : डॉ. लतिका भानुशाली यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' ही त्रैमासिक पुस्तिका प्रतीक ऑफसेट, गायवाडी, गिरगाव, मुंबई-४००००४ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, १०१/१, बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर हाउसिंग सोसायटी, मनोरमा नगरकर मार्ग, स्टार सिटीसमोर, माहीम (प.), मुंबई-४०००१६ येथे प्रकाशित केली.